**अहवाल क्रमांक : १९५**

सत्यमेव जयते

# पंचायती राज समिती

(२०२४-२०२५)

(पंधरावी महाराष्ट्र विधानसभा)

यवतमाळ जिल्हा परिषदेच्या सन २०११-२०१२ व २०१७-२०१८ च्या
वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भातील

## दुसरा अहवाल

(सदर अहवाल दिनांक २५ मार्च, २०२६ रोजी
विधानसभेस / विधानपरिषदेस सादर करण्यात आला.)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

विधान भवन, मुंबई

२०२६

# पंचायती राज समिती

(२०२४-२०२५)

(पंधरावी महाराष्ट्र विधानसभा)

यवतमाळ जिल्हा परिषदेच्या सन २०११-२०१२ व २०१७-२०१८ च्या
वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भातील

# दुसरा अहवाल

पंचायती राज समिति

(सन २०२४- २०२५)

**समिती प्रमुख**

(१) श्री. संतोष दानवे, वि. स. स.

**सदस्य**

(२) श्री. सुरेश धस, वि.स.स.

(३) श्री. महेश लांडगे, वि.स.स.

(४) श्री. प्रताप अडसड, वि.स.स.

(५) श्री. सुनिल कांबळे, वि.स.स.

(६) श्री. अभिमन्यू पवार, वि. स.स.

(७) श्री. संजय पुराम, वि.स.स

(८) श्री. गोपीचंद पडळकर, वि.स.स.

(९) श्री. शिवाजी पाटील, वि.स.स.

(१०) श्री. दीपक केसरकर, वि. स.स.

(११) श्री. निलेश राणे, वि. स. स.

(१२) श्री. संजय गायकवाड, वि.स.स

(१३) श्री. रमेश बोरनारे, वि. स.स ,

(१४) श्री. किरण लहामटे, वि.स.स.

(१५) श्री. विजयसिंग पंडित, वि.स.स.

(१६) श्री. नितीन पवार, वि.स.स

(१७) श्री. दिलीप सोपल, वि.स.स

(१८) श्री. नितीन देशमुख, वि. स. स.

(१९) श्री. संजय मेश्राम, वि. स.स.

(२०) श्री. संदिप क्षिरसागर, वि.स.स

(२१) डॉ. परिणय फुके, वि.प.स.

(२२) डॉ. मनिषा कायंदे, वि.प.स.

(२३) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

(२४) श्री. जयंत आसगावकर, वि.प.स.

(२५) श्री. सचिन अहिर, वि.प.स.

**विशेष निमंत्रित :**

(२६) श्री. योगेश टिळेकर, वि.प.स.

(२७) *डॉ. बाबासाहेब देशमुख, वि. स. स

(२८) **श्री. सदाशिव खोत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. शिवदर्शन साठ्ये, सचिव-४

(२) श्री. रविंद्र जगदाळे, उप सचिव

(३) श्री. सुरेश मोगल, अवर सचिव

(४) श्री. पवन म्हात्रे, कक्ष अधिकारी.

(२७) * डॉ. बाबासाहेब देशमुख, वि.स.स. यांची मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी निमंत्रित सदस्य म्हणून दिनांक १९ मे, २०२५ रोजीपासून नामनियुक्ती केलेली आहे.

(२८)** श्री. सदाशिव खोत, वि.प.स. यांची मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी निमंत्रित सदस्य म्हणून दिनांक २१ मे, २०२५ रोजीपासून नामनियुक्ती केलेली आहे.

## पंचायती राज समिति

(सन २०२०-२०२१)

**समिती प्रमुख**

(१) श्री. संजय रायमुलकर, वि.स.स.

**सदस्य**

(२) श्री. प्रदिप जैस्वाल, वि.स.स.

(३) श्री. कैलास पाटील (घाडगे), वि.स.स.

(४) डॉ. राहूल पाटील, वि.स.स.

(५) श्री. अनिल पाटील, वि.स.स.

(६) श्री. संग्राम जगताप, वि.स.स.

(७) श्री. दिलीपराव बनकर, वि.स.स.

(८) श्री. शेखर निकम, वि.स.स.

(९) श्री. सुभाष धोटे, वि.स.स.

(१०) श्री. माधवराव पवार, वि.स.स.

(११) श्रीमती प्रतिभा धानोरकर, वि.स.स.

(१२) श्री. हरीभाऊ बागडे, वि.स.स.

(१३) डॉ. विजयकुमार गावीत, वि.स.स.

(१४) डॉ. देवराव होळी, वि.स.स.

(१५) श्री. कृष्णा गजबे, वि.स.स.

(१६)*श्री. विजय रहांगडाले, वि.स.स.

(१७) श्री. राणा जगजितसिंह पाटील, वि.स.स.

(१८) श्री. प्रशांत बंब, वि.स.स.

(१९) श्रीमती मेघना बोर्डिकर-साकोरे, वि.स.स.

(२०) श्री. किशोर जोरगेवार, वि.स.स.

(२१) श्री. अंबादास दानवे, वि.प.स.

(२२) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

(२३) श्री. अमरनाथ राजुरकर, वि.प.स.

(२४) ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स.

(२५) श्री. सुरेश धस, वि.प.स.

**विशेष निमंत्रित :**

(२६) श्री. किशोर आप्पा पाटील, वि.स.स.

(२७) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

(२८) श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.

(२९) श्री. किशोर दराडे, वि.प.स.

(३०) श्री. रत्नाकर गुट्टे, वि.स.स.

(३१) श्री. महादेव जानकर, वि.प.स.

(३२) श्री. सदाशिव खोत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. राजेन्द्र भागवत, प्रधान सचिव

(२) श्री. विलास आठवले, उप सचिव

(३) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

(४) श्री. प्रकाश थिटे, कक्ष अधिकारी

(५) श्रीमती सुषमा लोंढे, कक्ष अधिकारी

* डॉ.संजय कुटे, वि.स.स. यांनी समिती सदस्यपदाचा राजीनामा दिल्यामुळे त्यांच्या रिक्त झालेल्या जागेवर श्री. विजय रहांगडाले, वि.स.स. यांची "समिती सदस्य" म्हणून दिनांक १३ ऑक्टोबर, २०२१ रोजी पासून नामनियुक्ती केली.

## पंचायती राज समिती

(सन २०१७-२०१८)

**समितीप्रमुख**

(१) श्री.सुधीर पारवे, वि.स.स.

**सदस्य**

(२) श्री.बाबुराव पाचर्णे, वि.स.स.

(३) श्री.चरण वाघमारे, वि.स.स.

(४) श्री.रणधीर सावरकर, वि.स.स.

(५) ॲड.राहुल कुल, वि.स.स.

(६) श्री.आर.टी.देशमुख, वि.स.स.

(७) डॉ.देवराव होळी, वि.स.स.

(८) डॉ.सुरेश (भाऊ) खाडे, वि.स.स.

(९) डॉ.सुधाकर भालेराव, वि.स.स.

(१०) श्री.सुधाकर कोहळे, वि.स.स.

(११) श्री.भरतशेठ गोगावले, वि.स.स.

(१२) श्री.किशोर पाटील, वि.स.स.

(१३) श्री.राजेश क्षीरसागर, वि.स.स.

(१४) श्री.तुकाराम काते, वि.स.स.

(१५) श्री.राहुल बोंद्रे, वि.स.स.

(१६) श्री.भारत भालके, वि.स.स.

(१७) प्रा.विरेंद्र जगताप, वि.स.स.

(१८) श्री.दिलीप सोपल, वि.स.स.

(१९) श्री.राहुल मोटे, वि.स.स.

(२०) श्री.दीपक चव्हाण, वि.स.स.

(२१) श्री.प्रविण दरेकर, वि.प.स.

(२२) प्रा.डॉ. तानाजी सावंत, वि.प.स.

(२३) श्री.विक्रम काळे, वि.प.स.

(२४) श्री.सतीश चव्हाण, वि.प.स.

(२५) श्री.अमरनाथ राजूरकर, वि.प.स.

**विशेष निमंत्रित :**

(२६) श्री.बाळाराम पाटील, वि.प.स.

(२७) श्री.श्रीकांत देशपांडे, वि.प.स.

(२८) श्री.दत्तात्रय सावंत, वि.प.स.

(२९) श्री.किशोर दराडे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री.जितेंद्र भोळे, सचिव (कार्यभार)

(२) श्री.विलास आठवले, सह सचिव (२) (का.)

(३) श्री.प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

(४) श्री.मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी

## प्रस्तावना

मी, पंचायती राज समितीचा 'समिती प्रमुख' या नात्याने समितीने अधिकार दिल्यावरून पंचायती राज समितीचा दुसरा अहवाल सादर करीत आहे.

सन २०२४-२०२५ या वर्षाकरिता समिती दिनांक २६ एप्रिल, २०२५ रोजी गठीत झाली. महाराष्ट्र विधानसभा नियमावलीतील नियम २४० अन्वये विधानमंडळाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या जिल्हा परिषदांच्या वार्षिक प्रशासन अहवालाची तसेच महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल व एकत्रित वित्तीय महसुली लेखे यांच्या परीक्षणाची कामे प्रामुख्याने या समितीकडे सोपविण्यात आलेली आहेत.

शासनाच्या विविध कामकाजाचा वाढलेला व्याप (Enormous range and complexity) लक्षात घेता विधानमंडळाला उपलब्ध वेळेत आपली कर्तव्ये पुरेशा क्षमतेने बजावता येणे अशक्य झाले आहे. शासन यंत्रणेकडे उक्त किचकट प्रशासकीय कामासाठी सक्षम व तज्ञ प्रशासक यंत्रणा उपलब्ध असते. संसदीय लोकशाहीच्या संवर्धनासाठी व यशस्वीतेसाठी शासनाच्या संपूर्ण प्रशासन व्यवस्थेवर सखोल, संपूर्ण, प्रभावी व अर्थपूर्ण असे (effective meaningful) नियंत्रण व देखरेख ठेवण्याची आत्यंतिक गरज आहे आणि म्हणूनच कार्यकारी प्रशासन (Executive) राबवित असलेल्या विविध योजनांचा अभ्यास करण्यासाठी, त्यातील त्रुटी शोधून काढून योजना अंमलबजावणीला व पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी (Tone of administration) मा.सभापती, विधानपरिषद व मा.अध्यक्ष, विधानसभा यांनी दोन्ही सभागृहाच्या निवडक सदस्यांचा समावेश असलेल्या पंचायती राज समितीचे गठन दिनांक २६ एप्रिल, २०२५ रोजी केले. समिती पद्धतीचे वैशिष्ट असे की, सभागृहात पक्षीय ध्येयधोरणांचा सदस्यांवर प्रभाव पडतो. त्या उलट संसदीय लोकशाही पद्धतीमध्ये विधानमंडळाची ही समिती फार मोठ्या मोलाचे कार्य पार पाडीत आहे. ही समिती विधानमंडळाची निर्मिती असून ती सहाजिकच विधानमंडळास दुय्यम आहे. या समितीला सर्व अधिकार विधानमंडळापासूनच प्राप्त झालेले आहेत. (They derive authority from the Legislature) या समितीला "Mini Legislature" सभागृहाची छोटी प्रतिकृती संबोधली जाते. शासनाने राबविलेल्या योजनांच्या अंमलबजावणीला पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी व प्रशासनावर सातत्याने नियंत्रण व प्रभावीपणे पहारा ठेवण्याचे महत्वाचे काम विधानमंडळाच्या या समितीद्वारे केले जाते. समितीचे कामकाज पक्षविरहीत तत्त्वावर (irrespective of party affiliation) चालत असल्यामुळे समिती समोरील बाबी पक्षीय अभिनिवेशरहीत पद्धतीने (Non-Party Basis) विचारात घेण्यात येतात. त्यामुळे एखाद्या विषयाचा अभ्यास अत्यंत निःपक्षपातीपणे व तपशीलात जाऊन केला जातो. परिणामी त्यास पूर्ण न्याय मिळतो.

शासनाचे एखादे धोरण वा योजना याची आखणी कशी करावी याबाबत समिती सल्ला देऊ शकणार नाही, तथापि शासनाने अंमलात आणलेल्या धोरणांची वा योजनेची फलश्रुती अपेक्षेप्रमाणे होत नसेल वा होणार नसेल तर ही बाब संबंधित समिती सभागृहाच्या नजरेस आणून त्या धोरणात वा योजनेत बदल करण्यासंबंधी शासनास सुचविण्याचे काम करते. समिती पद्धतीचा हा एक विशेष फायदा आहे.

विधिमंडळाप्रती शासनाची जबाबदारी ही मर्यादित स्वरूपाची आहे. संसदीय लोकशाहीमध्ये शासन हे प्रत्येक बाबतीत विधानमंडळाला सर्वतोपरी जबाबदार असते आणि शासनाच्या संपूर्ण प्रशासनावर विधिमंडळाचे नियंत्रण हा संसदीय लोकशाहीचा आत्मा आहे.

समितीचे अधिकार, कार्यकक्षा, प्रशासनावर ठेवावयाचे नियंत्रण, शासनाचे समितीप्रती व विधानमंडळाप्रती असलेले उत्तरदायित्व या सर्वांचा साकल्याने विचार केल्यास समितीचे अधिकार निश्चित व निर्विवादपणे सर्वश्रेष्ठ आहेत. परंतु, योजना राबविण्यापूर्वी वा एखादे धोरण आखण्यापूर्वी प्रशासन यंत्रणेने मंत्रिमंडळाला दिलेल्या सल्ल्याची तपासणी करणे निश्चितच समितीच्या कार्यकक्षेबाहेरील होईल. मात्र योजना अस्तित्वात आल्यानंतर व त्यावर आर्थिक तरतूद करण्यात आल्यानंतर समिती या प्रकरणी संपूर्णपणे व तपशीलवार छाननी करण्यास समर्थ ठरेल. ही योजना अगदी अनावश्यक आहे काय? त्यावर अपेक्षेपेक्षा जास्त खर्च करण्यात आला आहे काय ? योजनेची उद्दीष्टे साध्य झाली आहेत काय ? योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम आहे किंवा कसे, इतकेच काय एखादी योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम नसल्यास ती बंद करण्यात यावी व त्याऐवजी दुसरी एखादी योजना आखण्यात यावी या मर्यादेपर्यंत सुद्धा समिती शिफारस करू शकते व त्या अनुषंगाने आवश्यक ती सर्व माहिती समितीला मागविण्याचा अधिकार आहे.

समित्यांचे कामकाज अधिक परिणामकारक करण्यासाठी मा.सदस्यांनी समितीच्या कामात जास्तीत जास्त सहभाग घेणे जरुरीचे आहे. या अहवालात नमूद बाबीसंदर्भात समितीने एक एक प्रश्न हाती घेऊन त्या प्रत्येक प्रश्नावर समाधानकारकरितीने साक्षीपुरावा गोळा केला, तसेच मा. समिती सदस्यांनी आळीपाळीने प्रश्न विचारुन संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती मिळविण्याच्या विनिर्दिष्ट पद्धतीचे पालनसुद्धा भेटीच्या वेळी केलेले आहे. एका सदस्यांनी त्यांचा मुद्दा पूर्ण केल्यानंतरच दुसऱ्या सदस्यांनी माहिती विचारण्याची पद्धत जोपासली आहे. या पद्धतीने समितीचे कामकाज सुव्यवस्थित पद्धतीने चालविण्याचा या समितीने प्रयत्न केलेला आहे.

समितीला तिच्याकडे सोपविण्यात आलेल्या विषयावरील मुद्दे तयार करून आणि त्यांच्या विनिर्दिष्ट क्रमाने त्यांचे परिक्षण करून विषयाशी संबंधित नियम किंवा कार्यपद्धतीमधील त्रुटी आणि उणिवा शोधून काढतेवेळी समितीचा दृष्टीकोन वस्तुनिष्ठ व विधायक होता. केलेल्या चुका सुधारण्यासाठी किंवा प्रशासकीय पद्धतीत सुधारणा घडविण्याच्यादृष्टीने समितीने अनेक बाबतीत सुधारणात्मक उपाय सुचविलेले आहेत, चुकांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी देखील समितीने उपाययोजना सुचविलेल्या आहेत. शासनाच्या प्रतिनिधीप्रती सदस्यांचे वर्तन संयमी आणि सौजन्यशील ठेऊन कोणताही साक्षीदार काही वस्तुस्थिती लपवित असल्याबद्दल दोषी असल्याचे किंवा असहकार दर्शवित असल्याचे आढळून आल्यानंतर समितीने संबंधितांविरुद्ध कारवाईदेखील सुचविली आहे. समितीची बैठक बोलविणे आणि साक्षीदारांना साक्षीसाठी बोलविणे यासंबंधीच्या इतर किरकोळ मुद्यांच्या बाबतीत साक्षीदारांना पुरेसा वेळ देऊन व नोटीस देऊन बोलविण्यात आलेले आहे. थोडक्यात, समिती पद्धती ही अत्यंत उपयुक्त व परिणामकारक असून संसदीय कामकाज प्रणालीमध्ये या पद्धतीचे स्थान व महत्व अनन्यसाधारण असेच आहे. संसदीय शासन प्रणाली अधिकाधिक वृद्धिंगत करण्याच्या दृष्टीने या महत्त्वपूर्ण अशा संसदीय समितीच्या कामकाजाचा स्तर उत्तरोत्तर उंचावत नेणे ही आपणा सर्वांची जबाबदारी आहे.

राज्यात समिती जिल्हा परिषदांना भेटी देत असताना समितीला अनेक चांगल्या संकल्पना व राबविलेल्या योजना आढळून आल्या आहेत. त्याचप्रमाणे काही बाबतीत प्रचंड अनियमितता व गैरव्यवहाराची प्रकरणेदेखील आढळून आली आहेत. समितीने चांगल्या बाबींना समर्थन देऊन संबंधितांना प्रोत्साहन दिले. तद्वतच काही अनियमितता किंवा गैरव्यवहाराच्या प्रकरणात समितीने कठोरपणे निर्णयदेखील घेतले आहेत. असे करीत असताना दोषारोपित व्यक्तीवर कारवाई करताना नैसर्गिक न्यायाची पायमल्ली होऊ नये अशा प्रकारच्या सूचनादेखील प्रशासनास केल्या आहेत.

या समितीने ज्या ज्या जिल्ह्यांना भेटी दिल्या आहेत त्या त्या जिल्ह्यातील सर्व पंचायत समित्यांना भेटी देऊन उक्त पंचायत समित्यांच्या प्रशासनिक अहवालावर सखोल चर्चा करून ज्या बाबतीत दोष आहेत त्या सुधारुन घेण्याबाबत त्यांना उपयुक्त सूचना केल्या आहेत. तसेच पंचायत समित्यांच्या क्षेत्रातील विविध कामांना भेटी देऊन त्याची पाहणी करणे, शालेय पोषण आहार, पुरक पोषण आहार, सार्वजनिक आरोग्य केंद्रे/उपकेंद्रे, पशु वैद्यकीय दवाखाने, रस्ते, जलसिंचनाची कामे, पाणीपुरवठ्याची कामे इत्यादींना भेटी देऊन त्याबाबतही चुकांचे निरसन करून काही चांगल्या बाबींचे समर्थन करून संबंधितांना प्रोत्साहितदेखील केले आहे. या अहवालात अशा अनेक बाबींचा उहापोह केला आहे.

सन २०११-२०१२ व २०१७-२०१८ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात सन २०१७-२०१८ साठी गठीत झालेल्या समितीने यवतमाळ जिल्हा परिषदेची सखोल तपासणी केली. समितीने यवतमाळ जिल्हा परिषदेस दिनांक १६, १७ व १८ फेब्रुवारी, २०२१ रोजी भेट देऊन डॉ.श्रीकृष्ण पांचाळ, मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांची साक्ष घेतली.

तसेच सन २०१७-२०१८ या वर्षाकरीता गठीत झालेल्या समितीने यवतमाळ जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या तसेच साक्षीच्या वेळी संबंधित अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे उपस्थित झालेल्या मुद्यांबाबत अधिक माहिती जाणून घेण्याच्या दृष्टीने दिनांक १६ नोव्हेंबर, २०२१ रोजी जिल्हा परिषद, यवतमाळ संदर्भात मंत्रालयीन विभागीय सचिवांच्या/प्रतिनिधींच्या साक्षी घेतल्या.

मंत्रालयीन विभागीय सचिवांचे साक्षीचेवेळी संबंधित विभागाचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव व इतर मंत्रालयीन अधिकारी तसेच संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, नवी मुंबई यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीच्या कामकाजात केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे तसेच जिल्हा परिषदेचे श्री. श्रीकृष्ण पांचाळ, तत्कालिन मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांनी साक्षीच्या वेळी समितीला माहिती पुरवून केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांचीही आभारी आहे.

समितीने कामकाजाचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्टामध्ये दिले आहे.

वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात समितीने भेटी दिलेल्या यवतमाळ जिल्हा परिषदेच्या कामकाजाची तपासणी करीत असताना समितीला आढळून आलेल्या काही मुद्यांबाबत समितीचे अभिप्राय व शिफारशी अहवालात देण्यात आल्या आहेत.

सन २०२४-२०२५ साठी नव्याने गठीत झालेल्या समितीने दिनांक १८ मार्च, २०२६ रोजीच्या बैठकीत प्रारुप अहवाल विचारात घेऊन तो किरकोळ दुरुस्तींसह संमत केला.

| | |
|---|---|
| विधान भवन, | संतोष दानवे, |
| मुंबई, | समिती प्रमुख, |
| दिनांक : १८ मार्च, २०२६. | पंचायती राज समिती. |

## अनुक्रमणिका


| अ.क्र. (१) | प्रकरण क्रमांक (२) | विषय (३) | पृष्ठ क्रमांक (४) |
|---|---|---|---|
| (१) | एक | यवतमाळ जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी व जिल्हा परिषदेच्या पदाधिकाऱ्यांसमवेत अनौपचारिक चर्चेच्या वेळी समितीच्या निदर्शनास आलेल्या बाबींसदर्भात | १ |
| (२) | दोन | सेस फंडाची रक्कम जिल्हा परिषद व पंचायत समित्यांना निर्धारित वर्षात वितरीत करण्याच्या दृष्टीने धोरणात्मक निर्णय घेण्याबाबत. | ८ |
| (३) | तीन | जिल्हा परिषदांनी स्वःउत्पन्नातून मागासवर्गीय कल्याणासाठी २० टक्के रक्कमेच्या खर्चाबाबत. | ११ |
| (४) | चार | जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्राबाबत | १५ |
| (५) | पाच | निकृष्ट दर्जाच्या बियाणांच्या संदर्भात संबंधित कंपन्यांवर कारवाई करण्याबाबत | २० |
| (६) | सहा | जलयुक्त शिवार अभियानअंतर्गत झालेली कामे व पाणीपुरवठा योजनांबाबत | २६ |
| (७) | सात | सामाजिक न्याय विभागाअंतर्गत असलेल्या वसतीगृहांना अधिकाऱ्यांनी दिलेल्या भेटींबाबत. | ३३ |
| (८) | आठ | आपले सरकार सेवा केंद्रामधील संगणक परिचालक व इतर साहित्य वापरामधील गैरप्रकाराबाबत. | ३६ |
| | | परिशिष्ट - " अ " शासन निर्णय व परिपत्रके | ३९ |
| | | परिशिष्ट - " ब" समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त | ६५ |

## प्रकरण एक

## जिल्हा परिषद, यवतमाळ

### यवतमाळ जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी व जिल्हा परिषदेच्या पदाधिकाऱ्यांसमवेत अनौपचारिक चर्चेच्या वेळी समितीच्या निदर्शनास आलेल्या बाबींसदर्भात

पंचायती राज समितीने दिनांक १६ ते १८ फेब्रुवारी, २०२१ या कालावधीत यवतमाळ जिल्हा परिषदेस भेट देऊन जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी व जिल्हा परिषदेच्या पदाधिकाऱ्यांसमवेत अनौपचारीक चर्चा केली. सन २०११-२०१२ व सन २०१७-२०१८ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील अनौपचारिक चर्चेच्या वेळी सभापती, पंचायत समिती, उमरखेड यांनी समितीस विशद केले की, सुमारे वर्षभरापूर्वी माननीय अध्यक्ष, उपाध्यक्ष व विषय समिती अध्यक्षांची निवड झाली. नंतर कोरोना साथीमुळे लॉकडाऊन जाहीर करण्यात आले होते. दरम्यानच्या काळात उमरखेड तालुका आणि एकूणच यवतमाळ जिल्ह्यामध्ये महाराष्ट्र राज्य ग्रामीण जिवनोन्नती अभियान-उमेद अंतर्गत मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाला आहे. संपूर्ण देश बंद असताना या अभियानांतर्गत शेतीसाठीच्या औषधांची विक्री झाल्याचे दाखविण्यात आले आहे. यामध्ये बचत गटातील महिलांना सक्तीने औषधांची विक्री केली गेली. औषधविक्री करणाऱ्या कंपनीकडे अर्थवेद-बायो नावाचे एक प्रॉडक्ट आहे. राज्य शासनाची कोणतीही परवानगी नसताना ते विकण्यात आले आहे, ही गंभीर बाब आहे. या प्रॉडक्टची बाजारात १५० ते २५० रुपये किंमत असताना बचत गटातील महिलांना मात्र ते सुमारे १००० ते ११०० रुपयांना विकण्यात आले आहे. याबाबत जिल्हा परिषद अध्यक्ष व इतरांकडे तक्रार केली आहे. जिल्हा परिषद अध्यक्षांनी त्याला सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. याबाबत तालुकास्तरीय समिती नेमणे आवश्यक असताना जिल्हास्तरीय समिती गठीत करण्यात आली आहे. सुमारे ८ महिन्यांपूर्वी नेमण्यात आलेल्या सदर समितीचा अहवाल अद्यापपर्यंत प्राप्त झालेला नाही. यामध्ये केवळ वेळकाढूपणा केला जात आहे. समितीने सभापती, पंचायत समिती, उमरखेड यांना विचारणा केली की, ही समिती कोणाच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आली आहे ? सभापती, पंचायत समिती, उमरखेड यांनी याबाबत विदित केले की, सभापती (बांधकाम समिती) यांच्या अध्यक्षतेखाली ही समिती गठीत करण्यात आली आहे. समितीसमोर सर्व माहिती उपलब्ध आहे. महिलांच्या खात्यातून प्रॉडक्टच्या नावाखाली वजा झालेल्या रकमांचे देखील पुरावे आहेत. कोणताही खर्च करताना अवलंबावयाच्या पद्धती आहेत परंतु त्याला फाटा देत ही सर्व प्रक्रिया करण्यात आली आहे. या प्रकरणाची चर्चा होऊन चौकशी समिती स्थापन झाल्यानंतर सदर कंपनीने महिला बचत गटांच्या खात्यावर सुमारे पंधरा ते वीस लाख रुपये हस्तांतर (ट्रान्सफर) केले आहेत. जर त्यांचे प्रॉडक्ट आवश्यक व अस्सल होते तर त्यांनी हे पैसे परत का केले ? यातूनच प्रॉडक्टच्या खोटेपणावर शिक्कामोर्तब होते. तसेच कंपनी अर्थवेद-बायोटेक नावाचे प्रॉडक्ट विकत असली तरी डिजिटल व्यवहार (ट्रान्झॅक्शन्स) मात्र श्रेया बायोटेक कंपनीच्या नावे झालेले आहेत. तालुका अभियान व्यवस्थापक व इतर संबंधितांच्या खात्यावर श्रेया बायोटेक या कंपनीने व्यवहार (ट्रान्झॅक्शन्स) केल्याचे दिसून येत आहे. त्याचे पुरावे देखील आहेत. संपूर्ण जिल्ह्यात हा प्रकार घडलेला आहे. संपूर्ण देश बंद असताना या बाबी घडत होत्या. त्यामुळे या सर्व प्रकाराबाबत एफ.आय.आर. दाखल करून कारवाई करण्यात यावी. तद्नंतर जिल्हा परिषद अध्यक्ष यांनी विदित केले की, या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी समिती गठीत करण्यात आलेली आहे. दरम्यानच्या काळात आचारसंहितेमुळे विलंब झाला आहे. अहवाल सादर करण्याच्या दृष्टीने सदर समितीचे प्रयत्न सुरू आहेत.

समितीने जिल्हा परिषद अध्यक्षांना विचारणा केली की, बचत गटांना सदर कंपनीचे प्रॉडक्ट खरेदी करण्यासाठी सक्ती करण्यात आली आहे. तालुका व्यवस्थापक व इतर संबंधितांच्या खात्यांवर देखील कंपनीने पैसे पाठविले आहेत. ज्यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे ते बांधकाम समिती सभापती आजच्या बैठकीस उपस्थित आहेत काय? यावर जिल्हा परिषद अध्यक्ष यांनी विदित केले की, त्यांच्या नातेवाईकांचे लग्न असल्यामुळे ते आजच्या बैठकीस उपस्थित राहू शकले नाहीत. तद्नंतर समितीने सभापती, पंचायत समिती, उमरखेड यांना विचारणा केले की, या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी समिती कधी नेमण्यात आली आहे. यावर सभापती पंचायत समिती, उमरखेड यांनी खुलासा केला की, सदर समिती तालुकास्तरीय व माझ्या अध्यक्षतेखाली नेमावी अशी मी मागणी केली होती. कारण ही तक्रार आमच्याकडे आली होती व त्याची सविस्तर माहिती देखील आम्हाला आहे. त्यानुसार जिल्हा परिषद अध्यक्षांनी तालुकास्तरीय समिती नेमावी असे पत्र मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिले. त्यानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सहमती देखील दर्शविली. परंतु श्री.कुलकर्णी, प्रकल्प अधिकारी यांनी परस्पर जिल्हा परिषद स्तरावर समितीचे गठन केले. यामध्ये जिल्हा परिषद अध्यक्ष, मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा इतर कोणालाही विश्वासात घेतले गेले नाही. या सर्व गैरप्रकाराला त्यांचे पाठबळ आहे. यावर समितीने निदेश दिले की, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्वतः या प्रकरणाची चौकशी करून एक महिन्याच्या आत समितीला अहवाल सादर करण्यात यावा. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सहमती दर्शवली.

समितीने सभापती, पंचायत समिती, उमरखेड यांना विचारणा केली की, पंचायत समिती उमरखेडच्या अखत्यारित दानपत्र किंवा खरेदीपत्र शेतजमिनीची सद्यःस्थिती काय आहे. यावर सभापती, पंचायत समिती, उमरखेड यांनी समितीच्या निदर्शनास आणले की, उमरखेड पंचायत समितीच्या अखत्यारित २८ एकर शेतजमीन आहे. सदर शेतजमिनीचा ७/१२ मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या नावे आहे. सद्यस्थितीत २८ एकर जमिनीची किंमत कोटयवधी रुपये आहे. परंतु एका राजकीय पदाधिकाऱ्याने सदर जमिनीवर अतिक्रमण केले आहे. पंचायत समिती स्तरावर आम्ही एफआयआर दाखल करून ताबा घेण्याचा प्रयत्न केला परंतु ताबा मिळालेला नाही. हा विषय जिल्हा परिषद सभागृहामध्ये देखील आलेला असल्यामुळे सर्व अधिकारी व पदाधिकाऱ्यांना ज्ञात आहे. हे सर्व असूनही आजही खाजगी व्यक्तिचाच सदर जमिनीवर ताबा आहे. हराशी प्रक्रियेतून आपण त्यांना जमीन दिली होती. परंतु कोविडमुळे मागच्या वर्षी हराशी होऊ शकली नाही. अद्यापपर्यंत जमीन त्यांच्याच ताब्यात आहे. त्याजागी पंचायत समितीचा बोर्ड लावला असता त्यांनी तो उखडून फेकला आहे. तेथे त्यांनी ऊस शेती केली आहे. त्यामुळे सदर जमिनीचा ताबा घेतला पाहिजे. आपण आपल्या मालमत्तांचे रक्षण करणे गरजेचे आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, यामध्ये ४२ व ४३ क्रमांकाचे दोन गट आहेत. त्यापैकी एका गटाच्या ७/१२ वर मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे नाव आहे तर दुसऱ्या गटाच्या ७/१२ वर श्री देव असे नाव आहे. त्यांनी बऱ्याच वर्षांपूर्वी सदर जमिनीचे दानपत्र केलेले आहे असे जिल्हा परिषद व पंचायत समितीमधील अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. त्यावरुन मी ७/१२ व इतर कागदपत्रे मागवली होती. परंतु अभिलेखामध्ये दानपत्र किंवा खरेदीपत्राबाबतची कोणतीही माहिती आढळून आली नाही. तरीही आपण हराशी करीत होतो. तद्नंतर जि.प. उपाध्यक्ष यांनी विशद केले की, कोरोना साथीमुळे गेल्या वर्षी हराशी होऊ शकली नाही. त्यामुळे पहिल्या व्यक्तीचाच ताबा पुढे सुरू ठेवण्यात आला आहे. यावर्षी पुन्हा हराशी प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, ही जमीन क्लिअर टायटल नाही. तिचे टायटल आपल्या नावावर करून घेण्यासाठी देखील कोणताही पुरावा उपलब्ध नाही. समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांना विचारणा केली की, जमीन हराश केल्याची कागदपत्रे आपल्याकडे आहेत काय. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, जमीन हराश केल्याची कागदपत्रे उपलब्ध आहेत. यावर सभापती, पंचायत समिती, उमरखेड यांनी अधिकची माहिती दिली की, सदर व्यक्ती हराशी प्रक्रियेद्वारे स्वतःच्या नावावर जमीन न घेता इतर जवळच्या व्यक्तीच्या नावे घेते. त्यामुळे जमीन त्यांच्याच ताब्यात राहते. काही वर्षांपूर्वी गरजू व्यक्तींकडे सदर जमीन कसण्यासाठी होती. सन २०१४ पासून या जमिनीवर सदर व्यक्तीचा ताबा आहे. पंचायत समिती व जिल्हा परिषद स्तरावर त्यांच्या सोयीनुसार अधिकारी आल्यामुळे त्यांना हे आणखी सोपे झाले. सन १९९३ मधील न्यायालयाच्या आदेशानुसार दुसरा ७/१२ जिल्हा परिषदेच्या नावावर झाला पाहिजे.

यावर समितीने सभापती, पंचायत समिती, उमरखेड यांना विचारणा केली की, त्यावेळी न्यायालयामध्ये कोण गेले होते. सभापती, पंचायत समिती, उमरखेड यांनी विदित केले की, जिल्हा परिषदच न्यायालयामध्ये गेली होती. समितीने जिल्हा परिषद उपाध्यक्ष यांना विचारणा केली की, न्यायालयाच्या निर्णयाच्या आधारे कार्यवाही का केली जात नाही? यावर जिल्हा परिषद उपाध्यक्ष यांनी विदित केले की, सदर सर्व जमीन जिल्हा परिषदेचीच आहे व आपण हराशी प्रक्रियेद्वारे कसण्यासाठी ती देत असतो. समितीने जिल्हा परिषद उपाध्यक्षांना सुचित केले की, आपण सांगितल्याप्रमाणे सर्व जमीन जिल्हा परिषदेची आहे असे मानले तरीही प्रत्यक्षात अभिलेखामध्ये तशा नोंदी असणे आवश्यक आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले की एका गटातील जमीन श्री.देव यांच्या नावे आहे. यावर जिल्हा परिषद उपाध्यक्ष यांनी विदित केले की, श्री.देव हेच जमिनीचे मूळ मालक आहेत. त्यांनी आपल्याला जमीन दान दिली आहे. परंतु त्याचे दानपत्र मिळत नाही. ज्याअर्थी दानपत्र गायब झाले आहे त्याअर्थी यामध्ये प्रथमदर्शनी काहीतरी काळेबेरे दिसत आहे. या प्रकरणातील न्यायालयीन आदेशाची प्रत उपलब्ध आहे का? अशी समितीने विचारणा केली असता, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, सदर न्यायालयीन आदेशाची प्रत आमच्याकडे उपलब्ध नाही. याबाबत समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निदेश दिले की, न्यायालयीन आदेशाची प्रत मिळवून त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सहमती दर्शवली.

सभापती, पंचायत समिती, उमरखेड यांनी समितीच्या निदर्शनास आणले की, अंबाळी येथे पांदण रस्त्याचे काम झाले आहे. तेथील ग्रामस्थांनी सदर कामाबाबत तक्रार केली होती. त्या अनुषंगाने मी गटविकास अधिकाऱ्यांना पत्र दिले होते की, सदर कामाची चौकशी करून अहवाल सादर करण्यात यावा, परंतु त्यांनी अद्यापपर्यंत अहवाल दिलेला नाही. तसेच मुख्यमंत्री पेयजल योजनेंतर्गत पाणी पुरवठयाची कामे झाली. त्याबाबत देखील तक्रारी आहेत. त्यांचीही चौकशी करण्याबाबत वारंवार पत्रव्यवहार करुनही अद्यापपर्यंत काहीही कार्यवाही किंवा कारवाई झालेली नाही. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे देखील यासंदर्भात पत्रव्यवहार केलेला आहे. अशाच प्रकारचे एक काम तांडा वळकू या गावी करण्यात आले आहे. तांडा वस्ती सुधार योजनेंतर्गत श्री.कैलास तामडे आणि श्री. संतोष भुगारे यांच्या घराजवळ तांडा वस्तीतील रस्त्यांचे काम करण्यात आले आहे. सदर रस्ता हा एकूण ७६ मिटरचा होता त्यापैकी

७३ मिटरचा रस्ता करण्यात आला आहे. त्या कामाची देयके देखील अदा करण्यात आली आहेत. त्याच गावामध्ये २५१५ अंतर्गत एक रस्ता मंजूर करण्यात आला होता. त्या रस्त्याच्या बाजूला श्री.विशाल तामडे आणि श्री.भाऊराव चव्हाण यांची घरे आहेत. परंतु त्या रस्त्याचे काम न करता त्यांनी अजूबाजूच्या घराचे लोकेशन बदलून पूर्वीचा रस्ता दाखवून २५१५ मधील निधी उचलून घेतला आहे. याबाबतचे सर्व पुरावे माझ्याकडे आहेत आणि ते मी समितीला देऊ इच्छितो. यावर समितीने आपण दिलेल्या माहितीमध्ये आपल्या सर्व तक्रारींचा उल्लेख करण्यात आला आहे काय. अशी विचारणा केली असता सभापती, पंचायत समिती, उमरखेड यांनी विशद केले की, होय. या माहितीमध्ये सर्व तक्रारींचा उल्लेख करण्यात आला आहे. मी पुराव्याशिवाय एकही तक्रार करीत नाही किंवा केलेली नाही.

तद्नंतर जिल्हा परिषद उपाध्यक्ष यांनी समितीच्या निदर्शनास आणले की, पदाधिकारी जेव्हा अधिकाऱ्यांकडे काम घेऊन जातो, तेव्हा अधिकाऱ्यांने त्याबाबतची कार्यवाही लवकरात लवकर करणे अपेक्षित आहे. पंचायती राज समिती येत असल्यामुळे गेल्या एका महिन्यांपासून सर्व प्रशासन कामाला लागले आहे. मागील दहा वर्षातील प्रलंबित कामे निकाली काढण्यात आली आहेत. परंतु सामान्य माणसांच्या तक्रारी लोकप्रतिनिधींच्या माध्यमातून अधिकाऱ्यांकडे केल्या जातात, तेव्हा त्या तक्रारींवर कोणतीही कार्यवाही केली जात नाही. आमच्या मते लोकप्रतिनिधींनी दिलेल्या तक्रारीवर तात्काळ कार्यवाही होणे आवश्यक आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी हे जरी सकारात्मक काम करीत असले तरी तालुका स्तरावरील गट विकास अधिकारी व अन्य अधिकारी, अशा तक्रारीबाबत कोणतीही कार्यवाही करीत नाहीत. यावर समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सुचित केले की, आपल्या अखत्यारितील अधिकारी अशा प्रकारे काम करीत असतील तर आपण त्यांच्यावर योग्य ती कारवाई करणे अपेक्षित आहे. लोकप्रतिनिधींनी दिलेल्या तक्रारीवर कार्यवाही करणे आवश्यक आहे. यासंदर्भात सभापती, पंचायत समिती, उमरखेड यांनी आपले म्हणणे मांडले की, आम्ही अनेकवेळा पंचायत समिती व जिल्हा परिषदेकडे पत्र व्यवहार करतो. परंतु त्या पत्राचे कोणत्याही प्रकारचे उत्तर दिले जात नाही आणि काही वेळा तर आम्ही दिलेले पत्र देखील पाहिले जात नाही. समितीने सभापती, पंचायत समिती, उमरखेड यांना विचारणा केली की, अशी परिस्थिती कोरोनापूर्वी देखील होती काय? यावर सभापती यांनी खुलासा केला की, होय. उमरखेड ते यवतमाळ हे अंतर खूप जास्त आहे. त्यामुळे सर्वसामान्य माणसांचे काही काम असेल तर ते पंचायत समितीला येऊन सांगतात. त्यानंतर आम्ही आमचे लेटर जोडून व संबंधितांनी दिलेली सर्व माहिती जोडून ती सर्व माहिती संबंधित अधिकाऱ्याकडे पाठवितो. परंतु संबंधित अधिकारी आम्ही दिलेल्या माहितीकडे पाहत देखील नाही. त्यामुळे सदर काम वर्षानुवर्षे प्रलंबित राहते. आमची अपेक्षा अशी आहे की, आम्ही पाठविलेल्या पत्राच्या अनुषंगाने संबंधित अधिकाऱ्यांने उत्तर द्यावे. जर एखादे काम होत नसेल किंवा काही त्रुटी असतील तर तशी माहिती दिली तर आम्ही संबंधितांना सांगून त्रुटी दूर करु किंवा सदर काम होत नाही असे सांगू. जेणेकरुन संबंधित दहावेळा पंचायत समितीला येण्याची आवश्यकता भासणार नाही. समितीने नस्ती निपटारा कायद्यानुसार ७ दिवसांमध्ये उत्तर देणे आवश्यक आहे असे निदर्शनास आणले असता सभापती यांनी विशद केले की, हा कायदा फक्त कागदावरच आहे. एका नस्तीवर ६ महिने कार्यवाही केली जात नाही. समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सूचना केली की, याकडे लक्ष देण्यात यावे. यानंतर अशा प्रकारच्या तक्रारी समितीला प्राप्त होणार नाहीत, याची काळजी आपण घ्यावी. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी होकारार्थी सहमती दर्शवली.

जिल्हा परिषद अध्यक्ष यांनी समितीस अवगत केले की, पुसद तालुक्यातील एका गावामध्ये दलित वस्तीच्या कामामध्ये ग्रामसेवकांनी अफरातफर केलेली आहे. एकूण काम ६ लाख रुपयांचे होते. सदर काम कंत्राटदाराच्या माध्यमातून पूर्ण केले. परंतु संबंधित कंत्राटदाराला २ लाख ४० हजार रुपये देण्यात आलेले नाहीत. सदर २ लाख ४० हजार रुपये हे ग्रामसेवकांनी उचलून घेतले आहेत. समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निदेश दिले की, याबाबत चौकशी करून संबंधितांवर कारवाई करण्यात यावी. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विशद केले की, या प्रकरणाची चौकशी करून संबंधितांवर कारवाई करण्यात येईल.

समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांना विचारणा केली की, मुलांना पोलिओ समजून सॅनिटायझर पाजल्याप्रकरणी संबंधितावर काय कार्यवाही करण्यात आली आहे? यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, त्या ठिकाणी नवीन तालुका आरोग्य अधिकाऱ्याची (टीएचओची) नियुक्ती करण्यात आली होती. त्यांच्या हाताखाली आशा आणि अंगणवाडी सेविका काम करीत होत्या. जेव्हा पोलिओ डोस देण्यासाठी मुलं आले तेव्हा संबंधित टीएचओ मोबाईलवर बोलत होता. त्यांने बोलता बोलता अंगणवाडी सेविकेला सांगितले की, मुलांना डोस द्या. पोलिओ आणि सॅनिटायझरची पॅकींग सारखीच होती. संबंधित अंगणवाडी सेविकेने पोलिओ घेण्याऐवजी सॅनिटायझरची बॉटल घेऊन पोलिओ समजून मुलांना डोस दिला. उक्त प्रकरणी आशा वर्कर व अंगणवाडी सेविकेवर कारवाई केलेली आहे. समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांना विचारणा केली की, तालुका आरोग्य अधिकाऱ्यावर (टीएचओवर) कारवाई करणे अपेक्षित होते. सॅनिटायझर पाजलेल्या मुलांची तब्येत आता कशी आहे. सदर मुलांची तब्येत आता चांगली आहे असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्पष्ट केले.

माजी उपाध्यक्ष जिल्हा परिषद, यांनी समितीच्या निदर्शनास आणले की, या जिल्हा परिषदेच्या कामामध्ये मोठ्या प्रमाणावर अनियमितता होत आहे जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष व उपाध्यक्ष यांना कोणतेही अधिकार नाहीत. जिल्हा परिषदेच्या निवडणुका घेऊन फक्त शासनाचा पैसा वाया घालवत आहोत. आम्ही एखादी तक्रार केली तर त्या तक्रारीवर कोणत्याही प्रकारची कार्यवाही केली जात नाही. एखाद्या अधिकाऱ्यांनी कामामध्ये अनियमितता केल्यामुळे त्याबाबतची चौकशी सुरू असेल तर आयुक्तांना ५० हजार रुपये दिल्यानंतर सदर चौकशी थांबविली जाते. अशी अनेक उदाहरणे आहेत. आता उपस्थित असलेले सभापती पूर्वी पंचायत समिती सदस्य होते. त्यांना देखील न्याय देण्यात आला नाही. अशा प्रकारची अनियमितता केल्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी संबंधितांना निलंबित करतात व दोन महिन्यानंतर त्यांना पुन्हा सेवेत रुजू करून घेतले जाते. यापेक्षा संबंधित कर्मचारी किंवा अधिकाऱ्यांवर कोणतीही कारवाई केली जात नाही. लोकप्रतिनिधी हे फक्त ५ वर्षे पदावर राहतात. ५ वर्षानंतर दुसरे पदाधिकारी येतात. अशाच प्रकारचे काम होत असेल तर कोणत्याही सर्वसामान्य माणसांचे काम होणार नाहीत किंवा गरीबांचा विकास होणार नाही. समितीने माजी उपाध्यक्ष जिल्हा परिषद यांना विचारणा केली की, आपण किती वर्षे उपाध्यक्ष पदावर काम केलेले आहे. आपण पदावर कार्यरत असताना आपला कामाचा अनुभव काय आहे. माजी उपाध्यक्ष यांनी विदित केले की, मी ३ वर्षे उपाध्यक्ष पदावर काम केलेले आहे. माझ्या कार्यकाळामध्ये १०० कोटी रुपयांचा निधी अखर्चित राहिलेला आहे आणि १०० कोटी रुपये शासनास जमा केलेले आहेत. पदाधिकारी म्हणून आम्हाला काम करण्याचा कोणताही अधिकार नाही. अमुक-अमुक काम करा, असे आम्ही फक्त सूचवू शकतो. अनेक दिवस निधी पडून राहतो व आर्थिक वर्ष संपल्यानंतर तो निधी शासन खाती जमा करावा लागतो, यास कोण जबाबदार आहे. निधी उपलब्ध राहून देखील विकास कामे केली जात नाहीत. जिल्हा परिषदेच्या सभागृहामध्ये मांडलेला कोणताही ठराव आम्ही नामंजूर करीत नाही. यावर अध्यक्ष, जिल्हा परिषद यांनी विदित केले की, कामाची निविदा प्रक्रिया व कर्मचारी वर्ग कमी असल्यामुळे विकास कामे करण्यास अडचण निर्माण होत आहे. जिल्हा परिषदेमध्ये ४० टक्के पदे रिक्त आहेत. याबाबत माजी उपाध्यक्ष जिल्हा परिषद यांनी विशद केले की, कर्मचारी कमी आहेत, ही वस्तुस्थिती आहे. परंतु यापूर्वी देखील कर्मचारी कमी होते, तेव्हा विकास कामे झालेली आहेत. अनेक पंचायत समितीचे गट विकास अधिकारी हे प्रभारी पदावर काम करीत आहेत. समितीने उपाध्यक्ष यांना सुचित केले की, प्रभारी आहेत म्हणून त्यांनी काम करु नये, असे काही आहे काय? यावर उपाध्यक्ष यांनी विशद केले की, एका पंचायत समितीला एकच विस्तार अधिकारी आहे व त्यांच्याकडेच गट विकास अधिकाऱ्याचा प्रभार आहे. याबाबत माजी उपाध्यक्ष जिल्हा परिषद यांनी विदित केले की, या जिल्ह्यामध्ये फक्त २ गट विकास अधिकारी नियमित आहेत व उर्वरित १४ गट विकास अधिकारी प्रभारी आहेत. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्पष्ट केले की, काही नवीन गट विकास अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. आता ६ गट विकास अधिकारी प्रभारी आहेत.

सभापती, पंचायत समिती, उमरखेड यांनी समितीस विशद केले की, उमरखेड पंचायत समितीमध्ये एका ग्रामसेवकाला पदोन्नतीने विस्तार अधिकारी पदावर रुजू करून घेतले. त्यानंतर ३ महिन्यामध्ये त्यांना सहाय्यक गट विकास अधिकारी पदाचा प्रभार दिला आहे. एका बाजूला १५ वर्षे विस्तार अधिकारी पदावर सेवा करून देखील त्यांना सहाय्यक गट विकास अधिकाऱ्याचा प्रभार दिला नाही आणि यांना मात्र तीन महिन्यांमध्ये सहाय्यक गट विकास अधिकाऱ्याचा प्रभार दिला आहे. सदर प्रभार कोणत्या नियमानुसार देण्यात आला आहे? अशा प्रकारच्या नियुक्तीची माहिती सभापती म्हणून आम्हाला देखील दिली नाही. समितीला विनंती आहे की, समितीने उमरखेड पंचायत समितीला भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी करावी.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत माहिती मागविली.**

यवतमाळ जिल्ह्यातील उमरखेड तालुक्यातील जिवनोन्नती अभियान उमेद या अभियांनातर्गत शेतीसाठी महिला बचत गटातील महिलांना शासनाची कोणतीही परवानगी नसताना १५० ते २५० रुपयांची औषधे १००० ते ११०० रुपयांना विकण्यात आली आहे हे खरे आहे काय ? असल्यास याबाबत चौकशी करून दोषी असणाऱ्यांविरुद्ध कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे ? नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**उपरोक्त मुद्यासंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

पंचायत समिती उमरखेड अंतर्गत २४ ग्रामसंघ व ०१ स्वयं सहायता समुह यांनी शेतीसाठी सेंद्रिय औषधीची खरेदी श्रेया बायोटेक या कंपनी कडून केली होती. सदर खरेदी करण्याचा निर्णय हा ग्रामसंघ व स्वयं सहायता समुह यांच्या स्तरावर झालेला होता. या खरेदीबाबत सभापती, पंचायत समिती, उमरखेड यांची लेखी तक्रार प्राप्त झाल्यामुळे चौकशी समिती गठीत करण्यात आली होती. चौकशी समितीच्या अहवालानुसार असे निर्दशनास आले की, खरेदी करताना प्रभाग समन्वयक सत्यम साळवे व माधुरी दळवी यांनी

काही ग्रामसंघाना खरेदी करण्यासाठी सुचित केले होते. तसेच कोणत्याही स्वयं सहायता समुह व शेतकऱ्याची आर्थिक फसवणुक झालेली नाही असे अहवालावरून निदर्शनास येते .चौकशी अहवालानुसार ज्या बाबी निदर्शनास आल्या आहे त्यावरुन ग्रामसंघाना मार्गदर्शन करणारे प्रभाग समन्वयक सत्यम साळवे व माधुरी दळवी यांना त्यांची पुढील नियुक्ती ११ महिन्याऐवजी ०३ महिन्याकरीता देण्यात आलेली आहे. तसेच नितीन पुरी तालुका अभियान व्यवस्थापक यांची बदलीची शिफारस राज्य अभियान व्यवस्थापन कक्ष मुंबई यांना करण्यात आलेली आहे.

**मंत्रालयीन विभागाचे अभिप्राय**

**सार्वजनिक आरोग्य विभागाचे अभिप्राय :-** सदर प्रश्न सार्वजनिक आरोग्य विभागाशी संबधीत नाही.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने यवतमाळ जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १६ नोव्हेंबर, २०२१ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांना विचारणा केली की, यवतमाळ जिल्ह्यातील उमरखेड तालुक्यातील जिवनोन्नती अभियान उमेद या अभियानांतर्गत शेतीसाठी महिला बचत गटातील महिलांना शासनाची कोणतीही परवानगी नसताना १५० ते २५० रुपये किंमतीची औषधे १००० ते ११०० रुपयांना विकण्याची कारणे काय आहेत? यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, या विषया संदर्भात चौकशी करण्यात आली होती. चौकशी समितीने जो अहवाल दिला होता त्यानुसार जी खरेदी झाली होती, त्याबाबत तक्रार झाल्यानंतर जी कंपनी होती त्यांनी बचत गटाला ते पैसे परत केले. त्यांनी माल परत करून जो आर्थिक व्यवहार झाला होता तो नीट केला. त्यामध्ये तालुका अभियान व्यवस्थापकाचे सनियंत्रण आवश्यक होते. मात्र बचत गटांना त्यांचे मार्गदर्शन कुठे तरी कमी आहे असे दिसून आले. तेथील २ प्रभाग समन्वयकांची ११ महिन्यांची कंत्राटी पद्धतीची नियुक्ती होती, त्यांना ३ महिन्यांची नियुक्ती दिलेली आहे. त्यांच्या कामामध्ये सुधारणा व्हावी याकरिता त्यांना ३ महिन्यांची संधी देऊन नंतर पुनर्नियुक्ती आदेश देण्यात येईल. आम्ही चौकशी अहवालानुसार कारवाई केली आहे.

**अभिप्राय व शिफारशी :**

पंचायती राज समितीने दिनांक १६ ते १८ फेब्रुवारी, २०२१ या कालावधीत यवतमाळ जिल्हा परिषदेला भेट दिली. त्यावेळेस जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी व जिल्हा परिषदेच्या पदाधिकाऱ्यांसमवेत झालेल्या चर्चेत 'श्रेया बायोटेक या कंपनीने बचत गटातील महिलांना शेतीविषयक सेंद्रिय औषधी बाजार भावापेक्षा जास्त दराने विकून केलेला गैरव्यवहार, उमरखेड पंचायत समितीच्या अखत्यारीत असलेल्या २८ एकर शेतजमीनीवर झालेले अतिक्रमण, जिल्हा परिषदेच्या अधिकारी व कर्मचारी यांच्याकडून लोकप्रतिनिधींच्या पत्रांवर व सादर केलेल्या कामांवर योग्य प्रकारे होत नसलेली कार्यवाही, मुलांना पोलीओ लसच्या ऐवजी सॅनिटायझरचा डोस दिल्याबाबत' या महत्वांच्या विषयांसह अन्य विषयांवर चर्चा झाली. या चर्चेच्या अनुषंगाने समितीस जिल्हा परिषदेकडून व विभागीय सचिवांच्या साक्षीत प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने समिती विषयनिहाय खालीलप्रमाणे शिफारशी करीत आहे.

श्रेया बायोटेक या कंपनीने बचत गटातील महिलांना शेतीविषयक सेंद्रिय औषधी बाजार भावापेक्षा जास्त दराने विकून केलेला गैरव्यवहार : पंचायत समिती उमरखेड यांनी राबविलेल्या महाराष्ट्र राज्य ग्रामीण जिवनोन्नती अभियान-उमेद अंतर्गत श्रेया बायोटेक या कंपनीकडून शेती विषयक सेंद्रिय औषधांची विक्री करण्यात आली. सदर औषधांची किंमत बाजारात १५० ते २०० रूपये असताना बचत गटातील महिलांना १००० ते ११०० रूपयांना विकून त्यांची १५ ते २० लाख इतक्या रूपयांची अर्थिक फसवणूक करण्यात आली आहे. या प्रकरणाबाबत उमरखेड पंचायत समितीचे सभापती यांनी तक्रार सादर करून चौकशी करण्याची मागणी केली असता, तालुकास्तरावर चौकशी समिती नेमणे आवश्यक असताना जिल्हास्तरावर समिती गठीत करण्यात आली. चौकशी समिती स्थापन झाल्यानंतर सदरहू रक्कम कंपनीकडून महिला बचट गटांच्या खात्यांवर हस्तांतरीत करण्यात आली. जिल्हा परिषदेकडून व विभागीय सचिवांच्या साक्षीत प्राप्त झालेल्या माहितीनुसार २४ ग्रामसंघ व ०१ स्वयं सहायता समुह यांनी शेतीविषयक सेंद्रीय औषधांची श्रेया बायोटेक या कंपनीकडून खरेदी केली होती. प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने गठीत केलेल्या चौकशी समितीच्या अहवालानुसार खरेदी करताना प्रभाग समन्वयक सत्यम साळवे व माधुरी दळवी यांनी काही ग्रामसंघाना खरेदी करण्यासाठी सुचित केले होते. त्यामुळे त्यांची पुढील नियुक्ती ११ महिन्याऐवजी ०३ महिन्याकरीता करण्यात आलेली आहे. तसेच नितीन पुरी तालुका अभियान व्यवस्थापक यांच्या बदलीची शिफारस राज्य अभियान व्यवस्थापन कक्ष, मुंबई यांना करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जिवनोन्नती अभियान-उमेद अंतर्गत तळागाळातील गरीबांसाठी मजबूत अशा संस्थांची बांधणी करून त्याव्दारे लाभदायक स्वयंरोजगार व कुशल वेतनी रोजगाराची संधी मिळविणे गरीब कुटुंबांना शक्य व्हावे व त्याव्दारे दारिद्र्य कमी करणे, परिणामी कायमस्वरूपी तत्वावर त्यांच्या उपजिविकेत उल्लेखनीय सुधारणा करणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे. उमेद अभियानाच्या माध्यमातून उपजीविका वृद्धी या कार्यक्रमांतर्गत ग्रामीण भागातील कुटुंबांना शाश्वत उपजीविकेकडे वाटचाल करण्यास मदत करणे यासह कौशल्य वृद्धीव्दारे त्यांच्या कुटुंबाच्या उन्नतीस सहाय्य करणे हा महत्वाचा भाग असून गावातील महिलांना अर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यासाठी प्रयत्न करून त्यांना त्यांचे हक्क मिळून देण्याचे काम या अभियानांतर्गत होणे अपेक्षित आहे. यासाठीच राज्यातील सर्वात कमी मानवी विकास निर्देशांक असलेल्या जिल्ह्यामध्ये सदरहू अभियान राबविण्यात येते. ग्रामीण कुटुंबाचे मुख्य उपजीविकेचे साधन शेती व शेती आधारित पूरक व्यवसाय आहेत. त्याअनुषंगाने शेती असलेल्या कुटुंबाचे उत्पन्न वाढीसाठी मार्गदर्शन करण्याचे काम या अभियानातील प्रभाग समन्वयक व तालुका अभियान व्यवस्थापक यांनी प्रामाणिकपणे व जबाबदारीने करून सदरहू अभियान यशस्वी करणे आवश्यक होते. परंतु पंचायत समिती उमरखेड यांनी राबविलेल्या महाराष्ट्र राज्य ग्रामीण जिवनोन्नती अभियान-उमेद अंतर्गत कार्यरत असलेल्या अभियान व्यवस्थापक व प्रभाग समन्वयक यांनी त्यांची जबाबदारी योग्यरित्या पार पाडलेली नाही. श्रेया बायोटेक या कंपनीच्या शेती विषयक सेंद्रिय औषधांमध्ये काही चुकीची नसते अथवा जास्त नफा घेवून विक्री केलेली नसते व या व्यवहारात काहीही चुकीचे झालेले नसते तर कंपनीने त्यांचा माल परत घेवून सर्व महिलांचे लाखो रूपयांची रक्कम परत केली नसती. म्हणजेच या प्रकरणात काहीतरी गैरप्रकार झाला असल्याचे समितीचे मत आहे. असे असताना नुसती किरकोळ स्वरूपाची कारवाई करून प्रकरण बंद करणे योग्य नाही. सर्वसामान्यांसाठी राबविण्यात येत असलेली कोणतीही योजना व अभियान यशस्वीरित्या राबवून **शासनाचे उद्दीष्ट साध्य होण्याच्या मार्गात अप्रमाणिकपणे काम करून अडथळा निर्माण करून गोरगरीबांची आर्थिक फसवणूक होत असल्यास संबंधितांवर कारवाई होणे अत्यावश्यक आहे. या प्रकरणात विभागीय सचिवांनी सांगितल्याप्रमाणे दोषी आढळून आलेल्या तीन व्यक्तींना तीन महिन्यासाठी पुनर्नियुक्ती देण्यात आल्याचे साक्षीच्या वेळी सांगीतले. ही बाब अत्यंत गंभीर असून या प्रकरणी योग्य कार्यवाही झाली नाही असे समितीचे स्पष्ट मत आहे. यासाठी या अभियानातील व्यवस्थापक व प्रभाग समन्वयक यांच्यावर देखील कठोर कारवाई होणे आवश्यक असून त्यांचे वैयक्तिक बँकेतील खाते व श्रेया बायोटेक कंपनी यांच्यात अर्थिक व्यवहार झाले आहेत काय, किंवा कसे यासह या प्रकरणाची सविस्तरपणे पुर्नतपासणी करून चुकीचे काही आढळून आल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात यावी व याबाबतचा अहवाल समितीस तीन महिन्याच्या आत सादर करावा, अशी समिती शिफारस करीत आहे.**

उमरखेड पंचायत समितीच्या अखत्यारीत असलेल्या २८ एकर शेतजमीनीवर झालेले अतिक्रमण : उमरखेड पंचायत समितीच्या अखत्यारीत २८ एकर शेतजमीन आहे यामध्ये ४२ व ४३ क्रमाकांचे दोन गट आहेत. त्यापैकी एका गटाच्या ७/१२ वर मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे नाव आहे तर दुसऱ्या गटाच्या ७/१२ वर श्री देव यांचे नाव असून त्यांनी बऱ्याच वर्षापूर्वी सदर जमीनीचे दानपत्र केलेले आहे. परंतु अभिलेख्यांमध्ये दानपत्र किंवा खरेदीपत्राबाबत कोणतीही माहिती आढळून येत नाही. परंतु जिल्हा परिषदेकडून या जमीनीची हऱ्हाशी करण्यात येते. जमीन हऱ्हाशी करण्याबाबतची सर्व कागदपत्रे उपलब्ध आहेत. या जमीनीवर एका व्यक्तीने अतिक्रमण केले असून त्याने सदर जमिनीवरील पंचायत समितीचा फलकही काढून टाकलेला आहे. जिल्हा परिषदेने सदर प्रकरण मा. न्यायालयात दाखल केले असता याबाबत सन १९९३ मध्ये आदेश झालेले आहेत.

**या शेत जमीनीतील एका गटाच्या ७/१२ वर मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे नाव असून दुसऱ्या ७/१२ वर श्री देव यांचे नाव आहे. या जमीनीचे दानपत्र किंवा खरेदीपत्राची अभिलेख्यांमध्ये नोंद आढळून येत नाही. परंतु वर्षानुवर्ष जिल्हा परिषदेकडून या जमीनीची हऱ्हाशी करण्यात येत असून याबाबतची सर्व कागदपत्रे उपलब्ध आहेत म्हणजेच सदरहू जमीन जिल्हा परिषदेच्या मालकीची असून याबाबत अद्यापपर्यंत कोणीही हरकत घेतलेली नाही. असे असताना एखादा खाजगी व्यक्ती अतिक्रमण करत असेल तर कायद्यानुसार योग्य ती कार्यवाही जिल्हा परिषदेकडून करणे आवश्यक आहे. यासाठी सन १९९३ मध्ये मा. न्यायालयाने दिलेल्या आदेशाची प्रत मिळविण्यासह या शेत जमीनीचे अन्य महत्वाचे दस्ताऐवज प्राप्त करून खाजगी व्यक्तीच्या नावांवरील जमीनीची नोंद रद्द करून घेण्याच्या दृष्टीने जिल्हा परिषदेने योग्य ती कार्यवाही तातडीने करावी. तसेच या कागदपत्रांच्या सहाय्याने सदरहू जमीन जिल्हा परिषदेच्या नावावर करण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्याच्या आत सादर करावी अशी समिती शिफारस करीत आहे.**

जिल्हा परिषदेच्या अधिकारी व कर्मचारी यांच्याकडून लोकप्रतिनिधींच्या पत्रांवर व सादर केलेल्या कामांवर योग्य प्रकारे होत नसलेली कार्यवाही : जिल्हा परिषदेच्या व पंचायत समितींच्या लोकप्रतिनिधींकडून अधिकारी/कर्मचारी यांच्याकडे सादर करण्यात आलेल्या कामांवर तातडीने कोणतीही कार्यवाही करण्यात येत नाही. सर्व सामान्यांच्या तक्रारी लोकप्रतिनिधींच्या माध्यमातून सादर करण्यात आलेल्या असतानाही तालुका स्तरावरील व अन्य वरिष्ठ अधिकारी यावर कोणतीही कार्यवाही करत नाहीत. लोकप्रतिनिधींकडून पंचायत समिती व जिल्हा परिषदेकडे केलेल्या पत्रव्यवहाराची कोणतीही दखल न घेता सदर पत्र/अर्ज/निवेदनास उत्तर दिले जात नाही. अशा प्रकारच्या तक्रारी अनौपचारिक चर्चेच्या दरम्यान लोकप्रतिनिधींनी समितीकडे मांडल्या.

ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास करण्याच्या दृष्टीने शासनाच्या विविध योजना राबविण्यात येत असताना या कामांसंदर्भात लोकप्रतिनिधींसह सर्वसामान्यांकडून करण्यात येत असलेल्या सूचना व तक्रारी संदर्भातील पत्र/अर्ज व निवेदनांवर अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून तातडीने कार्यवाही होणे अत्यावश्यक आहे. याच अनुषंगाने लोकप्रतिनिधींना सन्मानाची व सौजन्याची वागणूक देण्यासह त्यांच्याकडून प्राप्त झालेल्या पत्र/अर्ज/निवेदनांवर सत्वर कार्यवाही करणे इत्यादीसंदर्भात मार्गदर्शक सूचना शासन परिपत्रकान्वये सर्व शासकीय/निमशासकीय कार्यालयांना शासनाकडून दिलेल्या असतानाही या जिल्ह्यातील जिल्हा व पंचायत स्तरावरील अधिकारी/ कर्मचारी यांच्याकडून याबाबतचे पालन करण्यात येत नाही.

**सदरहू बाब निश्चितच गंभीर स्वरूपाची असल्याने शासनाने वेळोवेळी शासन निर्णयान्वये निर्गमित केलेल्या "मार्गदर्शक सूचनांचे/ आदेशांचे सर्वांनी तंतोतंत पालन करावे. यात कुचराई/टाळाटाळ केल्यास संबंधित अधिकारी/ कर्मचारी यांच्याविरूद्ध शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ च्या कलम १० (२) व (३) अनुसार तसेच महाराष्ट्र नागरी सेवा नियमानुसार शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात यावी व त्यानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी परिपत्रक निर्गमित करावे, याप्रकरणी नियमानुसार काम न करणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्यात यावी, याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्याच्या आत सादर करावी, अशी समिती शिफारस करीत आहे.**

मुलांना पोलीओ लसच्या ऐवजी सॅनिटायझरचा डोस दिल्याबाबत : नवीन तालुका आरोग्य अधिकाऱ्याची (टीएचओ) नियुक्ती करण्यात आली होती त्यांच्या अंतर्गत आशा वर्कर आणि अंगणवाडी सेविका काम करीत होत्या. पोलिओ लस घेण्यासाठी मुलं आली असता संबंधित आरोग्य अधिकारी (टीएचओ) भ्रमणध्वनीवर बोलत होते व त्यांनी अंगणवाडी सेविकेला डोस देण्यास सांगितले. त्या अंगणवाडी सेविकेने पोलिओ लस देण्याऐवजी सॅनिटायझर त्या मुलांना दिले. या प्रकरणात आशा वर्कर व अंगणवाडी सेविका यांच्यावर कारवाई करण्यात आलेली आहे. वास्तविक या प्रकरणात असे निदर्शनास येते की, पोलिओची लस लहान मुलांना देण्याच्या महत्वाच्या कामात तालुका आरोग्य अधिकारी यांच्याकडून सूचना झालेल्या असताना, आशा वर्कर व अंगणवाडी सेविका यांनी सॅनिटायझर व पोलीओ डोस यातील फरक ओळखणे आवश्यक होते. सदरहू घटना अतिशय गंभीर स्वरूपाची असून याकडे दुर्लक्ष करून कारवाई न करणे निश्चितच योग्य नाही असे समितीचे स्पष्ट मत आहे. सॅनिटायझर ही मोठी बॉटली असते तर पोलीओ डोस छोटया बॉटलीमधून दिला जातो अशा वेळी डोस देणाऱ्याकडून निष्काळजीपणा होणे हे गंभीर आहे. या प्रकरणी प्रशासनाकडून योग्य ती कारवाई झालेली आहे. याबाबत समिती समाधान व्यक्त करते.

## प्रकरण दोन

## जिल्हा परिषद, यवतमाळ

### सेस फंडाची रक्कम जिल्हा परिषद व पंचायत समित्यांना निर्धारित वर्षात वितरीत करण्याच्या दृष्टीने धोरणात्मक निर्णय घेण्याबाबत.

पंचायती राज समितीने दिनांक १६ ते १८ फेब्रुवारी,२०२१ या कालावधीत यवतमाळ जिल्हा परिषदेस भेट दिली. भेटीच्या वेळी सन २०११-१२ व २०१७-१८ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान यवतमाळ जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने सेस फंडाची रक्कम जिल्हा परिषद व पंचायत समित्यांना निर्धारित वर्षात वितरीत करण्यासंदर्भात मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना विचारणा केली की, सन २०११-१२ या वर्षात जिल्हा परिषदेला वाढीव उपकराची किती रक्कम प्राप्त झाली आहे, प्राप्त रक्कम संबंधित पंचायत समितींना वितरीत करण्यात आली आहे काय ? यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी खुलासा केला की, सन २०११-१२ या वर्षात जिल्हा परिषदेला १७ लाख ५४ हजार ६७६ इतकी वाढीव उपकराची रक्कम प्राप्त झाली आहे. सर्व रक्कम संबंधित पंचायत समित्यांना वितरित करण्यात आली आहे. समितीने पुढे मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना विचारणा केली की, सन २०११-१२ आणि सन २०१७-१८ या वर्षात वाढीव उपकराची रक्कम ज्या प्रमाणात पंचायत समित्यांना प्राप्त होणे आवश्यक होते, त्या प्रमाणात सदर रक्कम प्राप्त न झाल्यामुळे जिल्ह्यातील अनेक पंचायत समित्यांना योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करता आली नाही. जिल्हा परिषदेने सदर रक्कम संबंधित पंचायत समित्यांना का प्राप्त करुन दिली नाही, याची कारणे काय आहेत? यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी विशद केले की, सन २०११-१२ या वर्षात जिल्हा परिषदेला रूपये १७ लाख ५४ हजार इतकी वाढीव उपकराची रक्कम प्राप्त झाली होती. जेवढा निधी जिल्हा परिषदेस प्राप्त झाला होता तेवढा निधी संबंधित पंचायत समित्यांना वितरित करण्यात आला आहे. सन २०११-१२ या वर्षात वाढीव उपकराची रक्कम अतिशय कमी प्राप्त झाली होती. सदर निधी हा जिल्हाधिकारी यांचे मार्फत प्राप्त होतो. जिल्हाधिकारी यांच्या सूचनेनुसार सदर निधीचे वाटप करण्यात आले आहे. तसेच सन २०१७-१८ या वर्षात जिल्हा परिषदेला रुपये ३० लाख इतकी वाढीव उपकराची रक्कम प्राप्त झाली होती. सदर निधी पंचायत समिती वणी आणि पंचायत समिती मारेगांव या पंचायत समित्यांना वितरीत करण्यात आला आहे.

समितीने मत व्यक्त केले की, जिल्हा परिषदेने जिल्हाधिकारी कार्यालयाकडे वाढीव उपकराचा निधी प्राप्त करुन घेण्यासाठी वेळोवेळी पाठपुरावा करणे आवश्यक आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाकडून वाढीव उपकराची रक्कम अनेक पंचायत समित्यांना वर्षाच्या शेवटी प्राप्त होत आहे. त्यामुळे पंचायत समित्यांना सदर निधी त्याच वर्षात खर्च करता येत नाही. ही परिस्थिती सर्वत्र दिसून येत आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाकडून वेळेवर निधी उपलब्ध होत नाही. जिल्हाधिकारी यांच्या निदर्शनास हि बाब आणून देखील वेळेवर निधी प्राप्त होत नसेल तर याबाबत ग्रामविकास विभाग व वित्त विभागाच्या सचिवांची साक्ष घेण्यात येईल. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, वाढीव उपकराची रक्कम आयुक्त यांच्यामार्फत वितरित करण्यात येते. सदर निधी प्राप्त करण्यासाठी वेळोवेळी जिल्हाधिकारी यांच्याकडे पत्रान्वये पाठपुरावा केलेला आहे. जिल्हा परिषदेने मागणी केलेल्या निधीच्या तुलनेत अतिशय कमी निधी दिला जातो. त्यामुळे सर्व पंचायत समित्यांना निधी प्राप्त करुन देणे शक्य होत नाही. समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सूचना केली की, सदर बैठकीचे कार्यवृत्त आपणाकडे प्राप्त झाल्यानंतर सदरहू कार्यवृत्त आयुक्त यांना पाठविण्यात यावे. त्यावर त्यांनी काय कार्यवाही केली याबाबतची माहिती समितीला अवगत करण्यात यावी. याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सहमती दर्शवली.

समितीने मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना विचारणा केली की, जिल्हा परिषदेचे स्वतःचे उत्पन्न किती आहे? यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी खुलासा केला की, सामान्य उपकर, वाढीव उपकर, मुद्रांक शुल्क अनुदान, जिल्हा निधीवरील व्याज, सार्वजनिक बांधकाम व अन्य स्त्रोताचे उत्पन्न मिळून या वर्षी जिल्हा परिषदेचे २१ कोटी रुपयांचे बजेट आहे. समितीने मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना विचारणा केली की, जिल्हा परिषदेचे निव्वळ स्वतःचे उत्पन्न किती आहे? यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी विशद केले की, जिल्हा परिषदेचे निव्वळ स्वतःचे ६ कोटी रुपये इतके उत्पन्न आहे.

समितीने मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना सूचना केली की, जिल्हा परिषदेच्या उत्पन्नात वाढ करणे आवश्यक आहे. भारत एकीकडे आत्मनिर्भरतेकडे वाटचाल करीत आहे. त्याप्रमाणे जिल्हा परिषदेने देखील आत्मनिर्भर होणे आवश्यक आहे. आपण किती वर्षे शासनाच्या निधीवर अवलंबून राहणार आहात? सर्व पंचायत समित्यांनी स्वतःचे उत्पन्न वाढविले तरच जिल्हा परिषदेच्या उत्पन्नात वाढ होईल. ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेने स्वतःच्या उत्पन्नात चांगली वाढ केली तर कोणत्याही कामासाठी आपणास शासनावर अवलंबून राहण्याची आवश्यकता नाही. स्वतःचे उत्पन्न वाढविण्यासाठी चांगले प्रयत्न केले तर नक्कीच यामध्ये बदल होईल आणि त्याचा महाराष्ट्राला देखील फायदा होईल. जिल्ह्यामध्ये जिल्हा परिषदेच्या अनेक जमिनीवर अतिक्रमण झालेले

आहे. त्या सर्व जमिनी जिल्हा परिषदेच्या नावे करुन त्या जमिनी विकसित केल्यास त्यातून जिल्हा परिषदेला मोठ्या प्रमाणावर महसूल प्राप्त होईल. यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी विदित केले की, जिल्हा परिषदेचे उत्पन्न वाढविण्यासाठी आम्ही अनेक उपाययोजना करीत आहोत. जिल्हा परिषदेचे उत्पन्न वाढीकडे यापुढे विशेष लक्ष देण्यात येईल. समितीने जिल्हा परिषदेच्या उत्पन्न वाढीसाठी केलेल्या सूचनांची जिल्हा परिषदेमार्फत आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

समितीने पुढे मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना विचारणा केली की, यवतमाळ जिल्हा परिषदेकडे जमा असलेल्या रकमेवर व गुंतवणूक केलेल्या रकमेवर किती व्याज प्राप्त होत आहे? मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी विशद केले की, सर्व प्रकारच्या गुंतवणुकीवर जिल्हा परिषदेस एकूण ३ कोटी २८ लाख रुपये एवढे व्याज प्राप्त होत आहे. यावर समितीने मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना विचारणा केली की, जिल्हा परिषदेस प्राप्त होणारी व्याजाची रक्कम अतिशय कमी असल्याची कारणे काय आहेत, व्याजाच्या रकमेत वाढ करण्यासाठी कोणती उपाययोजना करण्यात आली आहे ? यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी विशद केले की, यावर्षी गुंतवणूक करण्यास विलंब झाल्यामुळे सदर व्याज कमी प्राप्त झाले आहे. व्याजाच्या रकमेत वाढ करण्यासाठी नक्की प्रयत्न करु. मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्या उत्तरावर समितीने सहमती दर्शवली.

समितीने निदेश दिले की, सेस फंडाची रक्कम जिल्हा परिषद व पंचायत समित्यांना वेळेवर मिळत नसल्यामुळे सामाजिक न्याय विभागाची २० टक्के रक्कम, महिला व बाल कल्याण विभागाची १० टक्के रक्कम व दिव्यांगासाठी ०३ टक्के रक्कमेचे अनुदान निर्धारित वर्षात वितरित करता येत नाही. त्यामुळे या कल्याणकारी योजना राबविण्यासाठी अडचणी निर्माण होत आहेत. राज्याच्या दृष्टीने हा विषय अतिशय महत्त्वाचा आहे. सदर योजना राबविण्यासाठी वेळेवर निधी प्राप्त होणे आवश्यक आहे. अनेक वर्षापासून सदर निधी वेळेवर प्राप्त होत नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे. त्यामुळे या विषयाच्या संदर्भात विभागीय सचिवांची साक्ष घेऊन याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यात येईल.

उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.

सेस फंडाची रक्कम जिल्हा परिषद व पंचायत समित्यांना निर्धारित वर्षांत वितरीत करण्यासाठी घेण्यात येणाऱ्या धोरणात्मक निर्णयाची सद्यस्थिती काय आहे?

उपरोक्त मुद्यासंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.

मा.पंचायती राज समितीने विहीत केल्याप्रमाणे शासन स्तरावरुन जिल्हा परिषद सेस (वाढीव उपकर) च्या रकमा गेल्या काही वर्षांपासून कमी प्रमाणात प्राप्त होत आहे. त्या नियमीत आणि मागणीप्रमाणे मिळणे आवश्यक आहे. जिल्हा परिषद यवतमाळला मिळालेल्या रक्कमांचा गोषवारा खालील प्रमाणे

| अ.क्र | सन | अनुदानाचा प्रकार | जिल्हा परिषद | पंचायत समिती |
|---|---|---|---|---|
| १. | २०१६-२०१७ | जि.प.वाढीव उपकर अधि.१९६१ कलम १५५ | २०३२४४९ | |
| | | पं.स. वाढीव उपकर अधि.१९६१ कलम १५५ | | २०३२४४९ |
| २. | २०१७-२०१८ | जि.प.वाढीव उपकर अधि.१९६१ कलम १५५ | ३०००००० | |
| | | पं.स. वाढीव उपकर अधि.१९६१ कलम १५५ | | ३०००००० |
| ३. | २०१८-२०१९ | जि.प.वाढीव उपकर अधि.१९६१ कलम १५५ | १६१०४१८ | |
| | | पं.स. वाढीव उपकर अधि.१९६१ कलम १५५ | | १६१०४१८ |

**मंत्रालयीन विभागाचे अभिप्राय** :- अभिप्राय नाहीत.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने यवतमाळ जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १६ नोव्हेंबर, २०२१ रोजी विभागीय सचिवांची साक्ष आयोजित करण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने अपर मुख्य सचिव, महसूल विभाग यांना विचारणा केली की, जिल्हाधिकारी यांच्याकडून सेस फंडाची रक्कम विलंबाने उपलब्ध होत असल्यामुळे सेस फंडाची रक्कम जिल्हा परिषद व पंचायत समित्यांना निर्धारित वर्षात वितरित करण्यात येत नाही. यासंदर्भात कोणती कार्यवाही करण्यात आली आहे. यावर अपर मुख्य सचिव, महसूल विभाग यांनी खुलासा केला की, मुद्रांक शुल्काचे पैसे बजेटमधून दिले जातात. त्यामुळे तो निधी बजेटमध्ये रेस करावा लागतो. ग्रामविकास

विभागाच्या बजेटमध्ये वित्त विभाग सदर निधी रिलिज करतो. त्यामुळे हा विषय महसूल विभागाशी संबंधित नाही. जेवढा निधी जमा होतो त्याबाबतची सर्व माहिती वित्त विभागाला अवगत केली जाते. कारण तो निधी ट्रेझरीमध्येच जमा होतो. जमीन महसूल संबंधित असलेला निधी जिल्हाधिकारी देतात व मुद्रांक शुल्क संबंधित असलेला निधी मुद्रांक जिल्हाधिकारी देतात. हा सर्व निधी वित्त विभागाकडे जातो. मुद्रांक शुल्काचा एक टक्क भाग बजेटनुसार उपलब्ध करून दिला जातो.

**अभिप्राय व शिफारशी :**

पंचायती राज समितीने दिनांक १६ ते १८ फेब्रुवारी, २०२१ या कालावधीत यवतमाळ जिल्हा परिषदेस भेट दिली. त्यावेळेस सन २०११-२०१२ व सन २०१७-२०१८ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालासंदर्भात जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेली माहिती व त्यानुषंगाने झालेल्या चर्चेत समितीच्या निदर्शनास आले की, सन २०११-२०१२ व सन २०१७-२०१८ या वर्षात वाढीव उपकराची रक्कम ज्या प्रमाणात प्राप्त होणे आवश्यक होते त्याप्रमाणात सदर रक्कम प्राप्त न झाल्याने जिल्ह्यातील पंचायत समित्यांना योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करता आली नाही. जिल्हाधिकारी कार्यालयाकडे वाढीव उपकराचा निधी प्राप्त करून घेण्यासाठी वेळोवेळी पाठपुरावा करूनही जिल्हाधिकाऱ्यांकडून मागणी केलेल्या निधीच्या तुलनेत अतिशय कमी प्रमाणात निधी प्राप्त होत असल्याने सर्व पंचायत समित्यांना निधी उपलब्ध करून देणे शक्य होत नाही. तसेच सदरहू निधी वेळेत प्राप्त न होता वर्षाच्या शेवटी प्राप्त होत असल्याने त्याच वर्षात निधी खर्च करता येत नाही. वर्धा जिल्हा परिषदेचे सामान्य उपकर, वाढीव उपकर, मुद्रांक शुल्क अनुदान जिल्हा निधीवरील व्याज, सार्वजनिक बांधकाम व अन्य स्त्रोताचे उत्पन्न मिळून जवळपास २१ कोटी रूपयांचे बजेट असून जिल्हा परिषदेचे निव्वळ स्वतःचे उत्पन्न फक्त सहा कोटी रूपये इतके आहे. यासाठी शासनाने जमीन महसूल उपकर, वाढीव उपकर व मुद्रांक शुल्काचे अनुदान विहित वेळेत मागणी केल्यानुसार उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

ग्रामीण भागातील जनतेचे सामाजिक व शैक्षणिक जीवनमान उंचवावे यासाठी त्यांच्या उन्नतीसाठी जिल्हा परिषदेकडून राबविण्यात येणाऱ्या विविध शिष्यवृत्ती शैक्षणिक आर्थिक विकासाच्या योजना, २० % जिल्हा परिषदेच्या सेस फंडातून वैयक्तिक लाभ/अर्थसहाय्य सामुहीक विकासाच्या योजना, ५ % जिल्हा परिषदेच्या सेस फंडातून दिव्यांगांच्या कल्याणकारी योजना, अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्तीचा विकास करण्याच्या दृष्टीने राबविण्यात येणाऱ्या योजनांसाठी तसेच ग्रामीण भागातील सार्वजनिक शौचालये, पाणीपुरवठा करणाऱ्या विहिरींची दुरूस्ती, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, रस्ते, जोडरस्ते, गटारे/नाले बांधकाम, पथदीवे यासह वीज पुरवठा संदर्भातील कामे, साकव व पुलांची दुरूस्ती यासह मुलभूत सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक निधी वेळोवेळी मिळणे आवश्यक असल्याने संबंधित जिल्हा परिषद आर्थिक दृष्टया सक्षम असणे गरजेचे आहे.

संपूर्ण देश व सर्व राज्य आत्मनिर्भरतेकडे वाटचाल करीत असताना राज्यातील सर्व जिल्हा परिषदांनी देखील शासनाकडून प्राप्त होणाऱ्या निधीवर पूर्णपणे अवलंबून न रहाता स्वतःच्या उत्पन्नात वाढ करण्याच्या दृष्टीने योग्य त्या उपाययोजना करून आत्मनिर्भर **होण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. यासाठी प्रत्येक ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषदेने चांगले प्रयत्न करून स्वतःच्या उत्पन्नात वाढ केल्यास राबविण्यात येणाऱ्या योजनांनाही विहित वेळेत पुरेशा प्रमाणात निधी उपलब्ध होईल. यामुळे राज्याची आर्थिक समृद्धी होऊन राज्याचा विकास होईल असे समितीचे मत आहे. जिल्हा परिषदेकडे त्यांच्या स्वतःच्या मालकीच्या असलेल्या जमिनींचा आढावा घेऊन ज्या जमिनीवर अतिक्रमण झालेले आहे तेथे कायदेशीर कार्यवाही करून अतिक्रमण निष्काशीत करण्यासह त्या सर्व जमिनी जिल्हा परिषदेच्या नावावर करून विकसीत केल्यास त्या माध्यमातून जिल्हा परिषदेला मोठ्या प्रमाणात महसूल प्राप्त होईल. तसेच जिल्हा परिषदेकडे जमा असलेल्या रक्कमा विलंब न करता योग्य प्रकारे गुंतवणूक केल्यास व्याजाच्या रकमेत वाढ होऊन मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध होऊ शकेल. अशा पद्धतीने योग्य त्या उपाययोजना करून जिल्हा परिषदेचे स्वत:चे उत्पन्न वाढविण्यासाठी कार्यवाही करावी व त्यानुषंगाने वाढलेले उत्पन्न याबाबतची सविस्तर माहिती समितीस तीन महिन्याच्या आत सादर करावी, अशी समिती शिफारस करीत आहे.**

**तसेच वित्त विभागाकडून जमिन महसूल उपकर, वाढीव उपकर व मुद्रांक शुल्क अनुदान वितरीत करण्यात येत असल्याने जिल्हा परिषदांकडून मागणी केल्याच्या नंतर निधी त्यांना प्राप्त होतो. बऱ्याच वेळी असा निधी जिल्हा परिषदांना विलंबाने प्राप्त होतो. ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टीने विविध योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी जिल्हा परिषद व पंचायत समित्या या महत्वाच्या स्थानिक स्वराज्य संस्था असून त्यांना विहित वेळेत शासनाकडून निधी प्राप्त होत नसल्याने योजनांची अंमलबजावणी वेळीच होत नाही. यासाठी सदरहू अनुदानाचा निधी जिल्हा परिषदांकडे वर्ग करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांकडून विहित वेळेत उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा परिषदेकडून सादर करण्यात येणाऱ्या प्रस्तावांवर जिल्हाधिकारी कार्यालयाने प्राथम्यक्रमाने कार्यवाही करावी तसेच यवतमाळ जिल्हा परिषदेचे स्वतःचे उत्पन्न अल्प प्रमाणात असल्याने त्यांचे जमिन महसूल उपकर, वाढीव उपकर व मुद्रांक शुल्काचे थकीत अनुदान तातडीने देण्यासंदर्भात योग्य ती कार्यवाही करावी. याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्याच्या आत सादर करावी, अशी समिती शिफारस करीत आहे.**

## प्रकरण तीन

## जिल्हा परिषद, यवतमाळ

## जिल्हा परिषदांनी स्वःउत्पन्नातून मागासवर्गीय कल्याणासाठी

## २० टक्के रक्कमेच्या खर्चाबाबत

पंचायती राज समितीने दिनांक १६ ते १८ फेब्रुवारी,२०२१ या कालावधीत यवतमाळ जिल्हा परिषदेस भेट दिली. भेटीच्या वेळी सन २०११-१२ व सन २०१७ -१८ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान यवतमाळ जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने जिल्हा परिषदांना स्वःउत्पन्नातुन मागासवर्गीय कल्याणासाठी २० टक्के रक्कमेच्या खर्चासंदर्भात जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांना विचारणा केली की, शासनाच्या आदेशानुसार जिल्हा परिषदांनी आपल्या निर्दिष्ट उत्पन्नाच्या २० टक्के रक्कम मागासवर्गीयाच्या कल्याणासाठी खर्च करणे आवश्यक आहे. त्यानुसार जिल्हा परिषदेने सन २०११-१२ या वर्षात आपल्या स्वतःच्या उत्पन्नातून मागासवर्गीयांच्या कल्याणकारी योजनांसाठी किती रकमेची तरतूद केली होती व यापैकी किती रक्कम खर्च करण्यात आली आहे ? यावर जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांनी खुलासा केला की, जिल्हा परिषदेने मागासवर्गीय कल्याणकारी योजनांसाठी सन २०११-२०१२ या वर्षात ८४ लाख ३१ हजार रुपयांची तरतूद करण्यात आली होती आणि त्यापैकी ७२ लाख ५७ हजार रुपये खर्च करण्यात आले आहे. उर्वरित निधी पुढील वर्षामध्ये खर्च करण्यात आला आहे.

**यावर समितीने आपले मत व्यक्त केले की, या प्रत्येक कामाची माहिती समितीस १ महिन्यात पाठविण्यात यावी प्रत्येक कामावर किती निधी खर्च केला. निविदा प्रक्रिया राबविली काय, लाभार्थ्यांना लाभ दिला काय, कधी दिला व तो देणे कोणत्या कालावधीत अपेक्षित होते याबाबत सविस्तर माहिती समितीला पाठविण्यात यावी याबाबत समितीचे समाधान न झाल्यास समिती विभागीय सचिवांची साक्ष घेईल.**

समितीने जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांना विचारणा केली की, डीबीटी योजना कधीपासून लागू झाली आहे. यावर जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांनी विदित केले की, सन २०१६ पासून डीबीटी योजना लागू झाली आहे. समितीने पुढे जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांना अशी विचारणा केली की, सन २०१७-२०१८ मध्ये सामुदायिक योजनांसाठी थेट खर्च केला आहे, शासनाने सामुदायिक योजनांना डीबीटी मधुन सुट देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे काय, यावर जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांनी विदित केले की, शासनाने सामुदायिक योजनांना डीबीटी मधुन सुट देण्याचा निर्णय घेण्यात आला नाही. समितीने जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांना सूचना केली की, डीबीटी च्या संदर्भातील विषय सन २०१७-२०१८ च्या वार्षिक प्रशासन अहवालामध्ये यायला पाहिजे होता परंतू त्याचा उल्लेख करण्यात आला नाही, ही बाब योग्य नाही.

समितीने पुढे जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांना अशी विचारणा केली की, शासनाच्या आदेशानुसार जिल्हा परिषदांनी आपल्या निर्दिष्ट उत्पन्नाच्या २० टक्के रक्कम मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी खर्च करणे आवश्यक आहे. त्यानुसार सन २०१७-१८ या वर्षात जिल्हा परिषदेने आपल्या स्वतःच्या उत्पन्नातून मागसवर्गीय कल्याण योजनांसाठी किती रकमेची तरतूद केली होती व यापैकी किती रक्कम खर्च करण्यात आली आहे ? यावर जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांनी खुलासा केला की, जिल्हा परिषदेने सन २०१७-१८ या वर्षात ६ कोटी ५३ लाख ७१ हजार इतक्या रकमेची तरतूद करण्यात आली होती. त्यापैकी १ कोटी ८ लाख २९ हजार ८२५ इतकी रक्कम खर्च करण्यात आली आहे. समितीने जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांना विचारणा केली की, जिल्हा परिषदेने तरतूदीपेक्षा खूपच कमी रक्कम खर्च केली आहे. पूर्ण रक्कम खर्च न करण्याची कारणे काय आहेत? उर्वरित रक्कम पुढील वर्षात खर्च करण्यात आली आहे काय ? यावर जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांनी खुलासा केला की, लाभार्थ्यांचे बँक खाते उघडून आधार लिंक करण्यासाठी बराच कालावधी गेला आहे, त्यामुळे सन २०१७-२०१८ मधील DBT द्वारे १९२९ लाभार्थ्यांनी परिपुर्ण प्रस्ताव सादर न केल्याने निधी अखर्चित राहिला आहे. सन २०१७-२०१८ मधील अखर्चित निधी सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षात डिबीटीचे देयक शोधन करण्याकरीता दिनांक २३/०५/२०१८ रोजीच्या जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेची मंजुरी घेऊन मागील लाभार्थ्यांच्या डीबीटी प्रस्ताव मंजुर करून खर्च करण्यात आला.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत माहिती मागविली.**

जिल्हा परिषदांनी स्वःउत्पन्नातुन मागासवर्गीय कल्याणासाठी २० टक्के रक्कमेचा प्रत्येक कामावर किती निधी खर्च केला व तो कोणत्या कालावधीत अपेक्षीत होते याची माहिती देण्यात यावी.

**उपरोक्त मुद्यासंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

जिल्हा परिषदांनी स्वःउत्पनातुन मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी २० टक्के रक्कमेचा प्रत्येक कामावर खालीलप्रमाणे निधी सन २०१७-१८ या वर्षात खर्च केला.

| अ. क्र. | योजनेचे नांव | सन २०१७-१८ मधील सुधारीत तरतूद | झालेला खर्च | अखर्चीत निधी |
|---|---|---|---|---|
| १ | स्वयंरोजगारासाठी मागासवर्गीय महिलांना ९०% सुटीवर शिलाई मशीन पुरविणे. | ६५००००० | ६८४८१० | ५८१५१९० |
| २ | मागासवर्गीयांच्या घरावरील गवती छपरे बदलून ९० % अनुदानावर टिनपत्रे पूरविणे. | ८३००००० | १२८३६५६ | ७०१६३४४ |
| ३ | मागासवर्गीय शेतकऱ्यांना पी.व्ही.सी. पाईप पुरविणे. | ६६००००० | ७९२६८८ | ५८०७३१२ |
| ४ | मागासवर्गीय भजनी मंडळाला भजनी साहित्य पुरविणे. | ८५००००० | ३९७७२७० | ४५२२७३० |
| ५ | माध्यमिक शाळेतील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना सायकल पुरविणे | ५०००००० | १६८२०० | ४८३१८०० |
| ६ | मागासवर्गीय शेतकऱ्यांना ऑईल इंजीन पुरविणे. | ६५००००० | ९३७५०० | ५५६२५०० |
| ७ | मागासवर्गीय शेतकऱ्यांना ९०% अनुदानावर ताडपत्री पुरविणे. | ४५००००० | १३४९१० | ४३६५०९० |
| ८ | जाहिरात व प्रसिद्धी | २००००० | ० | २००००० |
| ९ | मागासवर्गीय विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक परिक्षेकरीता अनुदान वाचनालय दालन बनविणे | १८७०००० | ६८२९७ | १८०१७०३ |
| १० | ग्रामीण भागातील सर्वसामान्याकरीता व्यसनमुक्ती कार्यक्रम राबविणे | ५०१००० | ० | ५०१००० |
| ११ | मागासवर्गीय शेतकऱ्यांना एचडिपीई पाईप पुरविणे. | ६०००००० | ५९९६०० | ५४००४०० |
| १२ | मागासवर्गीय शेतकऱ्यांना तुषार सिंचन संच पुरविणे | ६५००००० | १७८०४५९ | ४७१९५४१ |
| १३ | मागासवर्गीय शेतकऱ्यांना ९० % अनुदानावर इले. मोटर पुरविणे. | ४४००००० | ६००४३५ | ३७९९५६५ |
| | **एकुण समाज कल्याण (२० % तरतूद)** | ६५३७१००० | ११०२७८२५ | ५४३४३१७५ |

सन २०१७-१८ या वर्षामध्ये प्राप्त तरतूद रक्कम रूपये २९४९२९११/- करण्यात आली होती व मागील वर्षातील अखर्चित निधी ३५८७८०८९/- अशी एकुण ०६ कोटी ५३ लाख ७१ हजार रूपये तरतूद उपलब्ध करून दिली. त्यानुसार सर्व योजनास तांत्रिक व प्रशासकीय मंजुरी घेऊन दरनिश्चिती करण्यात आली. सन २०१७-१८ मध्ये जिल्हा परिषद स्वउत्पन्न ६ बाबींनुसार रु ७१८९८१००/- इतके होते. त्यानुसार २०% सेस रु.१४३७९६२०/- देय ठरतो परंतु जिल्हा परिषद सेस अंतर्गत सन २०१७-१८ मध्ये रु २३४९२९११/- इतकी तरतूद प्राप्त झाली.

पुर्वी वैयक्तीक लाभाच्या योजनेचे साहित्य वस्तु स्वरुपात लाभार्थ्यांना देण्यात येत होते. परंतु नियोजन विभाग शासन निर्णय क्रमांक डिसीटी २३१६/प्र.क्र.१३३/का.१४१७ दिनांक ०५ डिसेंबर २०१६ अन्वये विविध कल्याणकारी योजनांमध्ये वस्तु स्वरुपात मिळणाऱ्या लाभांचे हस्तांतर, रोख स्वरूपात थेट लाभार्थ्यांचे बँक खात्यात करणेबाबत आदेशित केले आहे. (परिशिष्ट क्रमांक ३.१) सन २०१७-१८ मधील DBT द्वारे १९२९ लाभार्थ्यांनी परिपुर्ण प्रस्ताव सादर न केल्याने रक्कम निधी अखर्चित राहिला. सन २०१७-१८ मधील अखर्चित निधीस सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात डिबीटिचे देयक शोधन करण्याकरीता दिनांक २३/०५/२०१८ रोजीच्या जि. प. सर्वसाधारण सभेची मंजुरी घेऊन मागील लाभार्थ्यांच्या डीबीटी प्रस्ताव मंजुर करून खर्च करण्यात आला.

## मंत्रालयीन विभागाचे अभिप्राय

**सामाजिक न्याय विभाग यांचे अभिप्राय :-** जिल्हा परिषद यांचेशी संबंधित आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष :**

पंचायती राज समितीने यवतमाळ जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १६ नोव्हेंबर, २०२१ रोजी विभागीय सचिवांची साक्ष आयोजित करण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांना विचारणा केली की, जिल्हा परिषदेने स्व-उत्पन्नातून मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी २० टक्के रकमेपैकी किती निधी खर्च करण्यात आला आहे व तो निधी कोणत्या कालावधीमध्ये खर्च करण्यात आलेला आहे ? यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, सन २०१७-१८ मध्ये डीबीटी योजना लागू करण्यात आली होती. त्यामुळे लाभार्थ्यांचे बँक खाते, आधार नंबर व केवायसी या बाबींची पूर्तता होऊ शकली नाही. त्यामुळे सन २०१७-१८ मध्ये सदर खर्च कमी झाला होता. चालू आर्थिक वर्षातील निधी अखर्चित राहिल्यानंतर तो पुढील वर्षामध्ये कॅरीफॉरवर्ड केला जातो. थोडक्यात सेसची रक्कम लॅप्स होत नाही किंवा शासनाकडे परत करावी लागत नाही. त्यामुळे आम्ही सदर निधी पुढील वर्षी खर्च केलेला आहे. समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांना विचारणा केली की, सन २०१७-२०१८ या वर्षातील अखर्चित निधी सन २०१८-२०१९ या वर्षात खर्च करण्यात आला आहे काय? यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, होय, सन २०१७-२०१८ या वर्षातील अखर्चित निधी सन २०१८-२०१९ या वर्षात खर्च करण्यात आला आहे.

**अभिप्राय व शिफारशी :**

पंचायती राज समितीने दिनांक १६ ते १८ फेब्रुवारी, २०२१ या कालावधीत यवतमाळ जिल्हा परिषदेस भेट दिली. त्यावेळेस सन २०११-२०१२ व सन २०१७-२०१८ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालासंदर्भात जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेली माहिती व त्यानुषंगाने झालेल्या चर्चेत समितीच्या निदर्शनास आले की, यवतमाळ जिल्हा परिषदेने मागासवर्गीयांच्या कल्याणकारी योजनांसाठी सन २०११-२०१२ या वर्षात ८४ लाख ३१ हजार रूपयांच्या केलेल्या तरतूदीपैकी ११ लाख ७४ हजार इतकी रक्कम अखर्चित राहिली आहे. तसेच सन २०१७-२०१८ या वर्षात तरतूद केलेल्या ६ कोटी ५३ लाख ७१ हजार इतक्या रकमेपैकी फक्त १ कोटी ८ लाख २७ हजार इतकी रक्कम खर्च झाली व ५ कोटी ४५ लाख ४३ हजार इतक्या मोठ्या प्रमाणात रक्कम अखर्चित राहिलेली आहे.

जिल्हा परिषदेच्या स्तरावर राबविण्यात येणाऱ्या मागासवर्गीय योजनांचे नियोजन व अंमलबजावणी याबाबतची मुदत शासन निर्णयान्वये शासनाने निश्चित केलेली असतानाही या योजनांची अंमलबजावणी योग्य प्रकारे होत नसल्याने अहवाल वर्षात मागासवर्गीयांचा निधी अखर्चित राहत असल्याचे निदर्शनास येत आहे. सन २०१७-२०१८ या वर्षात यवतमाळ जिल्हा परिषदेच्या स्वःउत्पन्नाच्या २० टक्के मागासवर्गीयांच्या योजनांसाठीच्या निधीमधील २० टक्के निधीही खर्च झालेला नसल्याने मोठ्या प्रमाणात निधी अखर्चित राहिलेला आहे. सदरहू बाब अतिशय गंभीर असल्याने याबाबतची चौकशी करून मागासवर्गीयांच्या योजनांसाठी २० टक्के नुसार तरतूद केलेली एकूण रक्कम, खर्च केलेल्या योजना, तरतूद केलेली एकूण रक्कम व अखर्चित राहिलेल्या रक्कमा याबाबतची सविस्तर माहिती समितीस सादर करण्याबाबत समितीने निदेश दिले.

त्यानुसार जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेली माहिती व या विषयासंदर्भात घेण्यात आलेल्या विभागीय सचिवांच्या साक्षीत समितीस माहिती प्राप्त झाली की, सन २०१७-२०१८ या वर्षात मागसवर्गीय कल्याणासाठीच्या निधीमधून महिलांना शिलाई मशीन पुरविणे, घरावरील गवती छपरे बदलून टिनपत्रे पुरविणे, शेतकऱ्यांना पी.व्ही.सी. व एचडीपीई पाईप/इलेक्ट्रीक मोटर/ऑईल इंजीन/ताडपत्री/ तुषार सिंचन संच पुरविणे, भजनी मंडळाला भजनी साहीत्य पुरविणे, विद्यार्थ्यांना सायकल पुरविणे व स्पर्धात्मक परिक्षेकरीता अनुदान वाचनालय दालन बनविणे यासह व्यसनमुक्ती कार्यक्रम राबविणे, जाहिरात व प्रसिद्धी इत्यादी योजनांसाठी सन २०१७-२०१८ या वर्षात मागील वर्षातील अखर्चित निधी रू. ३५,८७,०८९/- व त्या वर्षामध्ये प्राप्त तरतूद रू. २,९४,९२,९११/- असे एकूण रू. ६ कोटी ५३ लाख ७१ हजार इतकी तरतूद उपलब्ध झाली होती. उपलब्ध असलेल्या निधीमधील फक्त १ कोटी ८ लाख २७ हजार इतकी रक्कम खर्च झाली व ५ कोटी ४५ लाख ४३ हजार इतकी रक्कम अखर्चित राहिलेली आहे. तसेच ग्रामीण भागातील सर्वसामान्यांकरीता व्यसनमुक्ती कार्यक्रम राबविण्याकरीता तरतूद करण्यात आलेली रूपये ५ लाख १ हजार, जाहिरात व प्रसिद्धी यासाठी तरतूद करण्यात आलेली रूपये २ लाख इतकी रक्कम पूर्णपणे अखर्चित राहिलेली आहे.

मोठ्या प्रमाणात अखर्चित रक्कम राहिल्यासंदर्भात नमुद केले आहे की, पुर्वी लाभाच्या योजनेचे साहित्य वस्तु स्वरूपात लाभार्थ्यांना देण्यात येत होते. परंतु वस्तु स्वरूपात मिळणाऱ्या लाभांचे हस्तांतरण रोख स्वरूपात थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात करण्यात येते. तथापि, या वर्षात १९२९ लाभार्थ्यांनी परिपूर्ण प्रस्ताव सादर न केल्याने निधी अखर्चित राहिला आहे.

मागासवर्गीयांचे सामाजिक व शैक्षणिक जीवनमान उंचाऊन त्यांची उन्नती व्हावी यासाठी शासनाकडून जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण विभागामार्फत विविध योजना उपक्रम राबविण्यात येतात. शासनाच्या धोरणात्मक निर्णयानुसार जिल्हा परिषदांनी त्यांच्या स्वउत्पन्नाच्या किमान २० टक्के निधी मागासवर्गीयांच्या कल्याणकारी योजनांवर खर्च करायचा आहे. सदरहू योजना सर्वसामान्य लाभार्थ्यांपर्यत पोहचवण्याकरीता पुरेशा प्रमाणात प्रसिद्धी जिल्हा परिषदेकडून करणे आवश्यक आहे. परंतु अहवाल वर्षात जाहिरात व प्रसिद्धी यासाठी तरतूद करण्यात आलेली पूर्ण रक्कम अखर्चित राहिलेली आहे. अहवाल वर्षात तरतूद करण्यात आलेला पूर्ण निधी व मागील वर्षातील अखर्चित राहिलेल्या निधीमधील देखील अर्ध्याहुनही अधिक निधी अखर्चित राहिलेला आहे. म्हणजेच मागासवर्गीयांच्या कल्याणकारी योजना यशस्वी होण्याच्या दृष्टीने लाभार्थ्यांचे प्रस्ताव कागदपत्रांसह आवश्यक त्या बाबींसह परिपूर्ण करण्याबाबत कोणत्याही प्रकारचे प्रयत्न अधिकारी/कर्मचारी यांच्याकडून करण्यात आलेले नाहीत. वास्तविक मागासवर्गीयांसाठी असलेल्या योजनांची अंमलबजावणी विहित वेळापत्रकानुसार होत आहे किंवा कसे याकरीता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मासिक कृती कार्यक्रम तयार करून त्यासंबंधी दरमहा आढावा बैठक घेणे आवश्यक होते. योग्य कार्यपद्धती न राबविल्यामुळे मागासवर्गीय कल्याणकारी योजनांचा निधी अखर्चित राहिल्यामुळे समिती तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे. तसेच सन २०१८-२०१९ या वर्षात मागील वर्षातील अखर्चित राहिलेला निधी रू. ५,४३,४३,१७५/- व या वर्षात २० टक्के प्रमाणे केलेल्या तरतूदीनुसार मागासवर्गीयांच्या कल्याणकारी योजना राबविण्यासाठी एकूण किती निधी उपलब्ध झाला व सदरहू निधी कोणत्या योजनांवर खर्च करण्यात आला व त्या वर्षात एकूण किती निधी अखर्चित राहिला याबाबतचा सविस्तर अहवाल समितीस तीन महिन्याच्या आत सादर करावा, अशी समिती शिफारस करीत आहे.

विविध कल्याणकारी योजनांमध्ये ज्या ठिकाणी शासनाद्वारे वस्तू स्वरूपात अनुदान देण्यात येत आहे. त्या ठिकाणी वस्तू स्वरूपात अनुदान देण्याऐवजी रोख रकमेच्या स्वरूपात अनुदान दिल्याने लाभार्थ्यांनाच लाभ मिळायची शाश्वती राहिल. विविध विभागाद्वारे होत असलेल्या विविध प्रकारची खरेदी टळू शकेल. स्थानिक पातळीवरच लाभार्थी वस्तु खरेदी करणार असल्याने स्थानिक उद्योग व्यावसायिकांना लाभ होईल. रोख रकमेच्या स्वरूपात लाभ वाटप केल्यामुळे शासनाच्या कार्यपद्धतीत अधिक पारदर्शकता येईल. यासाठीच शासनाद्वारे थेट लाभ हस्तांतरण (Direct Beneficiary Transfer) प्रक्रियेवर मोठ्या प्रमाणात भर देण्यात येत आहे. जेणेकरून अनावश्यक गैरप्रकार टाळून लाभार्थ्यांना योजनांचा पूर्णपणे लाभ मिळेल. परंतु शासनाकडून धोरणात्मक कार्यपद्धती राबविताना जिल्हा स्तरावर कागदपत्रे व तांत्रिक त्रुटीच्या सहायाने लाभार्थ्यांच्या प्रस्तांवावर नकारात्मक कार्यवाही करून त्यांना त्यांच्या लाभापासून वंचित ठेवणे ही बाब निश्चितच योग्य होणार नाही. यास्तव थेट लाभ हस्तांतरण (Direct Beneficiary Transfer) प्रक्रिया विहित वेळेत पूर्ण होण्याच्या दृष्टीने कालबद्ध कार्यक्रमाची आखणी करण्यात यावी व या माध्यमातून पात्रतेच्या निकषासाठी आवश्यक असलेली कागदपत्रे तयार करणे, आधार क्रमांकाशी जोडणी करणे, पात्र लाभार्थ्यांचे राष्ट्रीयकृत बँकेत खाते काढणे यासह आवश्यक बाबी पूर्ण करण्याची कार्यवाही करण्यात यावी व याबाबतची सविस्तर माहिती समितीस तीन महिन्याच्या आत सादर करावी, अशी समिती शिफारस करीत आहे.

## प्रकरण चार

## जिल्हा परिषद, यवतमाळ
## जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रांबाबत

पंचायती राज समितीने दिनांक १६ ते १८ फेब्रुवारी,२०२१ या कालावधीत यवतमाळ जिल्हा परिषदेस भेट दिली. भेटीच्या वेळी सन २०११-१२ व सन २०१७-१८ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान यवतमाळ जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने जिल्हा आरोग्य अधिकारी यांना विचारणा केली की, बृहत आराखडयानुसार जिल्ह्यात एकूण किती प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्रांची आवश्यकता आहे? प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्राच्या इमारतीच्या बांधकामाची कार्यवाही सुरू केली आहे काय? तसेच ज्या प्राथमिक आरोग्य केंद्रांची / उप केंद्रांची कामे सुरू आहेत ती कधीपर्यंत पूर्ण होतील ? यावर जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी खुलासा केला की, यवतमाळ जिल्ह्यामध्ये २०१३ च्या बृहत आराखडा पूर्वी एकूण ६३ प्राथमिक आरोग्य केंद्र व २०१३ चे बृहत आराखडा नंतर १० प्राथमिक आरोग्य केंद्र असे एकूण ७३ प्राथमिक आरोग्य केंन्द्रे जिल्ह्याकरीता मंजुर आहेत. तसेच २०१३ चे बृहत आराखड्यानंतर ५० प्राथमिक आरोग्य उपकेंद्र जिल्ह्याकरिता मंजुर आहेत. २०१३ बृहत आराखडा पूर्वीचे ६३ प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यान्वीत आहेत. २०१३ चे बृहत आराखडा नंतर मंजूर १० प्राथमिक आरोग्य केंद्रा पैकी ४ प्राथमिक आरोग्य केद्राचे बांधकाम पूर्ण झाले आहे. चार प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी शासकीय जागा उपलब्ध करून घेण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. एका प्राथमिक आरोग्य केंद्राचे इलेक्ट्रिक वर्क बाकी आहे. तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र लोहारा नगरपरिषद क्षेत्रामध्ये गेल्यामुळे अडचण आली आहे. समितीने जिल्हा आरोग्य अधिकारी यांना विचारणा केली की, प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या इमारतींचा आराखडा कोणत्या प्रकारचा आहे? यावर जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी विदित केले की, प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीचा आराखडा नवीन प्लॅननुसार बनविलेला आहे. कोठा येथील प्राथमिक आरोग्य केंद्र त्याच धर्तीवर बांधण्यात आलेले आहे. याबाबत समितीने समाधान व्यक्त केले.

समितीने मत व्यक्त केले की, समिती कोठा प्राथमिक आरोग्य केंद्राला भेट दिली असता सदर इमारतीचा आराखडा अतिशय चांगला आहे व बांधकाम देखील उत्कृष्ट झालेले आहे. परंतु तेथे अद्याप वैद्यकीय साहित्य व उपकरणे नाहीत. तसेच तेथील पदे रिक्त आहेत. अर्थात, पदभरतीचा विषय राज्यस्तरीय आहे. परंतू राज्यभरातील आरोग्य विभागाची रिक्त पदे भरणे अत्यंत आवश्यक आहे. कोविडसारख्या महामारीच्या काळात पदे रिक्त आहेत. कोठा येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीसाठी सुमारे ७ कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत परंतू पदे रिक्त असल्यामुळे त्याचा काहीही उपयोग झालेला नाही. तद्नंतर समितीने जिल्हा आरोग्य अधिकारी यांना विचारणा केली की, जिल्हा परिषदेने पद भरतीसंदर्भात राज्य शासनाकडे प्रस्ताव सादर केला आहे काय? याबाबत जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी विशद केले की, होय, जिल्हा परिषदेने आरोग्य विभागाच्या पद भरतीसंदर्भात राज्य शासनाकडे प्रस्ताव सादर केला आहे. समितीने जिल्हा आरोग्य अधिकारी यांना विचारणा केली की, जिल्ह्याचा कामगिरी सुधारणा योजना (पी. आय.पी.) किती आहे? जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी विशद केले की, जिल्ह्याचा कामगिरी सुधारणा योजना (पी.आय.पी.) सुमारे २० कोटी रुपये आहे. तद्नंतर समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सुचित केले की, आपण केंद्र शासनाकडे जास्तीतजास्त वाढीव मागणी करावी. जेणेकरुन केंद्र शासनाकडून भरीव मदत मिळेल. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, आम्ही यावर्षी काही उपकेंद्रांचे बांधकाम प्रस्तावित करून वाढीव मागणी करणार आहोत. समितीने जिल्हा आरोग्य अधिकारी यांना विचारणा केली की,जिल्ह्यामध्ये एकूण किती समुदाय आरोग्य अधिकारी (सी.एच.ओ.) आहेत ? यावर जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी विशद केले की, जिल्ह्यामध्ये सद्यस्थितीत एकूण २८५ समुदाय आरोग्य अधिकारी (सी.एच.ओ.) आहेत.

समितीने जिल्हा आरोग्य अधिकारी यांना सूचना केली की, आपण जी उपकेंद्रे प्रस्तावित करणार आहात तेथे रुग्ण येतील अशाच ठिकाणांचा समावेश करावा. समितीने दोन ते तीन प्राथमिक आरोग्य केंद्रांना भेटी दिल्या असता असे दिसून आले की, दररोज केवळ सात-आठ बाहयरुग्ण येत आहेत. एकही आंतररुग्ण नसल्याचेही समितीस दिसून आले आहे. उपचारांचा दर्जा सुधारावा लागेल तरच अधिकाधिक लोक शासकीय रूग्णालयात येतील. सर्वसाधारणपणे एमबीबीएस डॉक्टर्स मिळत नाहीत परंतु बीएएमएस डॉक्टर्स जिल्हा व तालुक्यांच्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहेत. त्यामुळे जेथे एमबीबीएस डॉक्टर्स मिळत नाहीत तेथे बीएएमएस डॉक्टर्स घ्यावेत जेणेकरुन आपले काम सुरू होईल. तसे करण्याचा अधिकार देखील आपल्याला आहे. यावर जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी समितीने केलेल्या सुचनेसंदर्भात योग्य ती कार्यवाही करण्याचे समितीला आश्वासीत केले आहे.

समितीने जिल्हा आरोग्य अधिकारी यांना विचारणा केली की, सध्या जिल्ह्यामध्ये एकूण किती रुग्णवाहिका आहेत? यावर जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी विशद केले की, जिल्ह्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये रुग्णवाहिका आहेत. त्यापैकी ४८ रुग्णवाहिका १० वर्षापेक्षा जास्त जुन्या आहेत. यावर्षीच्या जिल्हा नियोजन समितीमध्ये त्याबाबतचा प्रस्ताव दिला आहे.

समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सुचित केले की, कोविड काळात वेगवेगळया जिल्ह्यांमधील आमदार, खासदारांनी त्यांच्या फंडातून रुग्णवाहिका दिल्या आहेत. त्याच धर्तीवर आपण देखील जिल्ह्यातील आमदार, खासदारांना भेटून जेवढ्या रुग्णवाहिका मिळतील त्या घेण्यात याव्या जेणेकरूण त्याचा देखील फायदा होईल. राज्य शासन आता ४०० पेक्षा जास्त रुग्णवाहिका विकत घेणार आहे. आपण रूग्णवाहिकेसंदर्भात जिल्हा परिषदेकडून राज्य शासनास प्रस्ताव पाठवावा. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सहमती दर्शवली.

समितीने जिल्हा आरोग्य अधिकारी यांना विचारणा केली की, प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्राच्या (पी.एच.सी.) प्रयोगशाळेमध्ये (लॅबोरेटरी) कोणकोणत्या चाचण्यांसाठी नमुने घेतले जातात? यावर जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी विदित केले की, प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये प्रयोगशाळा नाही. दोन ते तीन प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी एक प्रयोगशाळा आहे. तेथे टी.बी, मलेरिया, इत्यादी चाचण्यांसाठी नमुने घेतले जातात.

समितीने असे मत व्यक्त केले की, जिल्ह्यातील काही प्राथमिक आरोग्य केंद्रांना मंजुरी आहे परंतु जागा उपलब्ध नाही. प्राथमिक उपकेंद्रांचा देखील तोच प्रश्न आहे. याबाबत कार्यवाही सुरू आहे असे सांगितले जात आहे परंतु तातडीने कार्यवाही होणे गरजेचे आहे. रिक्त पदांबाबतचा विषय राज्यस्तरीय आहे. समिती त्याबाबत शासनास शिफारस करील. कारण काही ठिकाणी चांगल्या इमारती बांधून आहेत परंतु वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी नसल्यामुळे त्या कार्यान्वित होऊ शकल्या नाहीत. याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी ड्राईव्ह घेऊन त्यातून मिळालेली संपूर्ण माहिती समितीला सादर करावी. तद्नंतर समिती यासंदर्भात विभागीय सचिवांची साक्ष घेईल. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सहमती दर्शवली.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत माहिती मागविली.**

जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्राना मंजुरी आहे पण जागा उपलब्ध नसते. तसेच वैद्यकीय अधिकारी/कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असल्याने काही प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यरत होवू शकल्या नाहीत. याप्रकरणी कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे.

**उपरोक्त मुद्यासंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

१. यवतमाळ जिल्ह्यामध्ये २०१३ च्या बृहत आराखड्यापूर्वी एकूण ६३ प्राथमिक आरोग्य केंद्र व २०१३ चे बृहत आराखड्यानंतर १० प्राथमिक आरोग्य केंद्रे असे एकूण ७३ प्राथमिक आरोग्य केंद्रे जिल्ह्याकरीता मंजुर आहेत. त्या पैकी २०१३ च्या बृहत आराखड्यापुर्वीचे ६३ प्राथमिक आरोग्य केंद्रे कार्यान्वीत आहेत. २०१३ चे बृहत आराखडा नंतर मंजूर १० प्राथमिक आरोग्य केंद्रापैकी ४ प्राथमिक आरोग्य केंद्राचे बांधकाम पूर्ण झाले असून त्या ठिकाणी पदांना मंजुरी प्राप्त आहे. त्यापैकी ३ आरोग्य केंद्र या ठिकाणी वैद्यकीय अधिकारी या पदांची नियुक्ती करण्यात आली आहे. नव्याने मंजुर प्राथमिक आरोग्य केंद्राकरीता तात्पुरती पर्यायी व्यवस्था म्हणून कंत्राटी पद्धतीने तांत्रिक व अतांत्रिक पदे भरण्याकरीता बिंदुनामावलीस मान्यता घेण्याबाबत कार्यवाही सुरू आहे.

**प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यान्वीत न होण्याची कारणे.**

१० पैकी उर्वरित ५ प्राथमिक आरोग्य केंद्र या ठिकाणी इमारत बांधकाम करणे करीता स्थळ निश्चिती करण्यात आली आहे. सदर जागा प्राप्त करण्याकरीता आवश्यक असणारे ना-हरकत प्रमाणपत्र व मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे नावावर जागा करण्याची कार्यवाही सुरू आहे. प्राथमिक आरोग्य केंद्र लोहारा, नगर परिषद क्षेत्रामध्ये समावेश झाला असल्यामुळे स्थलांतर करण्याबाबतची कार्यवाही सुरू आहे.

**विभागाने केलेली कार्यवाही :**

जागा उपलब्ध करून देणे बाबत संबंधित ग्रामपंचायत व गट विकास अधिकारी पंचायत समिती यांना कळविण्यात आले आहे. जिल्हा परिषद सर्वसाधारण सभा व विषय समिती सभा यामध्ये सर्व सन्मा. सदस्यांना कळविण्यात आले जिल्हा परिषदेकडील तांत्रिक व अतांत्रिक पदे भरण्याकरीता एकूण ३५९ पदाची जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली आहे. आरोग्य सेवा पुरविण्याचे दृष्टीने जवळील प्राथमिक आरोग्य केंद्रातील कर्मचाऱ्यांची सेवा अधिग्रहीत करून सेवा देण्यात येत आहे.

२. यवतमाळ जिल्ह्यामध्ये २०१३ च्या बृहत आराखडा पूर्वी एकूण ४३५ प्राथमिक आरोग्य उपकेंद्र व २०१३ चे बृहत आराखडा नंतर ५० प्राथमिक आरोग्य उपकेंद्र असे एकूण ४८५ प्राथमिक आरोग्य उपकेंद्र जिल्ह्याकरीता मंजुर आहेत. त्यापैकी २०१३ बृहत

आराखडा पूर्वीचे ४३५ प्राथमिक आरोग्य उपकेंद्र कार्यान्वीत आहेत. २०१३ चे बृहत आराखडा नंतर  मंजुर ५० प्राथमिक आरोग्य उपकेंद्रांपैकी ५ प्राथमिक आरोग्य उपकेंद्राचे बांधकाम प्रगतीत आहेत. ६ प्राथमिक आरोग्य उपकेंद्राचे बांधकाम पूर्ण झाले असून त्या पैकी ५ उपकेंद्रांतील पदांना मंजुरी प्राप्त आहे. तात्पुरती पर्यायी व्यवस्था म्हणून आरोग्य सेवा पुरविण्याचे दृष्टीने जवळील प्राथमिक आरोग्य केंद्रातील कर्मचाऱ्यांची सेवा अधिग्रहीत करून सेवा देण्यात येत आहे.

५० पैकी उर्वरित १७ प्राथमिक आरोग्य उपकेंद्रे या ठिकाणी इमारत बांधकाम करणेकरीता स्थळ निश्चिती करण्यात आली आहे. सदर जागा प्राप्त करण्याकरीता आवश्यक असणारे ना-हकरत प्रमाणपत्र व मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे नावावर जागा करण्याची कार्यवाही सुरू आहे. उर्वरित १९ प्राथमिक आरोग्य उपकेंद्राचे जागे बाबतचे प्रस्ताव अप्राप्त / अपूर्ण आहेत. पैकी एक आरोग्य उपकेंद्र नागरी क्षेत्रात गेल्यामुळे स्थलांतरण प्रस्तावित आहे. २ ठिकाणी सद्यःस्थितीत ग्रामपंचायतीद्वारे जागेची निश्चिती करून देण्यात आलेली नाही.

**प्राथमिक आरोग्य उपकेंद्र कार्यान्वीत न होण्याची कारणे**

२२ प्राथमिक आरोग्य उपकेंद्राना ग्रामपंचायतींद्वारे अद्याप पर्यंत जागा उपलब्ध करून देण्यात आलेली नाही. १७ प्राथमिक आरोग्य उपकेंद्राकरीता जागेची निश्चीती करण्यात आली आहे परंतु जागा मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे नांवे करणे व इतर आवश्यक प्रमाणपत्र प्राप्त करून घेण्याची कार्यवाही सुरू आहे.

**विभागाने केलेली कार्यवाही :**

जागा उपलब्ध करून देणेबाबत संबंधित  ग्रामपंचायत व गट विकास अधिकारी पंचायत समिती यांना कळविण्यात आले आहे. जिल्हा परिषद सर्वसाधारण सभा , विषय समिती सभा यामध्ये सर्व सन्मा. सदस्यांना कळविण्यात आले.  पदभरती करण्याकरीता जाहिरात देण्यात आली आहे.

**मंत्रालयीन विभागाचे अभिप्राय :-**

**सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे अभिप्राय :-** जिल्हा परिषद यांचेशी संबधीत आहे.

**विभागाने सचिवांची साक्ष :**

पंचायती राज समितीने यवतमाळ जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १६ नोव्हेंबर, २०२१ रोजी विभागीय सचिवांची साक्ष आयोजित करण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांना विचारणा केली की,  जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र व उप केंद्रांना मंजुरी आहे. परंतु जागा उपलब्ध नाही. तसेच वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी यांची पदे रिक्त असल्याने काही प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यान्वित होऊ शकले नाहीत. याबाबत विभागाने काय कार्यवाही केलेली आहे ? यावर अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी खुलासा केला की, प्राथमिक आरोग्य केंद्र व उप केंद्रांसाठी राज्य शासनाच्या अर्थसंकल्पातून कोणत्याही प्रकारचा निधी उपलब्ध करून दिला जात नाही. त्यामुळे अशा प्रकारची केंद्र डीपीडीसीच्या निधीतून बांधली जातात. अमूक गावामध्ये प्राथमिक आरोग्य केंद्राची आवश्यक आहे, अशा प्रकारचा प्रस्ताव जिल्हा परिषदेमार्फत विभागाला प्राप्त झाल्यानंतर सदर प्रस्ताव विभागाच्या निकषामध्ये बसत असेल तर विभाग सदर प्राथमिक केंद्राला मान्यता देते. जागा नावावर करणे किंवा ठराव घेणे अशा प्रकारची पुढील सर्व कार्यवाही जिल्हा परिषदेमार्फत केली जाते. यवतमाळ येथे ७३ प्राथमिक आरोग्य केंद्रे मंजूर आहेत. त्यापैकी ६३ प्राथमिक आरोग्य केंद्र जुने आहेत. त्यामुळे या ६३ प्राथमिक आरोग्य केंद्रांना इमारतीचे बांधकाम पूर्ण आहे. उर्वरित १० पैकी ४ प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या इमारतीचे बांधकाम पूर्ण झालेले आहे. उर्वरित ६ पैकी ५ प्राथमिक आरोग्य केंद्राला जागा उपलब्ध नाही, प्राथमिक आरोग्य केंद्र लोहारा नगरपरिषदेतर्गत आहे. त्यामुळे सदर प्राथमिक आरोग्य केंद्र जिल्हा परिषदेकडे हस्तांतरित करणे आवश्यक आहे. नवीन ५० प्राथमिक आरोग्य उप केंद्र मंजूर झालेले आहेत. त्यापैकी ६ उप केंद्रांच्या इमारतीचे बांधकाम पूर्ण झालेले आहे. तसेच ५ उप केंद्रांच्या इमारतीचे काम सुरू आहे व उर्वरित ३९ उप केंद्रांची जागा निश्चित करण्यात आलेली नाही. प्राथमिक आरोग्य केंद्र व उप केंद्रांतील फक्त डॉक्टरांची पदे सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत भरली जातात. अन्य कर्मचारी/अधिकाऱ्यांची पदे ग्रामविकास विभागामार्फत भरली जातात. यवतमाळ येथील प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी डॉक्टरांची १२९ पदे मंजूर आहेत. त्यापैकी १२६ पदे भरण्यात आलेली आहेत व फक्त ३ पदे रिक्त आहेत. पद भरतीची कार्यवाही ग्रामविकास विभागामार्फत सुरू आहे.

**अभिप्राय व शिफारशी :**

पंचायती राज समितीने दिनांक १६ ते १८ फेब्रुवारी, २०२१ या कालावधीत यवतमाळ जिल्हा परिषदेला भेट दिली. त्यावेळेस समितीने कोठा प्राथमिक आरोग्य केंद्रास भेट दिली असता समितीच्या निदर्शनास आले की, या आरोग्य केंद्राच्या इमारतीचा आराखडा अतिशय चांगला असून बांधकाम देखील उत्कृष्ट झालेले आहे. परंतु या केंद्रास आवश्यक असलेले वैद्यकीय साहित्य व उपकरणे यासह अन्य सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेल्या नाहीत. तसेच तेथील वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांची पदे देखील रिक्त आहेत. त्यामुळे कोवीडच्या प्रादुर्भावाच्या कालावधीत करोडो रूपये खर्च करून बांधण्यात आलेल्या या प्राथमिक आरोग्य केंद्राचा काहीही उपयोग झाला नाही. समितीने अन्य तीन प्राथमिक आरोग्य केंद्रांना भेटी दिल्या असता असे निदर्शनास आले की, एम.बी.बी.एस. डॉक्टर नसल्याने येथील वैद्यकीय उपचाराचा दर्जा चांगला नाही. त्यामुळे केवळ सात ते आठ बाह्यरूग्ण दररोज उपचारार्थ येत असतात, एकही आंतररूग्ण उपचार घेत असल्याचे आढळून आले नाही. या जिल्ह्यात प्राथमिक आरोग्य केंद्रांसाठी ४८ रूग्णवाहीका असून त्या १० वर्षापेक्षा जास्त पुर्वीच्या असल्याने जुन्या झालेल्या आहेत. सन २०११-२०१२ व २०१७-२०१८ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या चर्चेदरम्यान समितीने उपरोक्त त्रुटी निदर्शनास आणुन जिल्ह्यात असलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्राची माहिती समितीने जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्याकडून घेतली. त्यानुसार जिल्ह्यात बृहत आराखडयानुसार किती प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रांची आवश्यकता असून किती केंद्र मंजूर झालेली आहेत. यासाठी किती निधीची आवश्यकता आहे यासह किती इमारतींच्या बांधकामांसाठी शासकीय जागा उपलब्ध असून या इमारतींच्या बांधकामांची सद्यःस्थिती काय आहे. सदर केद्रांची बांधकामे पूर्ण होऊन कधीपर्यंत लोकांच्या उपचारार्थ कार्यान्वीत होतील याबाबतची सविस्तर माहिती सादर करण्याबाबत समितीने निदेश दिले.

यानुषंगाने जिल्हा परिषदेसह विभागाने सादर केलेली माहिती व विभागीय सचिवांच्या साक्षीत समितीस अशी माहिती प्राप्त झाली की, यवतमाळ जिल्ह्यामध्ये एकूण ७३ प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूर झालेली आहेत. त्यापैकी ६३ प्राथमिक आरोग्य केंद्रे कार्यान्वीत आहेत. मंजुर असलेल्या १० प्राथमिक आरोग्य केंद्रापैकी ४ आरोग्य केंद्रांची बांधकामे पूर्ण झाली असून पदांना मंजुरी प्राप्त आहे. तसेच ५ प्राथमिक आरोग्य केंद्रांची स्थळ निश्चिती करण्यात आली असून जागा नावावर करण्याची कार्यवाही सुरू आहे. त्याचप्रमाणे प्राथमिक आरोग्य केंद्र लोहारा, नगर परिषद क्षेत्रामध्ये समावेश झाला असल्यामुळे स्थलांतर करण्याबाबतची कार्यवाही सुरू आहे. तसेच जिल्ह्यात ४३५ प्राथमिक आरोग्य उपकेंद्र कार्यान्वीत आहेत. नवीन ५० प्राथमिक आरोग्य उपकेंद्र मंजुर झालेली असुन त्यापैकी ६ उपकेंद्रांच्या इमारतींचे बांधकाम पूर्ण झालेले आहे तर ५ उपकेंद्रांच्या इमारतींची कामे सुरू आहेत व उर्वरित ३९ उपकेंद्रांची जागा अद्याप निश्चित करण्यात आलेली नाही.

**ग्रामीण भागातील जनतेला व दुर्लक्षित समाजातील गरजुंना सहजरित्या, परवडणारी, कार्यक्षम आणि विश्वासार्ह आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याची जबाबदारी शासनाची आहे. यासाठी सार्वजनिक आरोग्य यंत्रणा सखोल व विस्तृत करून सर्व समावेशक आरोग्य सेवा दुर्गम व ग्रामीण भागातील प्रत्येक घटकातील व्यक्तींपर्यत पोहचविणे अत्यावश्यक आहे. आरोग्य क्षेत्रात खाजगी आरोग्य व्यवस्था महत्वाची असली तरी प्रामुख्याने शासनाच्या सार्वजनिक आरोग्य सेवांचा लाभ जास्तीत जास्त जनतेने घ्यावा यादृष्टीने शासनाने आरोग्य सेवेची विश्वासार्हता वाढविणे आवश्यक आहे. यासाठी ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र व ग्रामीण रूग्णालयातील उपचाराचा दर्जा, आरोग्य उपकरणे, पुरेशा प्रमाणात मनुष्यबळ, देखभाल व सुसज्जता अतिशय गुणवत्तापूर्ण बनविणे आवश्यक आहे. या आरोग्य केंद्रांमार्फत प्रसुतीपूर्व प्रसुतीसेवा, नवजात अर्भक व नवजात शिशुंना देण्यात येणाऱ्या आरोग्य सेवा, बाल्यावस्था व किशोरवयीन आरोग्यसेवा, वाढत्या वयातील आजारावरील उपचार, संसर्गजन्य रोगावरील तपासणी व त्यावरील उपचार यासह हृदयविकार, रक्तदाब व मधुमेह यासारख्या मोठ्या प्रमाणात आढळून येणाऱ्या रोगांवरील चाचणी करून निदान करण्याचे प्राथमिक स्तरावरील काम व उपचार तातडीने सर्व सामान्य ग्रामीण भागातील जनतेला मिळणे अत्यावश्यक असल्याचे समितीचे मत आहे.**

**ग्रामीण भागातील लोकसंख्या वाढीबरोबरच गावाचे व ग्रामपंचायतीचे विस्तारीकरण होत आहे. त्यामुळे अनेक गावातील गावठाण व गायरान जमिनींवर अतिक्रमण झाले असल्याने प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रांसाठी गावठाण व गायरान जमिनी उपलब्ध होत नाहीत. शासनाकडून या आरोग्य केंद्रांसाठी निधीसह मंजुरी प्राप्त झालेली असतानाही जागेअभावी सदरची आरोग्य केंद्रे कार्यान्वीत करता येत नाही. त्यामुळे ग्रामीण भागातील गरजू रूग्णांना आरोग्य सेवा मिळत नाही. या बाबी विचारात घेता प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र व ग्रामीण रूग्णालयांच्या इमारती उभारणीसाठी जर**

**शासकीय जमीन उपलब्ध होत नसेल तर खाजगी जमीन संपादन करण्याबाबत शासन स्तरावरून निर्णय होणे आवश्यक असल्याने विभागाने त्यानुषंगाने तपासणी करून सकारात्मक कार्यवाही करावी. त्यानुसार यवतमाळ जिल्ह्यातील सन २०१३ च्या बृहत आराखड्यानंतर मंजुर झालेल्या व इमारतीचे बांधकाम करण्यासाठी स्थळ निश्चित झालेल्या ५ प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या जागा नावावर करण्याची कार्यवाही पूर्ण करून सदर बांधकाम तातडीने पूर्ण करण्यासह प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यान्वीत करावीत. त्याचप्रमाणे बृहत आराखड्यानंतर मंजुर झालेल्या व इमारतींचे बांधकाम सुरू असलेल्या ५ आरोग्य उपकेंद्रांची कामे तातडीने पूर्ण करावी त्यासह उर्वरित मंजुर झालेल्या ३९ आरोग्य उपकेंद्रांसाठी स्थळ निश्चिती करून जागा नावावर करण्यासह इमारतींचे बांधकाम सुरू करण्याबाबतची कार्यवाही सुरू करावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्याच्या आत सादर करावी अशी समिती शिफारस करीत आहे.**

डोंगराळ, आदिवासी व दुर्गम भागात खेड्यात आरोग्य यंत्रणा प्रभावीपणे राबविण्यासाठी एम.बी.बी.एस. डॉक्टर्स उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे आरोग्य सेवेतील वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे रिक्त राहतात व त्याचा ग्रामीण भागातील आरोग्य सेवेवर परिणाम होतो. एम.बी.बी.एस. डॉक्टरांची उपलब्धता विचारात घेता बी.ए. एम. एस. व बी. एच.एम.एस. डॉक्टर उपलब्ध होत असतील तर अशा डॉक्टरांची नियुक्ती करून ग्रामीण आरोग्य सेवा दर्जेदार करणे आवश्यक आहे. तसेच उच्च शिक्षित डॉक्टर शासकीय सेवेत यावेत यासाठी वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या वेतनात समाधानकारक वाढ करण्यासह त्यांच्या कामाचे तास, परिविक्षाधीन कालावधी, बदली व त्यांना कायम करण्यासंदर्भातील अटी व शर्ती यामध्ये सकारात्मक बदल करणे आवश्यक असल्याचे समितीचे मत आहे. **प्राथमिक आरोग्य केंद्र व आरोग्य उपकेंद्रांच्या इमारतींचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतरही अन्य सोयी सुविधा अभावी सदरची आरोग्य केंद्र कार्यान्वीत होत नाहीत. त्यामुळे ग्रामीण भागातील गरजू रूग्ण वैद्यकीय उपचारापासून वंचित राहतात. यास्तव यवतमाळ जिल्ह्यातील वैद्यकीय क्षेत्रातील सर्व रिक्त पदांचा आढावा घेऊन सदरहू पदे तातडीने भरण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी तसेच या आरोग्य केंद्रांना आवश्यक ती वैद्यकीय अद्यावत यंत्र सामुग्री व उपकरणे, आवश्यक त्याप्रमाणात रूग्णवाहीका यासह अन्य सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्याच्या आत सादर करावी, अशी समिती शिफारस करीत आहे.**

## प्रकरण पाच

## जिल्हा परिषद, यवतमाळ
## निकृष्ट दर्जाच्या बियाणांच्या संदर्भात संबंधित कंपन्यांवर कारवाई करण्याबाबत

पंचायती राज समितीने दिनांक १६ ते १८ फेब्रुवारी,२०२१ या कालावधीत यवतमाळ जिल्हा परिषदेस भेट दिली. भेटीच्या वेळी सन २०११-१२ व २०१७-१८ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान यवतमाळ जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने विचारणा केली की, जिल्ह्यात अहवाल वर्षी पेरणी खाली किती हेक्टर क्षेत्र उपलब्ध होते, यापैकी एकूण पिकाखाली व एकापेक्षा अधिक वेळा पेरणी केलेले क्षेत्र किती हेक्टर होते, यावर संबंधित अधिकाऱ्यांनी असे उत्तर दिले की, जिल्ह्यात अहवालवर्षी पेरणी खाली ९ लाख ६० हजार ५०० हेक्टर क्षेत्र उपलब्ध होते. एकूण पिकाखाली ९ लाख ६० हजार ५०० इतके हेक्टर क्षेत्र होते. तसेच ८७ हजार हेक्टरवर एकापेक्षा अधिक वेळा पेरणी करण्यात आली आहे. यावर समितीने विचारणा केली की, एकापेक्षा अधिक वेळा पेरणी करणाऱ्या शेतकऱ्यांना जिल्हा परिषदेने काय मदत केली आहे व अतिवृष्टीमुळे पिकाचे नुकसान झालेले क्षेत्र किती आहे. अन्य कारणांमुळे नुकसान झालेले क्षेत्र किती आहे, सततच्या पावसामुळे नुकसान झालेले क्षेत्र किती आहे, दुबार व तिबार झालेल्या पेरणीमुळे नुकसान झालेले क्षेत्र किती आणि बोगस बियाणांमुळे नुकसान झालेले क्षेत्र किती आहे यावर कृषि अधिकारी यांनी समितीस विदित केले की, बियाणांच्या ४ तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्या संदर्भात संबंधित कृषि विक्रेत्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आणि त्याचवेळी शेतकऱ्यांना बियाणे बदलून देण्यात आले. आता या संदर्भात जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांच्याकडे अधिकार दिलेले आहेत यावर समितीने विचारणा केली की, या संदर्भात जिल्हा अधीक्षक कृषि अधिकाऱ्यांना सूचना द्याव्या लागतील. बियाणे बोगस निघाल्यामुळे संबंधित कृषि विक्रेत्यावर कारवाई करून त्यांचे परवाने निलंबित करण्यात आले. या संदर्भात नेमकी चुक कोणाची आहे यावर कृषि अधिकारी यांनी समितीस विदित केले की, या संदर्भात विक्रेत्यांचे परवाने निलंबित करण्यात आलेले आहेत. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, बोगस बियाणे दिल्यामुळे संबंधित बियाणांच्या कंपन्याविरुद्ध देखील कारवाई होणे अत्यावश्यक आहे. त्याचबरोबर शेतकऱ्यांना मदत सुद्धा मिळवून दिली पाहिजे. कंपनीने बियाण्यांची विक्री करीत असताना त्यांची संपूर्ण तपासणी करून चांगल्या प्रकारचे बियाणे शेतकऱ्यांना देणे अत्यावश्यक आहे. अशाप्रकारे बोगस बियाणे विकून कंपन्या करोडो रुपये कमवतात. मागील वर्षी कोणत्या कंपनीचे बियाणे चांगले निघाले आहे. त्या बियाण्यांची शेतकऱ्याकडून मागणी केली जात असते. त्यामुळे अनेक बियाणे विक्रेते सदर कंपनीचे बियाणे उपलब्ध नसल्यास इतर कंपन्यांचे बियाणे घेऊन ते चांगल्या कंपनीच्या बियाणांच्या पॅकेटमध्ये मिक्स करीत असल्याचेही प्रकार घडतात. या संदर्भात समितीने कृषि विभागाच्या सचिवांची साक्ष घेण्याचा निर्णय घेऊन अशी विचारणा केली की, यवतमाळ जिल्ह्यात किटकनाशकांचे ७ परवाने रद्द करण्यात आले. त्या संदर्भात कोणत्या त्रुटी आढळून आल्या होत्या यावर कृषि अधिकारी यांनी समितीस माहिती दिली की, यवतमाळ जिल्ह्यात काही दुकानदारांकडे परवाने नसताना त्यांनी किटकनाशके पुरविली असल्यामुळे त्यात काही शेतकऱ्यांचा मृत्यू झाला होता. या संदर्भात काही विक्रत्यांचे परवाने रद्द करण्यात आले व काही दुकानदारांविरुद्ध एफआयआर सुद्धा दाखल करण्यात आला. समितीने असे मत व्यक्त केले की, या संदर्भात संबंधित कंपन्याविरुद्ध कारवाई करणे अत्यावश्यक होते. ज्या कंपनीकडून औषधे किंवा बियाण्यांची खरेदी केली असेल, त्या कंपनीच्या पुरवठादाराकडून कोणाकोणाला मालाचा पुरवठा करण्यात आला व त्यात किती बोगस पाकिटे होती, त्यांचे सर्व लॉट व त्यावरील असलेला नंबर या सर्व बाबी साक्षीच्या वेळी चर्चेला येणे अत्यावश्यक आहे. तसेच अशीही माहिती दिली की, यवतमाळ व चंद्रपूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी सोयाबीनचे वाण पेरले होते. चंद्रपूर जिल्ह्यामध्ये गरीब शेतकऱ्यांना एजन्सीकडून वाण रिप्लेसमेंट करून मिळाले. यवतमाळ जिल्ह्यामधून या संदर्भात अनेक तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. परंतु त्या बाबतीत कोणतीही चौकशी करण्यात आली नाही. रिप्लेसमेंटमध्ये शेतकऱ्यांना वाण किंवा खत पाहिजे असल्यास त्यानुसार ते देणे आवश्यक होते. परंतु तसे घडले नाही. यवतमाळ जिल्ह्यामध्ये एजन्सीधारक एकच असतो. फक्त बियाण्यांचे नाव बदलत असते. यावर कृषि अधिकारी यांनी समितीस या संदर्भात काही कंपन्यांविरुद्ध एफआयआर दाखल केलेले आहेत अशी माहिती दिली यावर समितीने अशी सूचना केली की, अनेक शेतकरी बियाणे खरेदी केल्यानंतर त्याचे बिल घेत नाहीत. त्यानंतर बियाणे बोगस निघाले तर त्यांना त्या संदर्भात कोणतीही तक्रार करता येत नाही. कारण त्यांच्याकडे बियाणे खरेदी केल्याचे बिल नसते. त्यामुळे या संदर्भात जिल्ह्यामधील शेतकऱ्यांमध्ये जागरुकता निर्माण करणे आवश्यक आहे. जेणेकरुन भविष्यात अशी परिस्थिती निर्माण होणार नाही. या संदर्भात संबंधित विभागाच्या सचिवांची साक्ष घेऊ तसेच बोगस बियाणांच्या संदर्भात विक्रेत्यांचे परवाने रद्द केले जातात. त्याऐवजी कंपन्याविरुद्ध कारवाई केली पाहिजे. यावर कृषि अधिकारी यांनी समितीस विदित केले की, माननीय आयुक्त, कृषि विभाग यांच्या स्तरावर या संदर्भात सुनावण्या सुरू आहेत. यावर समितीने आपले मत व्यक्त केले की, हा राज्याचा प्रश्न आहे. त्यामुळे या संदर्भात विभागाच्या सचिवांसमवेत कृषि विभागाचे आयुक्त यांना देखील साक्षीला बोलाविण्यात येईल.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत माहिती मागविली.**

बोगस बियांणाच्या संदर्भात विक्रेत्यांचे परवाने रद्द केले जातात त्याऐवजी कंपन्याविरुद्ध कारवाई करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**उपरोक्त मुद्यासंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

कृषि विभागाकडून गुण नियंत्रण कामकाज करतांना कृषि केंद्राची तपासणी करण्यात येते तपासणी दरम्यान बियाणे कायदा १९६६, बियाणे अधिनियम, १९६८ व बियाणे नियंत्रण आदेश १९८३ मधील तरतूदीचे उल्लंघन झाले असल्यास विक्रेत्यांचे परवान्यावर कारवाई केली जाते. तसेच बियांण्यांचे नमुने घेण्यात येतात. अप्रमाणित घोषित झालेल्या बियाणे विक्री करणाऱ्यावर बियाणे कायदा १९६६ बियाणे अधिनियम, १९६८ व बियाणे नियंत्रण आदेश १९८३ मधील तरतूदीनुसार कंपनी ,वितरक व विक्रेते यांचेवर संयुक्त न्यायालयीन प्रकरणे दाखल करण्यात येतात.

सन २०१९-२०२० मध्ये अशाप्रकारे अप्रमाणित नमुने आढळून आलेल्या १७ प्रकरणात सन २०२०-२०२१ मध्ये ३२ प्रकरणात व सन २०२१-२२ मध्ये ६२ प्रकरणांपैकी २७ प्रकरणात, न्यायालयीन प्रकरण व ३५ प्रकरणात पोलीस केस बियाणे कायदा १९६६ च्या अधिनियम, १९८३ मधील तरतूदीनुसार कंपनी वितरक व विक्रेते यांचेवर संयुक्त न्यायालयीन प्रकरणे दाखल करण्यात आली आहे. सर्व प्रकरणे आज रोजी न्याय प्रविष्ठ आहेत. वरील न्यायालयीन प्रकरणांची यादी सहपत्रीत करण्यात येत आहे.

सन २०२१-२२ मध्ये धरतीधन सिडस ॲन्ड प्रोसेसींग प्लांट बोरी अरब ता. दारव्हा जि. यवतमाळ यांनी बियाणे कायदा १९६६, बियाणे अधिनियम १९६८ , व बियाणे नियंत्रण आदेश १९८३ मधील तरतूदीचे उल्लंघन केल्यामुळे त्यांचेवर फौजदारी गुन्हा दाखल करून त्यांचे परवान्यावर कार्यवाहीचा प्रस्ताव आयुक्त कृषि, कृषि आयुक्तालय महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडे सादर करण्यात आला आहे. कंपनीचे परवान्यावर कार्यवाही करण्याचे अधिकार आयुक्त कृषि , कृषि आयुक्तालय महाराष्ट्र राज्य पुणे यांना आहेत.

**मंत्रालयीन विभागाचे अभिप्राय :-**

**कृषि विभाग यांचे अभिप्राय :-** सहमती आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष :**

पंचायती राज समितीने यवतमाळ जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १६ नोव्हेंबर, २०२१ रोजी विभागीय सचिवांची साक्ष आयोजित करण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, बोगस बियाणेसंदर्भात विक्रेत्याचे परवाने रद्द केले जातात, त्याऐवजी कंपन्याविरुद्ध कारवाई करण्याबाबत कृषि विभागाची काय भूमिका आहे. यावर आयुक्त कृषि यांनी समितीस विदित केले की, बियाणांबाबत तीन कायदे आहेत. केंद्रीय बियाणे कायदा १९६६ चा आहे. नियम १९६८ मधील आहेत. नियंत्रण आदेश १९८३ मधील आहेत. तीन कायदे आपल्याकडे लागू आहेत. कापूस करीता राज्याचा स्वतंत्र कायदा आहे. वरील तिन्ही कायदे केंद्र सरकारचे आहेत.

सन २०१७-२०१८ पासून बियाणे कंपन्यावर आम्ही २९१४ केसेस केलेल्या आहेत. कंपनीचे बियाणांचे सॅंपलींग करतो, त्यात दोष आढळल्यास अशावेळी आम्ही कोर्टात जातो व त्यांच्यावर केसेस करतो. गेल्या वर्षी २०२०-२०२१ मध्ये मोठ्या प्रमाणावर तक्रारी प्राप्त झाल्या होत्या व १४५५ केसेस आम्ही केल्या. गेल्यावर्षी ४२ कंपन्यावर ८३ एफआयआर दाखल केलेले आहेत. या प्रकारे १० कंपन्यांचे परवाने आम्ही रद्द केलेले आहेत. मागील वर्षीपासून शेतकऱ्यांनी स्वतःचे बियाणे वापरले पाहिजे याकरिता जास्त प्रयत्न केले गेले. राज्यात मागील वर्षी १ लाख १७ हजार तक्रारी सोयाबीन बियाणांविरुद्ध आलेल्या होत्या मात्र यावर्षी केवळ ५४३ तक्रारी राज्यातून आहेत. यावर्षी कोठेही अडचण आली नाही. आम्ही कंपन्यावर देखील कारवाई केलेली आहे. जेथे दोष आढळला तेव्हा विभाग कारवाई करते.

यावर समितीने असे मत व्यक्त केले की, राज्याबाहेरील बऱ्याच कंपन्या शेतकऱ्यांना बियाणे प्लॉट देतात. तो फेल्युअर निघाला तर नापास होतात, त्यावेळी शेतकऱ्यांकडून बियाणे घेतले जात नाही. तसेच बियाणे नेल्यानंतर सांगतात की वजन कमी भरले. शेतकरी व कंपनीमध्ये ॲग्रीमेंट झालेले असते, त्याबाबत कृषि विभागाला काही माहिती नसते. कंपन्याकडून सिड्स प्लॉट देताना शासनाचेही बंधन असले पाहिजे. याकरिता कृषि विभागाने काही निर्णय घेणे गरजेचे आहे यावर आयुक्त, कृषि यांनी समितीला असे विदित केले की, केंद्रीय कायद्यामध्ये शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत तरतूद नाही. कापूस मध्ये तशी तरतूद विभागाने केलेली आहे, परंतु केंद्रीय कायद्यामध्ये नाही. कारण २०१८ मधील बियाणे विधेयक अजूनही संसदेत प्रलंबित आहे. मागील वर्षी विभागाकडे मोठ्या

प्रमाणावर तक्रारी आल्या होत्या. जवळपास १५ हजार शेतकऱ्यांना ६२०० क्विंटल बियाणे बदलून दिले आहे. तसेच ६ कोटी ८० हजार नुकसान भरपाईचे देखील विभागाने वाटप केलेले आहे. विभागाकडे सर्टीफाईड बियाणे, ट्रूथफुल बियाणे असे दोन प्रकारची बियाणे असतात. ट्रुथफुलमध्ये थोडेसे प्रश्न निर्माण होतात. यावर्षीपासून विभागाने बंधनकारक केले आहे की, ज्या कंपन्या राज्यात बियाणे विक्री करणार आहेत त्यांनी त्यांच्या वेबसाईटवर नमूद करायचे आहे की, ते बियाणे कोठून उगम केलेले आहे याचे डिटेल्ट द्यावेत. विभाग रँडमली चेक करते की, त्या प्लॉटमध्ये त्यांनी त्या वाणाचे बियाणे उत्पन्न केले आहे की नाही. राज्यात बऱ्याचदा मध्यप्रदेशमधून बियाणे येते. त्यांच्या स्तरावर ते सर्टीफिकेट देतात. येथे विभाग प्रयत्न करीत आहे की, प्रत्येक जिल्ह्यात गेलेल्या लॉटपैकी बियाणे टेस्ट झाली पाहिजे. यामध्ये अडचण येत असेल तर विभाग खटला दाखल करेल. मागील वर्षी मोठ्या प्रमाणावर खटले दाखल केल्यामुळे यावर्षी एकही तक्रार आलेली नाही.

समितीने असे मत व्यक्त केले की, आयुक्तांनी सांगितले की, २९१४ प्रकरणी कारवाई केलेली आहे. परंतु असेही म्हटले आहे की, सर्व प्रकरणे मेजॉरीटीने न्यायप्रविष्ट आहेत. शेतकरी म्हणजे सर्वसामान्य माणूस आहे. राज्य सरकारच्या महाबीज कंपनी विषयी देखील तक्रारी आहेत. मागील वेळी सोयाबीनबाबत महाबीजविरोधात शेतकऱ्यांनी तक्रारी केलेल्या आहेत. महाबीज राज्य सरकारची कंपनी असल्याने यास कोण जबाबदार आहे. राज्य सरकारच्या प्रयोगशाळा वापरल्या जातात. आपल्या दृष्टीने बियाणे खराब निघणे हा एक इश्यु असतो, शेतकऱ्याची बियाणांमुळे एक पेरणी चुकली तर एक वर्ष वाया जाते. एक वर्ष वाया जाणे म्हणजे दोन-पाच वर्ष शेतकऱ्याचा तोटा होतो असे गणित असते. तुम्ही न्यायालयात किंवा पोलिसात तक्रार करता, वन विभागाचे व अन्य विभागाचे कायदे आहेत, अशा प्रकारे कृषि विभागाकडून जरब बसविणारे कायदे झाले पाहिजेत. मागील वेळी कृषि मंत्री महोदयांनी बियाणे दुकानांची तपासणी केली यानंतर व्यापारी दुकानांनी शेतकऱ्यांना जास्त त्रास दिला. कृषि मंत्री गेल्याने व्यापाऱ्यांना जे बियाणे पाहिजे ते मिळालेच नाही. विभागाने दाखल केलेल्या एवढ्या केसेस प्रलंबित असताना एखाद्याला शिक्षा झाल्याचे उदाहरण आहे का? एखाद्या कंपनीचा मालक आठ दिवस जेलमध्ये गेल्याचे उदाहरण आहे का? कृषि विभागाने याकरिता कठोर कायदे केले पाहिजेत? महाबीजमध्ये आपणच अधिकारी नेमता, वैज्ञानिक नेमता. शासनाच्या कंपनीला विभागाने बोलायचे नाही का. शेतकऱ्यांना छळण्याचा अधिकार कंपन्यांना आहे का. हा केवळ यवतमाळपुरता मुद्दा नाही, राज्याचा मुद्दा आहे. बियांणाच्या तक्रारीमध्ये दुकानावर कारवाई करतो, सहा महिने ते एक वर्ष दुकान सील करतो पण कंपन्या मोकाट असतात. यावर आयुक्त, कृषि यांनी समितीस विदित केले की, गतवर्षी महाबीजच्या तक्रारी आल्या होत्या हे समितीचे म्हणणे बरोबर आहे. महाबीजकडून शेतकऱ्यांना अडीच कोटी रुपये नुकसानभरपाई दिलेली आहे. ३८८४ शेतकऱ्यांना बियाणे देखील बदलून दिलेले आहे. समितीचे म्हणणे आहे की, कठोर कारवाई झाली पाहिजे. विभागाने दहा कंपन्यांचे लायसन्स रद्द केले आहे. ४२ कंपन्यांवर ८३ एफआयआर देखील केलेले आहेत. त्या कंपन्या सर्वोच्च न्यायालयात (सुप्रीम कोर्टात) गेल्या व यावर स्टे आणला आहे. त्याबाबत राज्यावर फारसा प्रभाव नाही की, त्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत सांगू. राज्याकडे अधिकार आहेत की, सँपल फेल झाले तर न्यायालयात खटला दाखल करतो, सुनावणी होऊन कंपन्यांना दंड व शास्ती दिली जाते. आपले म्हणणे बरोबर आहे की, न्यायप्रविष्ट प्रकरणात लांबलचक प्रक्रिया आहे. २०१८ मध्ये कायद्यात तरतूद करण्यासाठी विधेयक आणले होते ते अजूनही संसदेमध्ये प्रलंबित आहे. सर्व राज्यांत असाच अनुभव येत आहे. मागील २-३ वर्षात दिवाळीच्या वेळी व पीक काढणीच्या वेळी मोठ्या प्रमाणावर पाऊस येतो. सोयाबीन बियाणाचे आऊटर कोट फार नाजूक असल्याने लवकर मोड येतात. मागील वर्षी याचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर होते. लागवडीनंतर कमी पाऊस झाल्यासही बियाणे खराब होतात. यावर्षी मोठ्या प्रमाणावर आम्ही काळजी घेतली आहे. किती बियाणे बदल करायचे याचे प्रमाण असते. ३५ टक्के बियाणे बदल केला पाहिजे, दर तीन वर्षांनी शेतकऱ्यांनी हे केले पाहिजे. यवतमाळ जिल्ह्यात बियाणे बदल दर ७० टक्के आहे, म्हणजे दुप्पट आहे. यावर्षी आम्ही मोहिम सुरू केली की, शेतकऱ्यांनी स्वतः बियाणे तयार करायचे. याचा मोठा परिणाम झाला आहे. आपल्याकडे एकूण ३४ लाख क्विंटल बियाणे अपेक्षीत असते. यापैकी १२ लाख क्विंटल बाहेरून खरेदी करतात. १५ लक्ष क्विंटल स्वतःचे करतात. यावर्षी २२ लक्ष क्विंटल बियाणे शेतकऱ्यांनी स्वतःकडील वापरले आहे. ७ लाख क्विंटल घरच्या बियाणाचा शेतकऱ्यांनी वापर केलेला आहे. यामुळे शेतकऱ्यांचे ७०० कोटी रुपये वाचले आहेत. तक्रारींची संख्या लाखावर होती ती ५३० वर आलेली आहे. यावर्षी आम्ही अशा प्रकारची मोहिम राबविणार आहे. आम्ही केलेल्या एफआयआरमध्ये पोलीस तपासणी झालेली आहे. चार्जशीट फाईल करण्यासाठी प्राप्त झालेले आहे. पण सर्वोच्च न्यायालयाची (सुप्रीम कोर्टाची) स्थगिती असल्याने सध्या विभाग कारवाई करु शकत नाही. तरी देखील विभाग पाठपुरावा करीत आहे.

यावर समितीने आपले मत व्यक्त केले की, बोगस बियाणांचा विषय आहे. शेतकरी फार्मर कंपन्या स्थापन केलेल्या आहेत. बऱ्याच ठिकाणी त्यांनी बियाणे वाटप केले परंतु त्यांना उत्पन्न आले नाही म्हणून प्रायव्हेटमध्ये दुसरे सोयाबीन घेतले व परत पॅकींग करून काही लोकांनी विकले. राज्यात असेही प्रकार होत आहेत. ते देखील चुकीचे आहे. पेरणीकरिता दिलेले बियाणे न घेता इतर

खाजगी (प्रायव्हेट) लोकांकडून बियाणे घेतले आहे, महामंडळाने शेतकऱ्यांना दिलेले बियाणे प्लॉट फेल झाल्याने मार्केटमधून सोयाबीन घेऊन महामंडळाने शेतकऱ्यांना दिले, असे प्रकार घडलेले आहेत. यावर आयुक्त कृषि यांनी समितीस विदित केले की, महामंडळ सर्व बियाणे प्रमाणित (सर्टीफाय) करते, महामंडळ ट्रुथफुल बियाणे विकत नाही. समितीने काही उदाहरणे सांगितली बुलढाणा जिल्ह्यात शेतकऱ्यांची लिंक होती. ज्यांचे बियाणे प्लॉट खराब झाले त्यांनी दुसरे बियाणे विकत घेऊन महामंडळाला दिले, असेही प्रकार झाले आहे तसेच घरी बियाणे तयार करणाऱ्या अकोल्याच्या एका महिलेस राष्ट्रीय पुरस्कार मिळालेला आहे. या लोकांना प्रोत्साहन देण्यासाठी कृषि विभागाकडून काही करता येऊ शकते ते करावे. सर्रासपणे स्वतःचे बियाणे वापरासाठी शासनाने प्रोसेस चालू केलेली आहे. यावर आयुक्त, कृषि यांनी समितीस विदित केले की, यामध्ये तीन स्टेपस् आहेत. ब्रीडर सीड असते. फाऊंडेशन केले जाते, नंतर सर्टीफाय केले जाते. मोठा प्रश्न हा आहे की, आपल्याकडे ब्रीडर सीडची उपलब्धता नाही. विद्यापीठाने ब्रीडर सीड उत्पन्न करावे असा विभागाने शासन निर्णय निर्गमित केला आहे. फाऊंडेशन कार्यक्रम केला आहे. विभागाने असा नियम केला की, ज्या कंपनीला हे ब्रीडर सीड पाहिजे त्यांनी २५ टक्के ॲडव्हान्स भरावा, मागणीनुसार आम्ही त्यांना सुद्धा बियाणे (सीडस) देऊ. या शेतकरी उत्पादक कंपनीला बीडर सीड मिळत नव्हते त्यामुळे क्वॉलीटीवर परिणाम होत होता. यावर्षी असा शासन निर्णय काढला आहे की, शेतकरी उत्पादक कंपनीलाही बीडर सीडस पाहिजे तेथे उपलब्ध करून देण्यात येईल. यावर समितीने अशी विचारणा केली की, केंद्र शासनाकडे याबाबत शिफारस करता येईल का. एनडीआरएफचे निकष आहेत की, ६५ मीमी पेक्षा जास्त पाऊस झाला तर अतिवृष्टी झाल्याचे समजतात. यावर्षी ६५ मीमी नाही पण सलग पाऊस सुरू होता. त्यामुळे शेतकऱ्यांचे सर्व सोयाबीन गेले आहे. याबाबत कृषि विभाग काही शिफारस करू शकतो का? यावर आयुक्त, कृषि यांनी समितीस विदित केले की, केंद्र सरकारची प्रधानमंत्री पीक विमा योजना याकरिता आहे. मागील वर्षी शेतकऱ्यांना यात फारसा लाभ मिळाला नाही पण यावर्षी आतापर्यंत सिझनमध्ये व लोकल कॅलॅमीटीजमध्ये १००० कोटीचे क्लेम झालेले आहेत. यावर्षी हा आकडा २५०० कोटीपर्यंत जाणार आहे असा अंदाज आहे. ६५ मीमी निकषाबाबत विभागाने स्पष्ट केले, जेथे शेतकऱ्याचे नुकसान होत आहे तेथे शक्यतो जिल्हाधिकारी महोदयांच्या स्तरावर नुकसान नोंदणी केली जाते. यावर समितीने अशी विचारणा केली की, अतिवृष्टीच्या ६५ मीमी निकषात ते नुकसान बसत नाही. ६४.५ मीमी असले तरी त्यामध्ये बसत नाही. यावर कृषि, आयुक्त यांनी समितीस माहिती दिली की, एनडीआरएफचा तसा निकष आहे. तसेच पावसामध्ये पडणारा खंड, सलगचा पाऊस, अतिवृष्टी, पूर याचा त्यामध्ये समावेश असल्याबाबतची शिफारस एक्झामीन करून करता येईल व याबाबत मदत व पुनर्वसन विभागाचे मदत देण्याचे निकष आहेत, कृषि विभागाकडून विभाग शेतकऱ्यांना प्रोत्साहित करतो की, इंटीमेशन्स द्यावेत, पीक विमा योजनेत विभाग त्यांना ॲशुअर करतो. यावर्षी ३८ लाख इंटीमेशन्स आलेले आहेत. एक हजार कोटीची नुकसान भरपाई विभागाने वाटप केलेली आहे. समितीने याबाबत शिफारस करता येईल का ते पहावे अशी सूचना केली व यावर विभागाने सहमती दर्शविली.

**अभिप्राय व शिफारशी :**

पंचायती राज समितीने दिनांक १६ ते १८ फेब्रुवारी, २०२१ या कालावधीत यवतमाळ जिल्हा परिषदेस भेट दिली. त्यावेळेस सन २०११-२०१२ व २०१७-२०१८ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान समितीस माहिती प्राप्त झाली की, जिल्ह्यात अहवाल वर्षात पेरणी खाली ९ लाख ६० हजार ५०० हेक्टर क्षेत्र उपलब्ध होते, यापैकी एकापेक्षा अधिक वेळा पेरणी केलेले ८७ हजार हेक्टर क्षेत्र होते. तसेच अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे झालेले नुकसान व त्याअनुषंगाने देण्यात आलेली भरपाई याबाबतची माहिती घेत असताना समितीच्या निदर्शनास आले की, अनेक कंपन्यांकडून निकृष्ट दर्जाच्या बियाणांचा पुरवठा केला जात असल्याने या बोगस बियाणांमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. गतवर्षी ज्या कंपनीचे बियाणे चांगल्या प्रतीचे होते. त्या बियाण्यांची मागणी शेतकऱ्यांकडून केली जाते. परंतु सदर कंपनीचे बियाणे जास्त प्रमाणात उपलब्ध नसल्याने बियाणे विक्रेते या कंपनीच्या बियाणांमध्ये अन्य बियाणे मिसळून बियाणांची विक्री करतात. या बोगस बियाणासंदर्भात विक्रेत्यांचे परवाने रद्द करण्यात येतात. परंतु संबंधित बियाणांच्या कंपन्याविरूद्ध कोणतीही कारवाई करण्यात येत नाही. यास्तव या जिल्ह्यात कृषि विभागाकडून गुण नियंत्रण कामकाज करतांना कृषि केंद्राची बोगस बियाणांसंदर्भात केलेली तपासणी, त्याअनुषंगाने आढळून आलेले एकूण प्रकरणे व केलेली कारवाई याबाबतचा सविस्तर अहवाल समितीने सादर करण्याबाबत निदेश दिले.

त्यानुसार यवतमाळ जिल्हा परिषद यांच्याकडून सादर करण्यात आलेली माहिती व शेतकऱ्यांच्या संदर्भातील अतिशय महत्वाच्या असलेल्या या विषयासंदर्भात योग्य ती कारवाई करण्याच्या दृष्टीने घेण्यात आलेल्या विभागीय सचिवांच्या साक्षीत समितीस माहिती प्राप्त झाली की, बियाणे कायदा १९६६, बियाणे अधिनियम १९६८ व बियाणे नियंत्रण आदेश १९८३ मधील तरतूदीचे उल्लंघन झाल्यास कंपनी, वितरक व विक्रेते यांच्यावर कारवाई करण्यात येते. सन २०१९-२०२० मध्ये अशाप्रकारे अप्रमाणित नमुने आढळून आलेल्या १७ प्रकरणात, सन २०२०-२०२१ मध्ये ३२ प्रकरणात व सन २०२१-२०२२ मध्ये ६२ प्रकरणांपैकी २७ प्रकरणात

न्यायालयीन व ३५ प्रकरणात पोलीस केस बियाणे कायदा तरतूदीनुसार कंपनी, वितरक व विक्रेत्यांच्यावर कारवाई करण्यात आली असून सर्व प्रकरणे न्यायप्रविष्ट आहेत. सन २०१७-२०१८ पासून बियाणे विक्रेत्या कंपन्यावर एकूण २९१४ केसेस केलेल्या असून गतवर्षी १० कंपन्यांचे परवाने रद्द केलेले आहेत. तसेच दारव्हा तालुक्यातील धरतीधन सिडस ॲन्ड प्रोसेसींग प्लांट बोरी अरब या कंपनीने बियाणा कायद्याचे उल्लंघन केल्यामुळे त्यांचेवर फौजदारी गुन्हा दाखल करून त्यांचे परवान्यावर कारवाईचा प्रस्ताव कृषि आयुक्त, कृषि आयुक्तालय, पुणे यांचेकडे सादर करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे गतवर्षी कृषि विभागाकडे प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने १५ हजार शेतकऱ्यांना ६२०० क्विंटल बियाणे बदलून दिले असून ६ कोटी ८० हजार नुकसान भरपाईचे वाटप केलेले आहे. शेतकऱ्यांनी स्वतःचे बियाणे वापरले पाहिजे याकरिता जास्त प्रयत्न विभागाकडून करण्यात येत आहे.

राज्यातील शेतकऱ्यांच्या शेतातील पेरणीसाठी चांगले व दर्जेदार बियाणे उपलब्ध व्हावे यासाठी बी-बियाणे अधिनियम, १९६६ व १९६८ तसेच बियाणे नियंत्रण कायदा १९८३ शासनाने लागू केला असून त्यानुसार अप्रमाणित नमुने आढळून आल्यास संबंधितांवर **शासनाकडून कारवाई करण्यात येते. तथापि, यासंदर्भात जिल्हास्तरावर शेतकऱ्यांमध्ये जागरूकता निर्माण करणे अत्यंत आवश्यक आहे. यासाठी शेतकऱ्यांनी बियाणे खरेदी करताना शक्यतो बीज प्रमाणिकरण यंत्रणेने प्रमाणित केलेली बियाणे खरेदी करावे, अधिकृत बियाणे विक्रेत्यांकडून व परवानाधारक दुकानदाराकडून बियाणे खरेदी करावे, बियाणांच्या खरेदीची पक्की पावती विक्रेत्यांकडून घ्यावी, या पावतीवर घेणाऱ्याचे नाव, लॉट क्रमांक, उत्पादक कंपनीचे नाव याबाबतचा तपशील नोंदवून घ्यावा, खरेदी केलेल्या बियाणांच्या पिशवीवर पिकाचे नाव, उगवणशक्ती इत्यादी माहिती निर्देश केल्याप्रमाणे असल्याचे तपासून घ्यावे, पिशवीवर दिलेल्या बियाणांच्या दराने बियाणांची खरेदी करून तोच दर सदर पावतीवर लिहिला असल्याची खात्री करावी, अन्यथा जादा दरांबाबत कृषि अधिकारी, पंचायत समिती किंवा कृषि अधिकारी, जिल्हा परिषद यांच्याकडे तक्रार करावी, नूतनीकरणाचे बियाणांची वैधता सहा महिने तर नवीन बियाणांची नऊ महिन्यापर्यंत असते यासंदर्भातील माहिती द्यावी. हंगामनिहाय शिफारशीनुसार बियाणांची पेरणी करावी, वेगवेगळ्या लॉटचे बियाणे एकत्रित करून पेरणी करू नये. दर तीन वर्षांनी बियाणांच्या वापरामध्ये बदल करावा, बियाणांच्या पिशवीस असलेले लेबल / बीज प्रमाणिकरणाचा टॅग व खरेदीची पावती जपून ठेवावी जेणेकरून सदोष व भेसळयुक्त बियाणेसंदर्भात जिल्हा ग्राहक मंचाकडे दावा दाखल करणे शक्य होईल, इत्यादीसह शेतकऱ्यांच्या दृष्टीने महत्वाची असलेली अन्य माहिती शेतकऱ्यांना वेळोवळी मिळावी याकरिता जिल्हा/तालुका/ग्रामपंचायत स्तरावर शेतकरी शिबीरांचे आयोजन करावे व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यांच्या आत सादर करावी, अशी समिती शिफारस करीत आहे.**

बियाणे पुरवणारी कंपनी, वितरक व विक्रेते यांच्याकडून शेतकऱ्यांना निकृष्ट दर्जाचे बियाणे पुरविण्यात येत असल्याच्या अनेक तक्रारी शेतकऱ्यांकडून प्राप्त होत असून त्यानुसार केलेल्या तपासणीत बोगस बियाणे आढळून आलेली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना दुबार पेरणी करावी लागत असल्याने त्यांचे एक वर्ष वाया जाऊन मोठ्या प्रमाणात अर्थिक नुकसान होते. यासाठी शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च कमी करून आर्थिक उन्नती साधता यावी व बियाणे खरेदी प्रकरणातील फसवणूक टाळता यावी. तसेच बियाणे कंपन्यांची मक्तेदारी कमी करण्यासाठी व बियाण्यांच्या तुटवड्याची समस्या दूर करण्यासाठी शेतकऱ्यांना स्वतःचे बियाणे वापरले पाहिजे त्यासाठी त्यांना प्रोत्साहीत करणे, शेतकऱ्यांना घरगुती बियाणे स्वस्त दरात उपलब्ध व्हावेत व बियाणे उत्पादक शेतकऱ्यांना सहजरित्या शेतकरी ग्राहक मिळावा यासाठी "बियाणे महोत्सव" जिल्हा / तालुका / ग्रामपंचायत स्तरावर राबविण्यात यावेत. बियाणांच्या दर्जावर कोणताही परिणाम होऊ नये याकरिता कृषि विद्यापीठांनी पैदासकार बियाणांचे (Breeder seed) उत्पादन करावे व शेतकरी उत्पादक कंपनीला मागणीनुसार सदरहू पैदासकार बियाणे उपलब्ध करून द्यावीत. तसेच पेरणी हंगामापुर्वी किमान **तीन महिने अगोदर रब्बी व खरीप पिकासाठी त्या विभागात एकूण पिकक्षेत्रासाठी त्या पिकांकरीता किती बियाणांची आवश्यकता आहे, त्या बियांणांची निर्मिती कोणती कंपनी किती प्रमाणात करते, तसेच हवामानाचा अंदाज घेऊन शेतकरी कोणत्या बियांणांची लागवड करणार आहेत याबाबतचा आढावा घेऊन बियाणांची निर्मिती व त्याचा वापर याबाबतचे नियोजन कृषि विभागाने पेरणीपूर्वी करून शासनाद्वारे कंपन्यांकडून उत्कृष्ट व दर्जेदार बियाणे कसे मिळेल याचे संनियंत्रण व नियोजन करावे तसेच बोगस बियांण्यांवर आळा बसविण्याच्या दृष्टिने बियाणे निर्मिती कंपन्यांची कठोर तपासणी करावी इत्यादी बाबत योग्य ते नियोजन व संनियंत्रण करण्याबाबत आराखडा तयार करून त्याची अंमलबजावणी करावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यांच्या आत सादर करावी, अशी समिती शिफारस करीत आहे.**

महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ (महाबीज) हा महाराष्ट्र शासनाचा उपक्रम असुन महाबीज कडून राज्यातील शेतकऱ्यांना भारतीय बीज प्रमाणिकरणाचे किमान मानकानुसार व बीज यंत्रणेने प्रमाणित केलेले प्रचलित वाणांचे गुणवत्तापूर्वक बियाणे पुरवठा

करणे हा मुख्य उद्देश आहे. असे असतानाही महाबीजकडून निकृष्ट दर्जाची बियाणे पुरविण्यात येत असल्याच्या अनेक तक्रारी शेतकऱ्यांकडून प्राप्त होत असतात. प्राप्त तक्रारीनुसार तपासणी करून संबंधित शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यासह या प्रकरणात निष्काळजीपणा व बेजबाबदारपणा आढळून आलेल्या महाबीजच्या अधिकारी/कर्मचारी यांच्यावरही शासकीय नियमानुसार कारवाई होणे आवश्यक आहे. तसेच शेतकऱ्याकडून प्राप्त झालेल्या अनेक तक्रारीच्या अनुषंगाने बियाणे वितरक व विक्रेते यांच्यावर कारवाई करण्यात येते परंतु बियाणे उत्पादन करून पुरवठा करणाऱ्या कंपनीवर कोणतीही कारवाई होत नाही. यासाठी निकृष्ट दर्जाची बियाणे पुरवठा केल्यासंदर्भातील न्यायप्रविष्ठ असलेल्या प्रकरणांमध्ये शेतकऱ्यांची व शासनाची बाजू योग्य त्या पुराव्यांसह मांडण्याच्या **दृष्टीने विधी तज्ञ असलेल्या नामवंत जेष्ठ अधिवक्तांची नेमणूक करून संबंधित कंपन्यांवर कठोर कारवाई होईल याबाबत कार्यवाही करण्यात यावी. त्याचप्रमाणे बियाणे उत्पादन करून पुरवठा कंपन्यांवर देखील शासनाकडून कठोर कारवाई करण्यात येत असल्याचे दर्शविण्यासाठी धरतीधन सिडस ॲन्ड प्रोसेसींग प्लांट बोरी अरब ता. दारव्हा जि. यवतमाळ या कंपनीवर फौजदारी गुन्हा दाखल करून कारवाई करण्यासंदर्भातील कृषि आयुक्त, कृषि आयुक्तालय, पुणे यांच्याकडे पाठवण्यात आलेल्या प्रस्तावांवर तातडीने कार्यवाही करून संबंधित कंपनींवर कठोर कारवाई करण्यात यावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्याच्या आत सादर करावी, अशी समिती शिफारस करीत आहे.**

राष्ट्रीय आपत्ती निवारण दल (NDRF) च्या निकषानुसार अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देताना त्या मंडळात ठेवण्यात आलेल्या पर्जन्यमापक यंत्रावरील नोंदीनुसार पावसाची नोंद ६५ मि.मि. पेक्षा जास्त असेल तरच नुकसान **भरपाई देण्यात येते. परंतु अनेकदा पर्जन्यमापक यंत्र ठेवण्यात आलेल्या मंडळात पाऊस होत नाही पण त्याचवेळी आसपासच्या गावांमध्ये पाऊस पडलेला असतो. त्यामुळे ६४.५ मि.मि. इतका पाऊस झालेला असतानाही शेतकरी नुकसान भरपाईपासून वंचित रहातात. पावसाचे मोजमाप व हवामानाचा अंदाज अचूक मिळून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना योग्य प्रकारे भरपाई मिळावी यासाठी पावसाचे व इतर हवामान विषयक बाबींचे मोजमाप करण्यासाठी प्रत्येक मंडळात उभारण्यात आलेल्या स्वयंचलित हवामान केंद्रांची संख्या वाढवण्याबाबतची कार्यवाही शासनाने तातडीने करावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्याच्या आत सादर करावी, अशी समिती शिफारस करीत आहे.**

## प्रकरण सहा

## जिल्हा परिषद , यवतमाळ

## जलयुक्त शिवार अभियानअंतर्गत झालेली कामे व पाणी पुरवठा योजनांबाबत

पंचायती राज समितीने दिनांक १६ ते १८ फेब्रुवारी,२०२१ या कालावधीत यवतमाळ जिल्हा परिषदेस भेट दिली. भेटीच्या वेळी २०११-१२ व २०१७-१८ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान यवतमाळ जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने विचारणा केली की, अहवाल वर्षात शेततळी व जलयुक्त शिवार कामे का करण्यात आली नाहीत, यावर कार्यकारी अभियंता (सिंचन) यांनी अहवाल वर्षी सदर कामे झालेली नाहीत अशी वस्तुस्थिती असल्याचे समितीला विदित केले. यावर समितीने दौऱ्याच्या वेळी तीन तालुक्यांना भेट देऊन पाहणी केली होती त्यात सन २०१७-१८ मध्ये कोठेही जलयुक्त शिवाराची कामे झालेली नाहीत. तसेच पुसद तालुक्यात फक्त एक काम सुरू होते. ते देखभालीचे (मेंटेनन्सचे) काम होते अशी परिस्थिती समितीच्या निदर्शनास आली. यावर कार्यकारी अभियंता (सिंचन) यांनी समितीला विदित केले की, हा कृषि विभागाशी संबंधित मुद्दा आहे. शेततळयाची सन १६-१७ मध्ये २३ कामे आणि सन २०१७-१८ मध्ये ९७ कामे झालेली आहेत. नवीन कामांची माहिती देण्यात आली आहे. ही कामे दुरुस्तीची होती.

यावर समितीने असे निदर्शनास आणून दिले की, दुरुस्तीची कामे असली तरी त्याबाबत लेखी स्पष्टीकरणामध्ये माहिती नमूद करणे अत्यावश्यक होते. परंतु लेखी स्पष्टीकरणामध्ये शेततळी व जलयुक्त शिवाराची कामे शुन्य असल्याचे दर्शविण्यात आले आहे. ही बाब योग्य नाही. तसेच याबाबत समितीला सविस्तर माहिती द्यावयास पाहिजे होती. परंतु सदर माहिती समितीपासून दडविण्यात आली आहे. ही अतिशय गंभीर बाब आहे. सुधारित माहिती देत असताना विविध विभागाकडून त्यांच्या विभाग प्रमुखांच्या स्वाक्षरीसह माहिती प्राप्त होत असते. त्यानंतर सदर माहिती एकत्रितरित्या संकलीत करून नंतर ती छापली जाते. परंतु लेखी स्पष्टीकरणातील माहिती पूर्णतः नमूद झालेली नाही. या बाबतीत नेमकी कोणाची चूक झाली आहे व राज्यात जलयुक्त शिवार कामांमध्ये मोठा भ्रष्टाचार झाला आहे. पंचायती राज समिती दौऱ्यावर येत असताना सुद्धा यवतमाळ जिल्ह्यातील जलयुक्त शिवारच्या कामांची माहिती समितीपासून दडविण्यात आली. या बाबतीत सखोल चौकशी होणे आवश्यक आहे. समितीपासून सत्य माहिती दडवण्यात आली आहे. ही बाब अतिशय गंभीर आहे. अशी नाराजी समितीने व्यक्त केली.

### पाटबंधारे विभाग (१) प्र.क्र. ५ (१) (झ), पृ. क्र. १०१

यवतमाळ जिल्ह्यात राबविलेल्या व राबविण्यात येणाऱ्या जलयुक्त शिवार योजनेसंबंधी तपशिलवार देण्यात आलेल्या लेखी स्पष्टीकरणामध्ये जलयुक्त शिवाराची कामे व शेततळयांच्या संदर्भात कोणतीही माहिती नमूद केलेली नाही. ही बाब योग्य नाही अशी विचारणा समितीने केली यावर कार्यकारी अभियंता (सिंचन) यांनी समितीस विदित केले की, सदरहु कामे जलयुक्त शिवाराच्या लेखा शिर्षामधीलच (हेड)आहेत. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, समितीला सत्य माहिती देणे अत्यावश्यक आहे. समितीने विचारलेल्या प्रश्नाला वेगळीच माहिती दिली जात आहे. हा समितीच्या विशेषाधिकाराचा भंग होत आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या संदर्भात चौकशी करावी. तसेच गरज पडल्यास त्या बाबतीत संबंधितांविरुद्ध कारवाई करावी व त्याबाबतचा अहवाल समितीकडे सादर करावा तसेच याबाबत विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात येईल असे निदेश दिले यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सहमती दर्शविली.

### पाटबंधारे विभाग (१) प्र.क्र. ५ (२) (ग), पृ. क्र. १०२

समितीने अशी विचारणा केली की, सन २०१७-२०१८या अहवाल वर्षी पाणीपट्टी वसुलीचे किती उद्दिष्ट होते व त्यापैकी किती पाणीपट्टी वसूल झाली यावर कार्यकारी अभियंता (सिंचन) यांनी समितीस विदित केले की, अहवाल वर्षी रक्कम रु.१९,८७,६७९/- थकबाकीसह पाणीपट्टीची मागणी होती. त्यापैकी मार्च २०१८ पर्यंत रक्कम रु.५६,४९०/- तसेच सन २०१९-२० मध्ये रक्कम रु.१,०८,५१४/- इतक्या रकमेची पाणीपट्टी वसूल करण्यात आली.

### धडक सिंचन विहिरी प्र.क्र. ५ (४) , पृ. क्र. १०३

समितीने अशी विचारणा केली की, जिल्ह्यातील ७५१ विहिरी अद्याप सुरू झालेल्या नसून ६६० विहिरी रद्द केलेल्या आहेत. याबाबत समितीला सविस्तर माहिती देण्यात यावी यावर कार्यकारी अभियंता (सिंचन) यांनी समितीला विदित केले की, यवतमाळ जिल्ह्याला ४८०० विहिरींचा लक्षांक होता. त्यापैकी ४६५८ विहिरींना प्रशासकीय मान्यता देण्यात आली. आजच्या स्थितीत ४०१६

विहिरींची कामे पूर्ण झालेली आहेत. उर्वरित विहिरींची कामे सुरू आहेत. अशाप्रकारे ८९.९० टक्के काम पूर्ण झालेले असून उर्वरित कामे मार्च महिन्यापर्यंत पूर्ण होतील यावर समितीने विचारणा केली की, लाभार्थ्यांची निवड ऑनलाईन पद्धतीने करण्यात आली की दुसरी कोणती पद्धत अवलंबिण्यात आली होती याबाबत कार्यकारी अभियंता (सिंचन)यांनी समितीस विदित केले की, या सर्व विहिरी ऑफलाईन आहेत. समितीने शंका व्यक्त केली की, परंतु ऑफलाईन प्रक्रियेला मान्यताच नव्हती. सर्व प्रक्रिया ऑनलाईन होती. लाभार्थी निवड कशी केली गेली यावर कार्यकारी अभियंता (सिंचन)यांनी समितीस माहिती दिली की,५ जिल्ह्यांमध्ये ऑनलाईन विहिरी आहेत. त्यासाठीचे पोर्टल देखील वेगळे आहे. लाभार्थी निवड ईश्वर चिठ्ठीद्वारे करण्यात आली. यावर समितीने आपले मत व्यक्त केले की, ईश्वर चिठ्ठी कोणत्या नियमाद्वारे काढण्यात आली यामुळे शासन निर्णयाचा भंग झाला आहे का तसेच काही विहिरींची कामे बाकी आहेत. त्यामुळे हा विषय सचिवांच्या साक्षीमध्ये घेऊन व उर्वरित विहिरींची कामे पूर्ण करण्याबाबतचे समितीने निदेश दिले.

समितीने अशी विचारणा केली की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागामार्फत आतापर्यंत ४०७ स्वतंत्र पाणी पुरवठा योजनांची कामे घेण्यात आली असून ४०७ कामे पूर्ण झालेली आहेत. त्यापैकी ४०७ स्वतंत्र पाणी पुरवठा योजनांद्वारे पाणी पुरवठा सुरू आहे. त्याचप्रमाणे ८ प्रादेशिक योजनांपैकी ४ प्रादेशिक योजनांची कामे पूर्ण करण्यात आलेली आहेत. त्या पूर्ण झालेल्या ४ प्रादेशिक योजनांपैकी ३ प्रादेशिक योजना (किन्ही, शिवणी होरकड व निंगनुर) जि.प. मार्फत सुरू व १ (बेलोरा व माळपठार) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मार्फत अशा एकूण ४ प्रादेशिक योजना सुरू आहेत. ३ प्रादेशिक योजना अपूर्ण अशी समितीने विचारणा केली असता व १ योजना बंद आहेत. या योजना अपूर्ण किंवा बंद असण्याची कारणे काय आहेत, यावर कार्यकारी अभियंता (मजीप्रा) यांनी समितीस विदित केले की, करजगाव व धुळापूर, हर्षी बंद व सावरखेडा अशा तीन योजना बृहत आराखडयांतर्गत महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (एम.जे.पी.) मार्फत राबविण्यात आल्या होत्या. सदर योजना कार्यान्वित केल्यानंतर काही कारणास्तव वसुली न झाल्यामुळे किंवा हस्तांतरित न झाल्यामुळे कालांतराने बंद पडल्या. सद्यस्थितीत स्थानिक विहिरी, हातपंप, इत्यादींमार्फत पाणी पुरवठा करण्यात येतो यावर समितीने विचारणा केली की, करजगाव व धुळापूर, हर्षीबंद व सावरखेडा या तिन्ही योजनांसाठी एकूण किती खर्च करण्यात आला आहे यावर कार्यकारी अभियंता (मजीप्रा) यांनी समितीस विदित केले की, हर्षीबंद योजनेसाठी सुमारे साडे पाच कोटी रुपये, सावरखेडा योजनेसाठी दीड कोटी व करजगांव योजनेसाठी अंदाजे ७ कोटी रुपये खर्च झाला होता. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, एखाद्या योजनेसाठी एवढा निधी खर्च करून ती योजना काही दिवसांनी बंद पडत असेल तर ही बाब अतिशय चुकीची आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या योजना सुरू करण्यासाठी काही प्रयत्न केले काय, कार्यकारी अभियंता (पाणीपुरवठा) यांनी या योजना सुरू कशा होतील यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे पाठपुरावा करावा. जेणेकरुन ते वरच्या स्तरावर पाठपुरावा करतील. परंतु या योजना सुरू झाल्या पाहिजेत. कारण शासनाचा करोडो रुपयांचा खर्च वाया जात आहे. यावर कार्यकारी अभियंता (पाणीपुरवठा) यांनी समितीस विदित केले की, खनिज निधी अंतर्गत विविध कामे करण्यासाठी आपण करजगाव योजना प्रस्तावित केली आहे. या योजनेची कामे देखील सुरू झाली आहेत. तसेच सावरखेडा व हर्षी येथील पाणी पुरवठा सुरू आहे. जल जीवन मिशन-२०२० मध्ये आम्ही हर्षी योजना प्रस्तावित केलेली आहे यावर समितीने अशी विचारणा केली की, जल जीवन या मिशन अंतर्गत लोकांना सरासरी किती लिटर पाणी पुरवठा केला पाहिजे , तसेच हे पाणी शुद्ध असणार आहे की अशुद्ध ? त्यासाठी आवश्यक ट्रीटमेंट प्लांट आपण प्रस्तावित केला आहे का तसेच काही पाणी पुरवठा योजना जिल्हा परिषदेकडे असतात तर काही महाराष्ट्र जीवन प्राधीकरण कडे (एमजेपी) असतात तर एमजेपीकडे कोणत्या योजना असतात यावर कार्यकारी अभियंता (पाणीपुरवठा) यांनी समितीस विदित केले की, ५५ लिटर प्रती व्यक्ती याप्रमाणे पाणी दिले पाहिजे तसेच शुद्ध पाणी पुरवठा केला जाणार आहे व ट्रीटमेंट प्लांट प्रस्तावित केला आहे व ज्या योजनेची किंमत पाच कोटी रुपयांच्या आत असते ती योजना जिल्हा परिषदेमार्फत तर ज्या योजनेची किंमत ५ कोटी रुपयांपेक्षा जास्त असते ती योजना एमजेपीमार्फत पूर्ण केली जाते. यावर समितीने विचारणा केली की, जल जीवन मिशन अंतर्गत जिल्ह्याचा आराखडा तयार झाला आहे का यावर कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) यांनी समितीस माहिती दिली की, जिल्ह्यामध्ये अशी १६२ गावे आहेत की ज्या ठिकाणी पाणी पुरवठा योजना नाहीत. त्यापैकी ७० गावे आपण यावर्षी प्राधान्याने घेतली आहेत तर उर्वरित ९२ गावे पुढील वर्षी घेणार आहोत तसेच हा कार्यक्रम (प्रोग्राम) सन २०२४ पर्यंत पूर्ण करायचा आहे. त्यामुळे दोन टप्प्यांमध्ये गावे घेण्यात येणार आहेत. तशा मोठ्या योजना नाहीत. जास्तीत जास्त साठ ते सत्तर लाख रुपयांपर्यंतच्या या योजना आहेत. पुढील दोन वर्षांमध्ये अनुक्रमे ७० आणि ९२ गावांच्या पाणी पुरवठा योजना पूर्ण झाल्या तर जिल्ह्यातील प्रत्येक गावातील प्रत्येक व्यक्तीला नळाद्वारे पाणी पुरवठा होईल. तसेच समितीला महागाव पंचायत समितीमधील फुलसावंगी येथील पाणी पुरवठा योजनेमध्ये सुमारे २७ लाख रुपयांचा भ्रष्टाचार झाला आहे. याबाबतची तक्रार प्राप्त झाली याबाबतची माहिती विचारण्यात आली यावर कार्यकारी अभियंता (पाणीपुरवठा) यांनी समितीस विदित केले की, फुलसावंगी येथील २.८६ लाख रुपयांच्या कामाला तांत्रिक मान्यता देण्यात आली होती. सदर काम देखील पूर्ण झाले आहे. समितीने अशी

विचारणा केली की, जल जीवन मिशनच्या अंतर्गत आपण प्रत्येक तालुकानिहाय आराखडा तयार करीत आहोत. प्रती व्यक्ती प्रती दिन ५५ लिटर पाणी देण्याच्या हिशेबाने आपल्याला आता योजना करावी लागेल. जुन्या योजनांबाबत देखील प्रस्ताव तयार केला पाहिजे. जास्तीत जास्त गावांना योजनेत सहभागी करून घेतले पाहिजे. अशा प्रकारे आपण संपूर्ण जिल्ह्याचा आराखडा बनवला आहे का जर बनवला नसेल तर त्याची सद्यस्थिती काय आहे, याबाबत समितीला अवगत करण्याबाबत निदेश दिले यावर कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा)यांनी समितीस विदित केले की, अद्याप असा प्रस्ताव बनवलेला नाही. परंतु आम्ही सर्व सन्माननीय लोकप्रतिनिधींना याबाबत अवगत केलेले आहे. तसेच माननीय पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली यासंदर्भात एक समिती देखील आहे. माहे डिसेंबर, २०२२ पर्यंत जिल्ह्यातील सर्व गावांना पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे, यासाठी आमचा प्रयत्न सुरू आहे. यावर समितीने आपले मत व्यक्त केले की, असे करीत असताना पूर्वी झालेल्या चुकांची पुनरावृत्ती करु नये. यावर विभागाने सहमती दर्शविली.

याबाबत समितीने असे मत व्यक्त केले की, या विषयाबाबत देखील सचिवांशी चर्चा केली पाहिजे. कारण बऱ्याचदा असे होते की, आयडेंटिफाईड सोर्स हा मुद्दामहून दुरचा दाखविला जातो. त्यामुळे कामाची किंमत वाढते. त्यामुळे आयडेंटिफाईड सोर्स निवडताना तो जवळचा असा निवडला गेला पाहिजे की, कितीही दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली तरीही पाणी कमी होता कामा नये तसेच यवतमाळ जिल्ह्यामध्ये सद्यस्थितीत किती पाणी पुरवठा योजना आहेत यावर कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) यांनी समितीस विदित केले की, सद्यस्थितीत एकूण १५२४ पाणी पुरवठा योजना आहेत. त्यापैकी १४ योजना बंद आहेत. ८ योजना पाणीपट्टी थकबाकीमुळे बंद आहेत तर ६ योजनांना सोर्स कमी पडलेला आहे. यावर समितीने विचारणा केली की, जिल्ह्यामध्ये जी.एस.डी.ए. चे किती लोक आहेत यावर कार्यकारी अभियंता (पाणीपुरवठा) यांनी २ लोक आहेत अशी माहिती दिली तसेच समितीला असाही काही ठिकाणी असा अनुभव आलेला आहे की, कार्यालयामध्ये बसूनच पाणी उपलब्धता प्रमाणपत्र दिले जाते. यावर कार्यकारी अभियंता (मजिप्रा) यांनी समितीस विदित केले की, आता ॲप्लिकेशनद्वारे डाटा संकलित केला जातो त्यामुळे प्रत्यक्ष ठिकाणी जावेच लागते. यावर समितीने सहमती दर्शवून असे मत व्यक्त केले की, यवतमाळ जिल्हा परिषदेचा आदर्श इतर जिल्ह्यांनी घेतला पाहिजे अशा कामाची विभागाकडून अपेक्षा आहे.

तसेच १५२४ योजनांपैकी केवळ १४ योजना बंद आहेत व उर्वरित सर्व योजना सद्यस्थितीत कार्यान्वित असतील असे समितीला वाटत नाही असे मत व्यक्त केले. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, जल जीवन मिशन योजनेवेळी याबाबत सर्वेक्षण केले आहे. त्या अनुषंगाने संबंधित अधिकाऱ्यांनी सांगितलेली आकडेवारी वस्तुस्थितीदर्शक आहे. शासन निर्णयानुसार अ, ब व क वर्गामध्ये गावांची विभागणी केली जाते. एखाद्या योजनेवरुन पाण्याची उपलब्धता होत नसेल व तिच्या दुरुस्तीची आवश्यकता असल्यास अ व ब वर्गात तशी तरतूद केलेली आहे. १५ व्या वित्त आयोगांतर्गत हा खर्च करण्याचा अधिकार ग्रामपंचायतीला आहे.

समितीने अशी विचारणा केली की, यवतमाळ हा जिल्हा पाणी टंचाईग्रस्त म्हणून ओळखला जातो. वर्षानुवर्षे पाणी पुरवठयासाठी खाजगी विहिरी अधिग्रहित करणे किंवा टँकर पुरविणे हीच पद्धती सुरू आहे. कायमस्वरुपी टंचाई दूर करण्यासाठी काय उपाययोजना केल्या आहेत त्याबाबत माहिती द्यावी. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, विभागाने जल जीवन मिशनच्या वेळी आढावा घेतला होता. टँकर हा एक इंडिकेटर आहे. यवतमाळ मध्ये टँकरने पाणी पुरवठा करण्याचे प्रमाण खूप कमी आहे. पुढे कार्यकारी अभियंता (पाणीपुरवठा) यांनी समितीस अधिकची माहिती दिली की, ३ वर्षांपूर्वी जिल्ह्यामध्ये १०४ टँकर होते. मागच्या वर्षी ही संख्या ६९ तर या वर्षी १९ पर्यंत खाली आली आहे. पुढील वर्षी जिल्हा टँकरमुक्त करायचा हे विभागाचे उद्दिष्ट आहे. समितीने श्री.प्रदीप कोल्हे, कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) यांनी अतिशय चांगली व इत्थंभूत माहिती समितीला दिलेली आहे. ही सर्व माहिती ते यामुळे देऊ शकत आहेत कारण त्यांनी काम केले आहे. आपण असेच चांगले काम करून जल जीवन मिशन यशस्वी करून दाखवावे. त्यासाठी समितीच्या वतीने कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) यांना शुभेच्छा व उत्तम कार्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले. कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) यांनी समितीचे आभार मानले.

पुढे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, जल जीवन मिशन विभागाचे यावर्षीचे टार्गेट जास्त होते. त्याच्या ९२ टक्क्यांपर्यंत आम्ही पोहचलो आहोत. ३१ मार्चच्या अगोदर आम्ही टार्गेट पूर्ण करु. पुढील वर्षीच्या योजनांच्या देखील वर्क ऑर्डर आताच द्यायला आम्ही सुरूवात केली आहे. त्यामुळे माहे डिसेंबर, २०२२ किंवा सन २०२३ च्या सुरूवातीपर्यंत ही योजना आम्ही यशस्वी करु शकू. तसे आमचे नियोजन आहे. यावर समितीने अतिशय चांगले नियोजन असल्याचे मत व्यक्त करून सहमती दर्शविली व अशी विचारणा केली की, ग्रामपंचायतींना १५ व्या वित्त आयोगानुसार थेट निधी वितरित केलेला आहे. त्याअंतर्गत प्रत्येकाला नळ जोडणी दिली जाणार आहे. त्याचे कसे नियोजन केले जाणार आहे यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी

समितीस विदित केले की,  यामध्ये अ, ब व क असे वर्गीकरण आहे. क वर्गातील गावे जास्त खर्च असणारी आहेत. तसेच अ व ब वर्गातील गावे किरकोळ दुरुस्तीची कामे असणारी आहेत. जसे की, मोटर बदलणे. समजा एका गावात ५०० कुटुंबे असतील व त्यातील ५० कुटुंबे गावठाणाच्या बाहेर वसलेली असल्यामुळे त्यांना नळ कनेक्शन नसेल तर त्याबाबत अ व ब वर्गातून तरतूद करता येते. वित्त आयोगामार्फत ग्रामपंचायतींना येणारा निधी देखील यासाठी खर्च करण्यात येईल. माननीय मुख्यमंत्री महोदयांनी सर्व मुख्याधिकाऱ्यांची यासंदर्भात कॉन्फरन्स देखील घेतलेली आहे.  यावर समितीने  निदेश दिले की, पाणी पुरवठा योजनांची संपूर्ण माहिती समितीला देण्यात यावी.  यवतमाळ जि.प.मध्ये सद्यःस्थितीत किती पाणी पुरवठा योजना बंद आहेत, किती पाणी पुरवठा योजनांवर काम सुरू आहे.  त्याबाबतची सविस्तर माहिती समितीला पाठविण्यात यावी. याबाबत आवश्यकता वाटल्यास समिती विभागीय सचिवांची साक्ष घेईल, असे मत व्यक्त केले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत माहिती मागविली.**

(१) जलयुक्त शिवाराची कामे व शेततळयांच्या संदर्भात माहिती देण्यात यावी.

(२) पाणीपुरवठा योजनांची संपुर्ण माहिती तसेच किती पाणी पुरवठा योजनांवर काम सुरू आहे याबाबतची माहिती समितीला देण्यात यावी.

**उपरोक्त मुद्यासंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

जलयुक्त शिवाराबाबत  सिंचन विभाग जिल्हा परिषद यवतमाळ यांची माहिती खालीलप्रमाणे

| अ.क्र. | मंजुर वर्ष | कामाचा प्रकार | मंजुर कामाची संख्या | निवीदा किंमत | कामे पुर्ण | रद्द कामे | झालेला खर्च |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ | सन २०१५-१६ | | | | | | |
| १. | | सिंमेट नाला बांध | ५० | ५०१.५०४ | ४१ | ९ | ४३२.२५ |
| | | कोपब/सित /पातवि दुरुस्ती | ५२ | ५३९.२० | ४८ | ४ | ३६६.१८ |
| | एकुण -अ | | १०२ | १०४०.७४ | ८९ | १३ | ७९८.४३ |
| ब | सन २०१६-१७ | सिंमेट नाला बांध | ११ | २१५.३१ | ११ | ० | १८१.४ |
| | | कोपब/सित /पात वि दुरुस्ती | ४० | ४७५.८३ | ३७ | ३ | ३६२.६३ |
| | एकुण -ब | | ५१ | ६९१.१४ | ४८ | ३ | ५४४.० |
| क | सन २०१७-१८ | गबियन बंधारा | ३४ | २३६.६४ | २७ | ७ | १६०.७८ |
| | | कोपब/सित /पात वि दुरुस्ती | १०१ | १२५४.९ | ९३ | ८ | १००३.०४ |
| | एकुण -क | | १३५ | १४९१.५४ | १२० | १५ | ११६३.८२ |
| ड | सन २०१८-१९ | नाला खोलीकरण | ४० | ७५.६७ | ३२ | ८ | ५४.५ |
| | | कोपब/सित /पात वि दुरुस्ती | ७३ | १३३२.७८ | ७३ | ० | ८३७.१८ |
| | एकुण -ड | | ११३ | १४०८.७५ | १०५ | ८ | ८९१.६८ |
| | एकुण अ+ब+क+ड | | ४०१ | ४६३१.८७ | ३६२ | ३९ | ३३९७.९६ |

२. ग्रामीण पाणी पुरवठा विभाग जिल्हा परिषद यवतमाळ अंतर्गत १५७५ नळ योजनेद्वारे व सार्वजनिक हातपंप इ.द्वारे जिल्ह्यातील १८२४ गावे (२२७१ वाडया वस्त्यांना ) पाणी पुरवठा करण्यात येतो. सद्यस्थितीत जलजीवन मिशन अंतर्गत ७६ (७५ जिल्हा परिषद व १ मजिप्रा मार्फत) नळ योजनांची कामे हाती घेण्यात आली होती. पैकी २७ कामे पुर्ण झाली असून उर्वरित कामे डिसेंबर २०२१ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

**मंत्रालयीन विभागाचे अभिप्राय :**

**मृदा व जलसंधारण विभाग यांचे अभिप्राय :-** जिल्हा परिषदेने दिलेल्या अभिप्रायाशी सहमत आहे

**विभागीय सचिवांची साक्ष :**

पंचायती राज समितीने यवतमाळ जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १६ नोव्हेंबर, २०२१ रोजी विभागीय सचिवांची साक्ष आयोजित करण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, जलयुक्त शिवार व शेततळयांच्या कामावर शासनाने निधी खर्च केला आहे परंतु या कामातून अपेक्षित सिंचन होते का व याबाबत आढावा घेतला आहे काय तसेच यवतमाळ जिल्ह्यात किती हेक्टर सिंचन होत आहे. यावर विभागीय सहसचिव (जलसंधारण) यांनी समितीस विदित केले की, यवतमाळ जिल्ह्याच्या अनुषंगाने जलयुक्त शिवार योजनेची माहिती समितीला सादर केलेली आहे. मागील चार वर्षात ४०१ मंजूर कामापैकी ३६२ कामे पूर्ण झाली आहेत. ३९ कामे रद्द केली आहेत. ७६९४ हेक्टर साठवण क्षमता झाली आहे. ३९१७७ टीसीएम पाणीसाठा झाला आहे. समितीने अशी विचारणा केली की, याचा शेतकऱ्यांना फायदा होतो का, यावर विभागीय सहसचिव यांनी होकारात्मक उत्तर दिले, समितीने अशीही विचारणा केली की, यवतमाळ जिल्ह्यातील पाणी पातळी वाढल्याबाबत काही माहिती घेतली आहे काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, योजना राबविल्यानंतर ३९१८८ टीसीएम एवढा पाणी साठा वाढलेला आहे. जीएसडीएकडे हे पाठविले जाते, ते व्हेराय असते, पाणीसाठा वाढला आहे की नाही हे पाहिले जाते. म्हणजे सिंचनाला उपयुक्त पाणीसाठा वाढलेला आहे. पाणीसाठा वाढल्याने ७६९४ हेक्टर शेतीक्षेत्र सिंचनाखाली आलेले आहे, म्हणजे फायदा झालेला आहे. यावर समितीने विचारणा केली की, यंदा राज्यात अतिवृष्टी झाली. साखळी बंधारे, सिमेंट बंधारे, माती बांध इ. कामे झाली. नदीचे खोलीकरण केले. अनेक ठिकाणी गाळ साठलेला आहे. यामुळे पाणी साठवण क्षमता कमी झालेली आहे. जुने बंधारे,सिंचन तलाव यांवर झाडे आलेली असून त्यांची मुळे खोलवर गेली आहेत. यामुळे तलाव फुटतात, शेतकऱ्यांचे नुकसान होते. या तलावांची दुरुस्ती करावी लागणार आहे. अन्यथा मोठे नुकसान होऊ शकते. भविष्यात असे होऊ नये या करिता शासनाला काही शिफारस केली जाणार आहे काय तसेच अधिकचा निधी दिला जाणार आहे काय याबाबत माहिती देण्यात यावी. यावर विभागीय सह सचिव यांनी समितीस गाळ साठल्यामुळे पाणी साठवण क्षमता कमी होईल. या संबंधी शासकीय योजना आहे काय याची माहिती क्षेत्रीय अधिकाऱ्यांकडून घेऊन समितीला सादर करण्याचे तसेच निधी उपलब्धता व शासनाची योजना या बाबतची माहिती देण्याबाबत आश्वासित केले. तसेच अप्पर मुख्य सचिव (ग्रामविकास) यांनी समितीला अशी माहिती दिली की, या संदर्भात जलसंधारण सचिवांशी बोलतो. हा मुद्दा योग्य आहे. पाझर तलाव किंवा धरणातून मोफत माती घेऊन जाण्याची योजना आहे. ती योजना वाढवता येईल किंवा नरेगामध्ये करता येईल काय याचा विचार करु असे आश्वासन दिले यावर समितीने आपले मत व्यक्त केले की, असे करता येते. डीपीडीसी किंवा नरेगा मधून करता येऊ शकते. पाऊस बराच झालेला असून सिमेंट बंधाऱ्यामध्ये बराच गाळ साठलेला आहे. ग्रामीण भागातील नाले उथळ झाले आहेत. यामुळे थोडासा पाऊस आला तरी शेतात पाणी येते. खड्डे करून पाणी साठवण्यासाठी काही तरी उपाययोजना करता येईल. अप्पर मुख्य सचिव (ग्रामविकास) यांनी समितीला विदित केले की, या संदर्भात ग्रामविकास विभागामार्फत शिफारस करु व जलसंधारण सचिव यांना या बाबत योजना तयार करण्या बाबत सूचना करू असे आश्वासित केले.

समितीने अशी विचारणा केली की, जलजीवन मिशन अंतर्गत एकूण ७६ योजना आहेत या पैकी २७ योजनांची कामे पूर्ण केली असून ३९ योजना अपूर्ण आहेत. ही कामे कधी पूर्ण होतील यावर सह सचिव (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांनी समितीस विदित केले की, दिनांक ४ सप्टेंबर रोजी जलजीवन मिशन संबंधी शासन निर्णय (जी. आर.) काढण्यात आला होता. त्यामध्ये असे नमूद केले आहे की, हे मिशन सन २०२४ पर्यंत पूर्ण करायचे आहे. त्यानुसार प्रत्येक जिल्ह्याचा आराखडा तयार केला आहे. केंद्र शासनाने रिट्रोफिटींगच्या योजना दिनांक ३१ मार्च २०२२ पर्यंत पूर्ण करण्यास सांगितले आहे. माननीय मंत्री व प्रधान सचिवांच्या स्तरावर आढावा घेतला जातो. त्यावेळी सूचना दिलेल्या आहेत. पूर्वी ४० एलपीसीडीने पाणीपुरवठा योजना होती. मात्र ही केंद्र शासनाची योजना असल्यामुळे निकष वेगळे असून ५० लिटरचा निकष आहे. ४० लिटरचे ५५ लिटर मध्ये रुपांतर करण्यासाठी सर्व जिल्ह्यांना दिनांक ३१ मार्च २०२२ पर्यंत मुदत दिली आहे. उर्वरित कामे २०२४ पर्यंत पूर्ण करण्यास सांगितले आहे. निधी पीएफएमएस मार्फत दिला जातो. सिंगल अकाऊंट असल्यामुळे ज्या जिल्ह्यांनी जास्त काम केले त्यांना तो निधी लगेच मिळू शकतो.

**अभिप्राय व शिफारशी :**

पंचायती राज समितीने दिनांक १६ ते १८ फेब्रुवारी, २०२१ या कालावधीत यवतमाळ जिल्हा परिषदेस भेट दिली. समितीने तीन तालुक्यांना भेट देऊन पाहणी केली असता समितीच्या निदर्शनास आले की, सन २०१७-२०१८ या वर्षामध्ये जलयुक्त शिवार अभियानअंतर्गत या तालुक्यांमध्ये कोणतीही कामे झालेली नाहीत. सन २०११-२०१२ व २०१७-२०१८ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील चर्चेच्या दरम्यान या जिल्ह्यात राबविण्यात आलेल्या जलयुक्त शिवार अभियांन व मागेल त्याला शेततळे या योजनेसंदर्भात देण्यात आलेल्या तपशीलवार लेखी स्पष्टीकरणामध्ये जलयुक्त शिवाराची व शेततळयांची कामे याबाबत कोणतीही माहिती नमुद केलेली नव्हती. तसेच समितीच्या निदर्शनास आले की, यवतमाळ जिल्ह्यात ४८०० विहिरींचा लक्षांक होता त्यापैकी ४६५८ विहिरींना प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून ४०१६ विहिरींची कामे पूर्ण झालेली आहेत. त्याचप्रमाणे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत पाणी पुरवठा योजनांची एकूण ४०७ कामे पूर्ण झालेली असून पाणीपुरवठा सुरू करण्यात आलेला आहे. परंतु ८ प्रादेशिक योजनांपैकी ४ कामे पुर्ण करण्यात आलेली आहेत ३ प्रादेशिक योजना अपूर्ण असुन १ योजना बंद आहे. बंद स्थितीमध्ये असलेल्या हर्षीबंद या योजनेसाठी साडे पाच कोटी रूपये, सावरखेडा योजनेसाठी दीड कोटी व करजगाव योजनेसाठी सात कोटी इतका निधी खर्च करण्यात आलेला आहे. या जिल्ह्यामध्ये १६२ गावे आहेत की ज्या गावांना अद्याप पाणीपुरवठा योजना नाहीत. समितीस प्राप्त झालेल्या सदरहू माहितीच्या अनुषंगाने या जिल्ह्यात जलयुक्त शिवार अभियांनाअंतर्गत व पाणी पुरवठा योजना संदर्भात झालेल्या कामांबाबतची सविस्तर माहिती सादर करण्याबाबात समितीने निदेश दिले.

त्यानुसार जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेली माहिती व या विषयासंदर्भात घेण्यात आलेल्या विभागीय सचिवांच्या साक्षीत समितीस माहिती प्राप्त झाली की, यवतमाळ जिल्ह्यांत चार वर्षात जलयुक्त योजनेंतर्गत ४०१ कामे मंजुर करण्यात आली होती त्यापैकी ३६२ कामे पुर्ण झाली आहेत तर ३९ कामे रद्द करण्यात आली आहेत. त्यामुळे ३९१८८ टीसीएम पाणी साठा वाढलेला असून ७६९४ हेक्टर शेतीक्षेत्र सिंचनाखाली आलेले आहे. तसेच ग्रामीण पाणीपुरवठा विभाग जिल्हा परिषद यवतमाळ अंतर्गत १५७५ नळ योजनेद्वारे व सार्वजनिक हातपंप इत्यादी द्वारे १८२४ गावांना पाणीपुरवठा करण्यात येतो सद्यःस्थिती जलजीवन मिशन अंतर्गत ७६ नळ योजनांची कामे सुरू करण्यात आली असून २७ कामे पूर्ण झालेली आहे.

**राज्यात काही जिल्ह्यांमध्ये पावसाचे कमी प्रमाण व अनिश्चितता असल्याने कोरडवाहू क्षेत्रातील पूर्णतः पावसावर अवलंबून असलेल्या पीकांवर व त्यांच्या उत्पादनावर होणारा परिणाम तसेच पावसात पडत असलेला खंड व पाण्याची टंचाई यामुळे पीकांचे होणारे नुकसान यासाठी जलसिंचनाची उपलब्धतता वाढविणे व त्याअनुषंगाने संरक्षित व शाश्वत सिंचन सुविधा शेतकऱ्यांना देण्यासाठी 'मागेल त्याला शेततळे' योजना शासनाकडून राबविण्यात येते. तसेच पाणलोट विकासाची कामे, साखळी सिमेंट नालाबांधाची खोलीकरण/रूंदीकरण, कोल्हापूर पद्धतीच्या/साठवण बंधाऱ्यांची, पाझर तलाव व लघुसिंचन तलावांची दुरूस्ती यासह ओढे/नाले जोडप्रकल्प राबवून भूगर्भातील पाणी पातळीची वाढ करणे यामुळे सिंचन क्षेत्रात वाढ होऊन शेतीसाठी संरक्षित पाणी व पाण्याच्या वापराच्या कार्यक्षमतेस वाढ करून सर्वांना पुरेसे पाणी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने जलयुक्त शिवार अभियान राबविण्यात आली. ग्रामीण भागातील शेतीसाठी व पिण्यासाठी पुरेशा प्रमाणात पाणी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने या दोन्ही योजना अत्यंत महत्त्वाच्या आहेत. त्यामुळे पंचायती राज समिती कोणत्याही जिल्ह्यास भेट व बैठक आयोजित करते त्यावेळेस या योजनांवर शासनाकडून पुरविण्यात आलेला निधी योग्य प्रकारे खर्च करून त्या योजनेंतर्गत सुविधा मिळाल्या आहेत काय, याबाबतची तपासणी प्राथम्याने करते. परंतु यवतमाळ जिल्ह्यास समितीने भेट दिली असता या दोन्ही योजनांबाबतची माहिती समितीस उपलब्ध करून देण्यात आली नाही. त्यामुळे समितीला कोणत्याही सत्यतेतीची पडताळणी करता आली नाही. तसेच प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेंतर्गत कोट्यवधी रूपये खर्च करण्यात आलेले असतानाही या योजना अपूर्ण व बंद अवस्थेत आहेत. सदरहू बाब अत्यंत गंभीर असल्याने समिती यावर तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे. माहिती का उपलब्ध करून देण्यात आली नाही व योजना अपूर्ण व बंद अवस्थेत का आहेत. त्याना निधीची कमतरता आहे किंवा कसे तसेच अन्य कोणत्या कारणांमुळे सदरच्या योजना अपूर्ण अवस्थेत आहेत याचा सविस्तर आढावा घेण्यात यावा. तसेच याबाबतची सविस्तर तपासणी करून यामध्ये अधिकारी/कर्मचारी यांच्याकडून योजना राबविण्यात बेजबाबदारपणा व निष्काळजीपणा झाला किंवा कसे याबाबत चौकशी करून संबंधितांवर कारवाई करण्यात यावी, यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्याच्या आत सादर करावी अशी समिती शिफारस करीत आहे.**

पंचायती राज समिती जिल्हानिहाय दौरा करत असताना समितीच्या निदर्शनास आले की, धरण, जुने बंधारे व सिंचन तलाव यांच्या भिंतींवर झाड झुडपे उगवले असून त्यांची मुळे खोलवर गेली असल्याने बांधकामाला धोका निर्माण झालेला आहे व अनेक ठिकाणी गळती होऊन लाखो लिटर पाणी वाया जात असून शेतकऱ्यांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान होते. यासाठी सदरची झाडे झुडपी काढून बांधकामांची दुरूस्ती करण्याची कार्यवाही करणे आवश्यक आहे. तसेच लघुपाटबंधारे, पाझर तलाव, गाव तलाव व साठवण तलाव यामध्ये गाळ साठलेला असल्याने त्यांच्या साठवण क्षमतेत मोठ्या प्रमाणात घट होत आहे. या जलसाठ्यांची पुनर्स्थापना करून जलस्त्रोतांच्या उपलब्धतेत शाश्वत स्वरूपाची वाढ होण्यासाठी व शेतकऱ्यांना पुरेशा प्रमाणात पाणी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने गाळ काढून शेतामध्ये वापरण्यासाठी शासनाकडून 'गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजना' राबविण्यात येत आहे. सदरहू योजना व रोजगार हमी योजना या अंतर्गत गाळमुक्त जलसाठे करता येईल काय, याबाबतची तपासणी शासनास्तरावर करून योग्य ती कार्यवाही करावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यांच्या आत सादर करावी अशी समिती शिफारस करीत आहे.

केंद्र शासन पुरस्कृत असलेल्या जलजीवन मिशन अंतर्गत ग्रामीण भागातील प्रत्येक व्यक्तीस शुद्ध व पुरेसा शाश्वत पाणी पुरवठा सर्वकाळ व सर्व परिस्थितीत सोयीच्या ठिकाणी उपलब्ध करून देणे हे उद्दिष्ट आहे. यासाठी कार्यक्षम पाणी पुरवठ्याची एक शाश्वत सेवा उपलब्ध करणे हे महत्त्वाचे आहे. त्यासाठी सदर योजनेंतर्गत गाव कृती आराखडा व जिल्हा कृती आराखडा तयार करून करजगाव व धुळापुर, हर्षीबंद आणि सावरखेडा या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांची अपूर्ण व बंद अवस्थेत असलेली कामे तातडीने पूर्ण करण्यात यावी. तसेच जिल्ह्यातील अद्याप पाणी पुरवठा योजना नसलेल्या १६२ गावातील प्रत्येक व्यक्तीला पाणी उपलब्ध व्हावे यासाठी प्राधान्याने या ठिकाणी या योजनेंतर्गत कार्यवाही करण्यात यावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती तीन महिन्यांच्या आत समितीस सादर करावी, अशी समिती शिफारस करीत आहे.

## प्रकरण सात

## जिल्हा परिषद, यवतमाळ

### सामाजिक न्याय विभागाअंतर्गत असलेल्या वसतीगृहांना अधिकाऱ्यांनी दिलेल्या भेटींबाबत.

पंचायती राज समितीने दिनांक १६ ते १८ फेब्रुवारी,२०२१ या कालावधीत यवतमाळ जिल्हा परिषदेस भेट दिली. भेटीच्या वेळी २०११-१२ व २०१७-१८ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान यवतमाळ जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने यवतमाळ जिल्ह्यामध्ये एकूण किती मागासवर्गीय वसतीगृहे आहेत, या वसतीगृहातील विद्यार्थी संख्या किती आहे, सदर वसतीगृहांसाठी किती निधीची तरतूद करण्यात येते, उक्त तरतूदीमधून संबंधित विद्यार्थ्यांना कोणकोणत्या सुविधा पुरविल्या जात आहेत, याबाबतची सर्व माहिती समितीला सादर करण्याबाबत निदेश दिले याबाबतची सर्व माहिती समितीला सादर करतो असे आश्वासन जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी आश्वासित केले परंतू अद्यापही माहिती समितीला सादर करण्यात आली नाही. समितीने विचारणा केली की, आपण जिल्ह्यातील किती वसतिगृहांना भेटी दिलेल्या आहेत, सदर वसतिगृहांची सद्यःस्थिती कशी आहे समितीने काही वसतिगृहांना भेटी दिल्या आहे. तेव्हा समितीला वसतिगृहांची स्थिती जनावरांच्या गोठ्यापेक्षाही खराब अवस्थेत असलेली दिसून आली आहे. आपण स्वतः दर महिन्याला किती वसतिगृहांना भेटी देत आहात, यामध्ये कोणी अनियमितता करीत असेल तर आपण त्यांच्यावर योग्य ती कारवाई करणे आवश्यक आहे. तसेच वसतिगृहांच्या भेटीच्या नोंदवहीमध्ये समाज कल्याण विभागाच्या अधिकाऱ्यांनी पंचायत समित्यांना किंवा वसतिगृहांना अत्यंत कमी भेटी दिल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे तसेच असे मत स्पष्ट केले की, समाजकल्याण अधिकाऱ्यांनी पंचायत समित्यांना, विकास कामांना वेळोवेळी भेटी देणे आवश्यक आहे. कामामध्ये दिरंगाई होत असेल तर संबंधितांना तशा सूचना दिल्या पाहिजे. काही विकास कामामध्ये अनियमितता होत असेल तर संबंधितांवर तात्काळ कारवाई करणे हे आपले काम आहे व जिल्ह्यातील सर्व वसतिगृहे व्यवस्थित आहेत काय अशीही विचारणा समितीने केली यावर जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी समितीस माहिती दिली की, त्यांनी सर्व वसतिगृहांना भेटी दिलेल्या आहेत. कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे जिल्ह्यातील सर्व वसतिगृहे बंद ठेवण्यात आली आहेत यावर समितीने अशी विचारणा केली की, आपण एकीकडे सर्व वसतिगृहांना भेटी दिल्याचे सांगत आहात आणि एकीकडे वसतिगृहे बंद आहेत, अशी माहिती देत आहात. यावर अधिकारी यांनी समितीस विदित केले की, सदर वसतिगृहांना मागील वर्षी भेटी दिलेल्या आहेत. यावर्षी कोरोनामुळे मी कोणत्याही वसतिगृहांना भेटी दिलेल्या नाहीत. यावर समितीने यवतमाळ जिल्ह्यातील अनेक वसतिगृहांच्या तक्रारी या समितीकडे प्राप्त झाल्या आहेत. अनेक वसतिगृहामध्ये राहण्याची, झोपण्याची, शौचालयाची व जेवणाचीही व्यवस्था चांगली नाही. त्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी यामध्ये विशेष लक्ष घालून यामध्ये तात्काळ सुधारणा करावी, अशी समितीने सूचना केली. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सहमती दर्शविली पुढे समितीने अशीही विचारणा केली की, जिल्हा परिषदांनी त्यांच्या उत्पन्नातून २० टक्के रक्कम मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी खर्च करावयाच्या योजनेतून एखादी नवीन योजना हाती घेतली आहे काय, असल्यास, सदर योजनेचा तपशील देण्यात यावा. यावर विभागाने आर्थिक वर्षात नवीन योजना हाती घेण्यात आली नाही, असे उत्तर देण्यात आले आहे. यावर जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी समितीस माहिती दिली की, पूर्वीच्या योजनांची अंमलबजावणी करण्यात आली आहे. त्यामुळे नवीन योजना हाती घेण्यात आली नाही. समितीने असे मत व्यक्त केले की, असे असेल तर समाज कल्याण विभागाने डीबीटी योजनेची अंमलबजावणी केलेली नाही. त्यामुळे हा विषय विभागीय सचिवांच्या साक्षीसाठी घेण्यात यावा यावर जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी कोणकोणत्या योजनांची अंमलबजावणी करण्यात आली, त्या ४४ योजनांच्या नावांची यादी समितीला सादर केली आहे. समितीने विचारणा केली की, या योजनांना का सूट दिलेली आहे यावर जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी समितीस विदित केले की, यादीतील ४४ योजनांची अंमलबजावणी करणे अनिवार्य आहे. त्यामुळे याच योजनांची अंमलबजावणी केलेली आहे. यावर समितीने या विषयावर साक्षीमध्ये चर्चा करण्यात येईल. असे निदेश दिले. तसेच समितीने अशीही विचारणा केली की, आपल्या विभागाने स्वंयपाकाचे भांडे देण्याची योजना राबविली आहे. ती योजना या ४४ योजनेमधील आहे काय, यावर जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी उत्तर दिले की, सदर योजना उक्त ४४ योजनेमधील नाही. सदर योजना ही सामुहिक लाभाची योजना होती यावर समितीने विचारणा केली की, जर या ४४ योजनांमध्ये ती योजना नाही तर त्या योजनेची अंमलबजावणी कशी केली यावर जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी माहिती दिली की, अशा प्रकारच्या योजना राबविण्याचा जिल्हा परिषदेला अधिकार आहे. जिल्हा परिषदेच्या सेस फंडातून अशा प्रकारच्या योजना राबविल्या जातात.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत माहिती मागविली.**

सामाजिक न्याय विभागांतर्गत एकूण वसतीगृहे किती, त्यामध्ये असणाऱ्या विदयार्थ्यांची संख्या किती आणि सदर वसतीगृहांना जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांनी कितीवेळा भेटी दिल्या व भेटी न दिल्यास त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ? व त्याअनुषंगाने कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे ?

**उपरोक्त मुद्यासंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

यवतमाळ जिल्ह्यामध्ये एकूण १७१ अनुदानीत मागासवर्गीय वसतीगृहे आहेत. सन २०१७-१८ मध्ये वसतीगृहामध्ये ८२६४ विद्यार्थी प्रवेशित होती. सन २०१७-२०१८ मध्ये १७१ वसतीगृहास प्रति वसतीगृहास ३ या प्रमाणे ५१० भेटी जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी दिल्या आहेत. सन २०२०-२०२१ मध्ये मा.पंचायती राज समिती यवतमाळ जिल्ह्याच्या दौऱ्याचे वेळी कोरोना विषाणुच्या प्रादुर्भावामुळे व राज्य शासनाच्या नियमावलीनुसार वसतीगृह बंद होती. तसेच सन २०२०-२०२१ मध्ये वसतीगृहे बंद असल्याने या कार्यालयामार्फत भेटी देण्यात आलेल्या नाहीत. राज्यशासनाच्या निर्देशानुसार दिनांक ०४ ऑक्टोबर २०२१ पासुन वसतीगृह सुरू करणेबाबत आदेशीत केल्यानुसार वसतीगृहामध्ये विद्यार्थी प्रवेशित बाबत कार्यवाही सुरू असून संबधीत सर्व वसतीगृहास सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षामध्ये नियमानुसार भेटी देण्याची कार्यवाही सुरू करण्यात आलेली आहे.

**मंत्रालयीन विभागाचे अभिप्राय**

**सामाजिक न्याय विभाग यांचे अभिप्राय :-** शासन सहमत

**विभागीय सचिवांची साक्ष :**

पंचायती राज समितीने यवतमाळ जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १६ नोव्हेंबर २०२१ रोजी विभागीय सचिवांची साक्ष आयोजित करण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, सदर विभागांतर्गत एकूण किती वसतिगृहे आहेत व विद्यार्थी संख्या किती आहे, जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांनी किती वेळा भेटी दिल्या आहेत, विद्यार्थ्यांना कोणता पोषण आहार दिला जातो यावर समाजकल्याण अधिकारी यांनी समितीस विदित केले की, यवतमाळ जिल्ह्यामध्ये १७१ अनुदानित मागासवर्गीय वसतिगृहे आहेत. सन २०१७-१८ मध्ये प्रवेशित संख्या ८ हजार २६४ होती. जिल्हा परिषदेमार्फत चालवली जात असल्यामुळे जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांनी प्रत्येकी ३ प्रमाणे ५१० भेटी दिल्या आहेत. समितीने दौरा केला तेव्हा कोरोनाचा प्रादुर्भाव असल्यामुळे वसतिगृहे बंद होती. आताच दि. ४ ऑक्टोबर २०२१ रोजी शाळा सुरू करण्याच्या सूचना (ऑर्डर्स) आल्यामुळे आता ती वसतिगृहे सुरू करण्यात येतील व त्या अनुषंगाने भेटी देण्यात येतील. यावर समितीने ५१० भेटींचा अहवाल समितीला पाठवण्याबाबत निर्देश दिले यावर सामाजिक न्याय विभागाच्या अधिकारी यांनी सहमती दर्शविली. पुढे समितीने अशी विचारणा केली की, समितीने काही वसतिगृहांना भेटी दिल्या त्यावेळी असे आढळून आले की, मुलांना साहित्य दिले जात नाही, आवश्यक सुविधा पुरवल्या जात नाहीत. आपले अधिकारी काय करतात,यावर सामाजिक न्याय विभागाच्या अधिकाऱ्यांनी समितीस विदित केले की, अनुदानित वसतीगृहांमध्ये विद्यार्थ्याला रु. १५०० प्रति माह देतो. तसेच कर्मचाऱ्यांना मानधन देतो. सार्वजनिक बांधकाम विभागाचे जे भाडे निश्चित होते त्याच्या ७५ टक्के रक्कम दिली जाते. स्वयंसेवी संस्थांमार्फत काही वसतिगृह चालवले जातात. यामुळे इतर काही गोष्टी त्यांनी दिल्या पाहिजेत. भेटीच्या वेळी नॉर्म्सप्रमाणे वसतिगृहे चालवली जातात की नाही हे बघण्याची कार्यवाही करणे अपेक्षित आहे. यावर समितीने मत व्यक्त केले की, अनियमितता आढळली तर कारवाई झाली पाहिजे. काही ठिकाणी केवळ अनुदान मिळवण्यासाठी वसतिगृह चालवले जात आहे.

**अभिप्राय व शिफारशी :**

पंचायती राज समितीने दिनांक १६ ते १८ फेब्रुवारी, २०२१ या कालावधीत यवतमाळ जिल्हा परिषदेस भेट दिली. त्यावेळेस समितीने जिल्ह्यातील काही वसतीगृहांना भेटी दिल्या असता समितीच्या निदर्शनास आले की, या वसतीगृहांची दूरावस्था झालेली असून येथे कोणत्याही प्रकारच्या सोयीसुविधा विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिल्या जात नाहीत. वसतिगृहांच्या भेटीच्या नोंदवहीतील नोंदीनुसार जिल्हा समाजकल्याण अधिकाऱ्यांनी अत्यंत कमी प्रमाणात या वसतीगृहांना भेटी दिल्या आहेत. या वसतीगृहांच्या संदर्भात अनेक तक्रारी समितीकडे प्राप्त झालेल्या आहेत.

जिल्हा समाज कल्याण अधिकारी मुख्यालयाच्या अजूबाजूच्या वसतीगृहांना भेटी देतात परंतु आतील व दुर्गम भागातील वसतीगृहांना अत्यंत कमी प्रमाणात भेटी देतात. अधिकारी नियमित भेटी देत नसल्यामुळे वसतीगृहातील विद्यार्थ्यांना आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात आल्यात किंवा नाहीत, याबाबतची माहिती त्यांना मिळत नसल्याने यासंदर्भात आवश्यक ती

कार्यवाही त्यांच्याकडून करण्यात येत नाही. या वसतगृहातील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा व बौद्धीक क्षमता वाढविण्यासाठी त्यांना शासनाने पुरविलेल्या सोयीसुविधा मिळणे अत्यंत आवश्यक आहे. यासाठी यवतमाळ जिल्ह्यात एकूण किती वसतीगृहे असुन यामध्ये किती विद्यार्थी प्रवेशित आहेत. तसेच या वसतिगृहांना सन २०१७-२०१८ या वर्षामध्ये जिल्हा समाजकल्याण अधिकाऱ्यांनी किती भेटी दिल्या व त्यानुसार कोणती आवश्यक ती कार्यवाही करण्यात आली याबाबतची सविस्तर माहिती समितीस सादर करण्याबाबत समितीने निदेश दिले.

त्यानुसार जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेली माहिती व या विषयासंदर्भात घेण्यात आलेल्या विभागीय सचिवांच्या साक्षीत समितीस माहिती प्राप्त झाली की, यवतमाळ जिल्ह्यामध्ये एकूण १७१ अनुदानीत वसतीगृहे असून यामध्ये एकूण ८२६४ विद्यार्थी प्रवेशित आहेत. सन २०१७-२०१८ मध्ये १७१ वसतीगृहास प्रति वसतीगृहास ३ या प्रमाणे ५१० भेटी जिल्हा समाज कल्याण अधिकाऱ्यांनी दिल्या आहेत.

राज्यातील वसतिगृहातील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा सुधारण्याच्या उदात्त उद्दिष्टांच्या पूर्ततेकरिता त्यांना वसतिगृहांच्या सोयी व शैक्षणिक सवलती मिळण्यासाठी शासन कोट्यवधी रूपयांचा निधी खर्च करीत असते. त्यानुसार वसतीगृहातील विद्यार्थ्यांना उत्कृष्ट पद्धतीचा आहार दिला जात नाही. वसतीगृहातील विद्यार्थ्यांच्या संख्येनुसार पुरेशा प्रमाणात शौचालय व स्नानगृहांची सोय उपलब्ध करून देण्यात येत नाही. काही वसतीगृहीतील विद्यार्थ्यांना अमानवी स्वरूपाची वागणूक देखील देण्यात येते. राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या वसतिगृहांचे संचालन करणाऱ्या स्वयंसेवी संस्था व जिल्हा परिषदांच्या समाजकल्याण विभागाच्या अधिकाऱ्यांनी अनुसरावयाची कार्यपद्धती व नियम वेळोवेळी शासनाने विहित केलेले असतानाही त्याची योग्य प्रकारे अंमलबजावणी होत नसल्याने या योजनांची फलनिष्पती होत नाही.

**जिल्हा समाज कल्याण अधिकाऱ्यांनी वसतीगृहांना भेट देऊन यासंदर्भातील नोंदवहीत नोंद घेऊन त्यांची कागदोपत्री जबाबदारी फक्त पूर्ण करणे समितीला अभिप्रेत नसून, प्रत्येक वसतीगृहाला भेट देऊन प्रामाणिकपणे तेथील तपासणी करून निदर्शनास आलेल्या त्रुटी दूर करून आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने कार्यवाही करणे आवश्यक असल्याचे समितीचे मत आहे. यासाठी जिल्ह्यातील प्रत्येक वसतीगृहात मागासवर्गीयांच्या टक्केवारीनुसार आरक्षित केलेल्या जागांवर सदर विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला आहे काय, प्रवेशित सर्व विद्यार्थ्यांना गादी, उशी, बेडशिट, चादर, ब्लँकेट, ताट, वाटी, ग्लास, बुट व लाकडी कपाट इत्यादी साहित्य पुरविण्यात आले आहेत काय, विद्यार्थ्यांच्या संख्येनुसार वसतीगृहाच्या इमारतीत शौचालय व स्नानगृहांची सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे काय, वसतीगृहात किमान १ महिना पुरेल एवढा धान्य साठा उपलब्ध आहे काय, विद्यार्थ्यांना नाश्ता व भोजनात आवश्यक त्या किमान घटकांचा समावेश असतो काय, विद्यार्थ्यांची उपस्थिती वार्षिक सरासरी ७५ टक्केपेक्षा अधिक आहे काय, मंजूर संख्येपेक्षा विना परवानगीने जादा विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला आहे काय व वसतिगृहात आवश्यक ती सर्व अभिलेखे अद्यावत ठेवण्यात आलेली आहेत काय इत्यादी सर्व बाबींची तपासणी जिल्हा समाज कल्याण अधिकाऱ्यांनी करणे आवश्यक आहे.**

**प्राप्त झालेल्या माहितीनुसार यवतमाळ जिल्ह्यामध्ये एकूण १७१ अनुदानीत वसतीगृहे असून सन २०१७-२०१८ या वर्षात ३ या प्रमाणे ५१० भेटी जिल्हा समाज कल्याण अधिकाऱ्यांनी दिल्या आहेत. या भेटींच्या वेळी या अधिकाऱ्यांना उपरोक्त नमूद केलेल्या सोयीसुविधा वसतिगृहात आढळून आल्या होत्या काय, कोणत्या वसतिगृहांमध्ये शासनाच्या अटी व शर्तीचे उल्लंघन केले आहे, कोणत्या वसतिगृहांमध्ये पायाभूत सोयीसुविधांचा अभाव असून त्रुटी निदर्शनास आलेल्या आहेत. त्यानुसार कोणकोणत्या वसतिगृहांवर कोणत्या प्रकारची कारवाई करण्यात आलेली आहे, त्यानुषंगाने किती दंडात्मक रक्कम वसुल करण्यात आलेली आहे. इत्यादीबाबतचा सविस्तर अहवाल समितीस तीन महिन्याच्या आत सादर करण्यात यावा, अशी समिती शिफारस करीत आहे.**

## प्रकरण आठ

## जिल्हा परिषद , यवतमाळ

## आपले सरकार सेवा केंद्रामधील संगणक परिचालक व इतर साहित्य वापरामधील गैरप्रकाराबाबत

पंचायती राज समितीने दिनांक १६ ते १८ फेब्रुवारी,२०२१ या कालावधीत यवतमाळ जिल्हा परिषदेस भेट दिली. भेटीच्या वेळी २०११-१२ व २०१७-१८ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान यवतमाळ जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने विचारणा केली की, पंचायत समितीने एका आपले सरकार सेवा केंद्राला भेट दिली. चौदाव्या वित्त आयोगातून सीएससी कंपनीला मोठ्या प्रमाणात पैसे दिले जातात. सदर सेवा केंद्रातून लोकांना सरकारी दरानुसार रहिवासी दाखले व इतर दाखले दिले जातात. परंतु त्या एका दाखल्याकरिता ग्रामपंचायतीला जवळपास एक हजार रुपयांचा खर्च होत आहे. सदर कंपनीकडून स्टेशनरी, कार्टेज, संगणक ऑपरेटर्सला प्रशिक्षण देणे, याकरिता पैसे घेतले जातात. अशाप्रकारे मोठ्या प्रमाणात खर्च करून सुद्धा त्यात मोठी अनागोंदी सुरू आहे तसेच कळंब तालुक्यातील पार्डी-नकटी येथील आपले सरकार सेवा केंद्राला भेट दिली तेव्हा तेथील एक संगणक ऑपरेटर हा तिन्ही गावांमध्ये काम करीत असल्याचे आढळून आले. तसेच एक वर्षाच्या काळात तेथून फक्त २० दाखले ऑनलाईन पद्धतीने दिले असल्याचे आढळून आले. या संदर्भात संबंधित सचिवांची साक्ष घेण्यात येईल. तसेच अशा प्रकारे चुकीचे कामकाज होत असल्यास त्या बाबतीत संबंधितांवर कारवाई करण्याची गरज आहे. या संदर्भात समिती स्तरावर आपण निर्णय घेऊ. असे समितीने निदेश दिले यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सहमती दर्शविली.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत माहिती मागविली.**

आपले सरकार सेवा केंद्रामध्ये संगणक ऑपरेटर व इतर साहित्य वापराबाबतच्या अनागोंदी कारभाराबाबत चौकशी करण्यात आली आहे काय ? त्यात काय निष्पन्न झाले त्यानुसार कोणती कारवाई केला वा करण्यात येत आहे ?

**उपरोक्त मुद्यासंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

यवतमाळ जिल्हा परिषद अंतर्गत जिल्ह्यामध्ये शासन निर्णय ११ ऑगस्ट २०१६ नुसार एकूण ८१४ आपले सरकार केंद्र मंजूर आहेत. (परिशिष्ट क्रमांक ८.१) यामध्ये एकूण ७७८ केंद्रचालक यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. तसेच ३६ जागा रिक्त आहेत ग्रामविकास विभागाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार संबधीत केंद्रचालक PES , Applications ERP, EGramsoft तसेच ग्रामविकास विभागाने सुचविलेले कामकाज केले जाते व सेवा दिल्या जातात.

याकरीता शासन निर्णयानुसार प्रतिमाह प्रति केंद्रा प्रमाणे केंद्र चालक मानधन ६०००/- Consumables २७००/- राज्य, जिल्हा तालुका स्तरावरील प्रशिक्षण सहाय १३००/- कंपनी व्यवस्थापन चार्जेस ४५०/- प्रमाणे एकुण १०४५०/- + GST इतका मोबदला अदा केला जातो.

एप्रिल २०२० ते ऑगस्ट २०२१ या कालावधीमध्ये तक्रारीच्या अनुषंगाने १ तालुका व्यवस्थापक व ५३ केंद्रचालक यांना सेवेतुन कमी करण्यात आलेले आहे. या कालावधीकरीता ३४३ हार्डवेअर बाबत ऑनलाईन तक्रारी प्राप्त झालेल्या असून त्यापैकी २६५ तक्रारींचे निराकरण करण्यात आलेले आहे व ग्रामपंचायतीमध्ये ६० नवीन संगणक संच पुरविण्यात आलेले आहेत.

Consumables व इतर बाबीकरीता दर महिन्याला शासन निर्णय दिनांक ६ सप्टेंबर अन्वये २०१७ अन्वये ग्रामसेवक यांचे ERP लॉगीन मधून सदर दंड आकारल्या जातो. याप्रमाणे कंपनी व केंद्रचालक यांना एप्रिल २०२० पासून एकूण रक्कम ४६०८९३३/- इतकी रक्कम कपात करण्यात आलेली आहे.

### मंत्रालयीन विभागाचे अभिप्राय

**ग्रामविकास विभाग यांचे अभिप्राय :-** यवतमाळ जिल्हा परिषदेने केलेल्या कार्यवाही बाबत शासन सहमत आहे. दरम्यान शासनाने शासन निर्णय क्रमांक संग्राम-यवतमाळ जिल्हा परिषदेने केलेल्या कार्यवाही बाबत २०१५/प्रक्र-९३/ संग्राम कक्ष , १४ जानेवारी २०२१ अन्वये (परिशिष्ट क्रमांक ८.२) केंद्रचालकाचे मानधन रुपये ६०००/- ऐवजी रू. ७०००/- इतके केले आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष :**

पंचायती राज समितीने यवतमाळ जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १६ नोव्हेंबर, २०२१ रोजी विभागीय सचिवांची साक्ष आयोजित करण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने विभागीय सचिवांच्या निदर्शनास आणले की, आपले सेवा केंद्र संदर्भात समितीने विविध जिल्ह्यातील काही सेवाकेंद्रांना भेटी दिल्या त्यावेळी सेवा केंद्रांना स्टेशनरी, संगणक साहित्य वेळेवर व कमी प्रमाणात मिळत असल्याचे व महानेटचे कनेक्शन नसल्याने खाजगी कनेक्शन घेण्यात आले होते तर काही ठिकाणी बऱ्याच कालावधीपासून संगणक नादूरूस्त असल्याने युनिट बंद

असल्याचे व करार संपल्याचे व तेथील संगणक ऑपरेटरला रूपये ७०००/- इतके मानधन मिळत असल्याचे निदर्शनास आले आहे. अशा प्रकारच्या बाबी आढळून आल्या असून त्या संदर्भात आवश्यक असल्यास वेगळी बैठक आयोजित करण्यात येईल.

**अभिप्राय व शिफारशी :**

पंचायती राज समितीने दिनांक १६ ते १८ फेब्रुवारी, २०२१ या कालावधीत यवतमाळ जिल्हा परिषदेस भेट दिली. त्यावेळेस सन २०११-२०१२ व २०१७-२०१८ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालासंदर्भात जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेली माहिती व त्यानुषंगाने झालेल्या चर्चेत समितीच्या निदर्शनास आले की, वडबोरी, बेलोटी आणि पार्डी-नकटी (ता. कळंब) येथील आपले सरकार सेवा केंद्रामध्ये एक संगणक परिचालक तिन्ही केंद्रावर काम करीत आहे, तसेच एक वर्षाच्या कालावधीत या केंद्रामधून ऑनलाईन पद्धतीने फक्त २० रहिवाशी दाखले देण्यात आले आहेत. या ठिकाणी डाटा नेटचे कनेक्शन व पुरेशी स्टेशनरी उपलब्ध नसते. राज्य शासनाकडून CSC-SPV e-Governance services India Ltd. या कंपनीला या सेवेसाठी कोट्यवधी रूपये देत असताना त्याप्रमाणात जनतेला सुविधा उपलब्ध करून देण्यात येत नाहीत. तालुका व जिल्हास्तरावर अधिकाऱ्यांचे योग्य प्रकारे नियंत्रण नसल्याने सर्वत्र गैरप्रकार होत असल्याने या प्रकरणाची सविस्तर चौकशी करून त्यानुषंगाने केलेल्या कारवाईचा अहवाल समितीस सादर करावा असे समितीने निदेश दिले.

या प्रकरणाची जिल्हा परिषदेकडून चौकशी करून केलेल्या कारवाईच्या अनुषंगाने सादर करण्यात आलेल्या माहितीवरून समितीस माहिती प्राप्त झाली की, यवतमाळ जिल्हा परिषदेअंतर्गत जिल्ह्यामध्ये एकूण ८१४ आपले सरकार सेवा केंद्र मंजूर असुन यामध्ये ७७८ केंद्रचालकांची नियुक्ती केली आहे. केंद्रचालकास रूपये ११४५०/- इतकी रक्कम मोबदला म्हणून अदा करण्यात येते. प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने १ तालुका व्यवस्थापक व ५३ केंद्रचालक यांना सेवेतून कमी करण्यात आले असून हार्डवेअर बाबतच्या तक्रारींचे निराकरण करून ग्रामपंचायतीमध्ये ६० नवीन संगणक संच पुरविण्यात आले आहेत. माहे एप्रिल, २०२० पासून सदर कंपनी व केंद्रचालक यांच्याकडून एकूण रूपये ४६,०८,९३३/- इतकी रक्कम दंड म्हणून कपात केली आहे. समितीने दिलेल्या निदेशानुसार जिल्हा परिषदेकडून चौकशी करून संबंधित दोषींना सेवेतून कमी करून पुरवठादार कंपनी व केंद्र चालकांकडून दंडात्मक रक्कम वसूल करण्यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीबाबत समिती समाधान व्यक्त करीत आहे.

राज्यात ग्रामपंचायत स्तरावर आवश्यक असलेले दाखले वितरीत करणे, शासनाच्या सर्व विभागाच्या सेवा सुलभरीत्या नागरीकांना मिळाव्यात, ग्रामपंचायत स्तरावरील नमूना १ ते ३३ मधील नोंदी संगणीकृत करणे, पंचायत स्तरावरील आज्ञावली मध्ये नोंदी करणे व विविध प्रकारच्या व्यावसायिक सेवा ग्रामीण भागातील जनतेला माफक दरात उपलब्ध करून देण्याबाबतचे काम आपले सरकार सेवा केंद्रामार्फत करणे अपेक्षित असून यासाठी ग्रामविकास विभाग, माहिती तंत्रज्ञान विभाग व CSC-SPV e-Governance services India Ltd. या कंपनीमध्ये त्रिपक्षीय करारनामा करण्यात येतो. त्यानुसार ग्रामपंचायतीमधील या केंद्राच्या संगणकीय आज्ञावलीमध्ये योजनांबाबतची माहिती भरण्यासाठी व वेळोवेळी अद्यावत करण्यासाठी आवश्यक त्या माहितीचे संकलन/दप्तर उपलब्ध करून देऊन सदरहू काम व्यवस्थितरित्या झाल्याबाबतची तपासणी करण्याची जबाबदारी संबंधित केंद्र चालक, ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी, गट विकास अधिकारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची आहे.

पंचायती राज संस्थांच्या कामकाजामध्ये ई-पंचायत प्रकल्पाअंतर्गत एकसुत्रता व पारदर्शकता आणणे, नागरिकांना विविध प्रशासकीय विभागांतर्गत आवश्यक असलेले दाखले त्यांच्या रहिवासी क्षेत्रात विहित कालावधीत मिळावेत. व्यावसायिक सेवा व सर्व प्रकारच्या बँकेच्या सेवा ग्रामीण भागातील जनतेला एकाच ठिकाणी मिळाव्यात यासाठी ग्रामपंचायतींमध्ये आपले सरकार सेवा केंद्रे सुरू करण्यात आलेली आहेत. त्रिपक्षीय करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार पुरवठादार कंपनीने त्यांची सेवा पुरवण्यात निष्काळजीपणा व अनियमितता दर्शविल्यास नियमानुसार संबंधित कंपनी व केंद्र चालक यांच्यावर वेळोवेळी कारवाई होणे गरजेचे आहे. सदरहू केंद्र शिस्तबद्ध पद्धतीने कार्यरत राहिल्यास जनतेला त्याची सुविधा योग्य प्रकारे मिळेल व शासनाने धोरणात्मकरित्या राबविलेल्या या योजनेची फलश्रुती होईल असे समितीचे मत असल्याने आपले सरकार सेवा केंद्र संदर्भात पुरवठादार कंपनी सीएससी-एसपीव्ही, केंद्र चालक, ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी, गट विकास अधिकारी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) व मुख्य कार्यकारी अधिकारी यांची जबाबदारी आहे. तथापि, ती व्यवस्थीतरीत्या संबंधितांकडून पार पडली जात नसल्याचे समितीच्या पाहणी दौऱ्यात आढळून आले आहे.

**यास्तव राज्यातील सर्व "आपले सरकार" सेतु केंद्रात यामध्ये अनेक त्रुटी, अनियमितता तसेच नियमबाह्य कामे होत असल्यामुळे शासनाने उक्त कंपनी समवेत ज्या करारनाम्याच्या आधारे सदर कंपनीस करारबद्ध केले त्या करारनाम्यातील अटीनुसार आपले सरकार सेवा केंद्राचे कामकाज व्यवस्थितपणे चालविण्यात यावे यासाठी विभागाकडुन सर्व संबंधित परिपत्रकाद्वारे यासंदर्भात कडक स्वरुपाच्या सूचना देण्यात याव्यात अशी समितीची शिफारस आहे. याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती तीन महिन्याच्या आत समितीस देण्यात यावी.**

# परिशिष्ट - “अ”
# शासनाचे आदेश व परिपत्रके

(परिशिष्ट क्रमांक ३.१)

**"विविध कल्याणकारी योजनांमध्ये वस्तुस्वरूपात मिळणा-या लाभाचे हस्तांतर, रोख स्वरूपात थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात करणेबाबत."**

**महाराष्ट्र शासन**
**नियोजन विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः डिसीटी २३१६/प्र.क्र.१३३/का.१४१७**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : ०५ डिसेंबर, २०१६.

**प्रस्तावना –**

शासनाद्वारे थेट लाभ हस्तांतरण (DBT) प्रक्रियेवर मोठ्या प्रमाणात भर देण्यात येत आहे. जेणेकरुन लाभार्थ्यांना योजनांचा पूर्णपणे लाभ मिळेल आणि अनावश्यक गोष्टी टळू शकतील. सद्यस्थितीत डीबीटी अंतर्गत अनेक योजना अंतर्भूत असून या सर्व योजनांमध्ये रोख रकमेच्या स्वरुपात अनुदान देण्यात येते. हे अनुदान लाभार्थ्यांच्या बँक खात्यात थेट जमा होते. उदा. शिष्यवृत्ती, रोजगार हमी योजनेंतर्गत मिळणारे वेतन, पेन्शन योजना, घरगुती गॅसवरील अनुदान इ.

२. DBT कार्यक्रमाची व्याप्ती वाढविण्याची गरज आहे. DBT च्या दुसऱ्या प्रकारामध्ये शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांमध्ये ज्या ठिकाणी शासनाद्वारे वस्तू स्वरुपात अनुदान देण्यात येत आहे, त्या ठिकाणी वस्तू स्वरुपात अनुदान देण्याऐवजी रोख रकमेच्या स्वरुपात अनुदान देण्यात यावे. या निर्णयाचा परिणाम सर्व प्रशासकीय विभागांच्या कल्याणकारी योजनांच्या कार्यपध्दतीवर होणार असल्याने धोरणात्मक निर्णय घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत खालीलप्रमाणे शासन निर्णय घेण्यात येत आहे.

**शासन निर्णय –**

सोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ मध्ये दर्शविण्यात आलेल्या वस्तू कोणत्याही योजने अंतर्गत खरेदी करुन लाभार्थ्यांना वाटप / वितरीत करता येणार नाही.

सोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ मध्ये नवीन वस्तुंचा समावेश करण्याचे अधिकार मा. मुख्यमंत्री यांना राहतील.

हे धोरण शासनाच्या सर्व विभागांना (आदिवासी विकास विभाग व सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांसहित) , स्थानिक स्वराज्य संस्था, मंडळे व महामंडळे यांना लागू राहील.

२. शासकीय विभाग विभागांना (आदिवासी विकास विभाग व सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांसहित) / स्थानिक स्वराज्य संस्था / मंडळे / महामंडळे यांना जर कल्याणकारी योजनेअंतर्गत कोणतीही वस्तु / साधनसामग्री लाभार्थ्यांना द्यावयाची असल्यास त्यांनी खालील प्रमाणे कार्यपध्दती निश्चित करावी –

अ) संबंधित वस्तुबाबत वितरण योजना तयार करणे.
आ) वस्तु विकत घेण्यासाठी अनुदान ठरविणे.
इ) वितरीत करावयाच्या वस्तूंचे परिमाण (specification) ठरविणे.
ई) या योजनांतर्गत पात्रतेचे निकष ठरविण्यात यावे.
उ) पात्रतेप्रमाणे लाभार्थ्यांची निवड करण्यात यावी.
ऊ) लाभार्थ्यांची यादी तयार करुन त्यांच्या आधार क्रमांकाशी जोडणी (Seeding) करणे.
ए) निवड केलेल्या पात्र लाभार्थ्यांच्या प्रकरणाला मान्यता देवून त्यांना लेखी कळविणे.
ऐ) लाभार्थ्यांनी परिमाणाप्रमाणे (specification) वस्तूंची खरेदी करणे.
ओ)संबंधित यंत्रणेने लाभार्थ्याने खरेदी केलेल्या वस्तुची व सादर केलेल्या पावतीची शहानिशा करून पूर्णपणे खातरजमा झाल्यावर लाभार्थ्याच्या बँक खात्यावर योजनेअंतर्गत सुनिश्चित

केलेल्या अनुदानाची रक्कम जमा करणे. वस्तुची शहानिशा कशा प्रकारे करावी व ती करणे आवश्यक आहे काय याबाबत संबंधित विभागाने निर्णय घ्यावा.

औ)लाभार्थ्यांना रोख रकमेच्या स्वरूपात अनुदान त्यांच्या आधार क्रमांकाशी निगडीत बँक खात्यात जमा करण्यात यावे.

३. विविध कल्याणकारी योजनांमध्ये ज्या ठिकाणी शासनाद्वारे वस्तू स्वरुपात अनुदान देण्यात येत आहे, त्या ठिकाणी वस्तू स्वरुपात अनुदान देण्याऐवजी रोख रकमेच्या स्वरुपात अनुदान दिल्यास खालील फायदे शक्य होतील.

१) विविध कल्याणकारी योजनामधून मिळणारे लाभ हे थेट लाभार्थ्यांनाच मिळण्याची पूर्ण शाश्वती राहील.
२) विविध विभागांद्वारे विभागांना (आदिवासी विकास विभाग व सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांसहित) होत असलेल्या विविध प्रकारची खरेदी टळू शकेल.
३) शासनामार्फत देण्यात येणा-या लाभांबाबत संबंधित लाभार्थ्यांची निवड करुन त्यांना वित्तीय सहायता वेळेवर देण्याची हमी शासनाची राहिल.
४) लाभार्थ्याला एक ठराविक व विशिष्ट रक्कम मिळणार असल्याने तो आवश्यक असणाऱ्या वस्तूची गुणवत्ता तपासून व भाव करुन चांगली वस्तु खरेदी करु शकेल, असे करताना लाभार्थी त्याला न आवडणारी वस्तु घेण्यास बांधील राहणार नाही.
५) स्थानिक पातळीवरच लाभार्थी वस्तु खरेदी करणार असल्याने स्थानिक उद्योग व्यावसायिकांना लाभ होईल.
६) रोख रकमेच्या स्वरूपात लाभ वाटप केल्यामुळे शासनाच्या कार्यपध्दतीत अधीक पारदर्शकता येईल व संख्यात्मक तसेच गुणात्मक वाढ होईल.
७) वस्तुंच्या खरेदी प्रकियेमुळे तसेच वस्तुच्या गुणवत्तेबाबत निर्माण होणा-या बाबी, अनियमितता याबाबत विधीमंडळ अधिवेशनात विविध आयुधान्वये उपस्थित होणारे प्रश्न, रोख स्वरूपात थेट लाभ देण्याच्या पारदर्शक प्रक्रियेमुळे टळू शकतील.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६१२०५१५०९५११९७१६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Priyanka Ranjan Chhapwale

Digitally signed by Priyanka Ranjan Chhapwale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Section Officer, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=55fdd77fa8877b50fd182206f763c590c30ce698809f79d37b145fd63e375059, cn=Priyanka Ranjan Chhapwale
Date: 2016.12.05 15:12:09 +05'30'

**( प्रियांका रं. छापवाले )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल , महाराष्ट्र राज्य , यांचे सचिव
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव
३. मा.सर्व मंत्री यांचे खाजगी सचिव
४. मा.सर्व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
५. मा. विधानसभा / विधानपरिषद सदस्य (सर्व)

६. महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, (महाराष्ट्र-१/२), मुंबई/नागपूर.
७. मा. मुख्य सचिव , महाराष्ट्र शासन, मंत्रालय , मुंबई
८. अपर मुख्य सचिव , नियोजन विभाग, मंत्रालय , मुंबई
९. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव सर्व मंत्रालयीन विभाग .
१०. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (पत्राने)
११. महासंचालक,युआयडी प्रादेशिक कार्यालय, सातवा मजला, एमटीएनएल बिल्डिंग, जी. डी. सोमानी मार्ग,कफ परेड, मुंबई -४०० ००५
१२. विभागीय आयुक्त, सर्व.
१३. जिल्हाधिकारी, सर्व
१४. व्यवस्थापक, जिल्हा अग्रणी बँक (सर्व)
१५. जिल्हा माहिती अधिकारी (सर्व)
१६. महाव्यवस्थापक, राज्य स्तरीय बँकर्स समिती, बँक ऑफ महाराष्ट्र, केंद्रीय कार्यालय,लोकमंगल, १५०१, शिवाजीनगर, पुणे ०५.
१७. उप सचिव , नियोजन विभाग, (का. १४१७), मंत्रालय, मुंबई
१८. सह सचिव /उप सचिव / अवर सचिव, नियोजन विभाग , मंत्रालय , मुंबई
१६. निवडनस्ती, कार्यासन १४१७.

## परिशिष्ट अ

शासनाच्या विविध विभागामार्फत लाभार्थ्यांना वाटप करण्यात येणाऱ्या साधनसामुग्रीची यादी :-

१. जनावरांचे खादयवाटप
२. विजेवर चालणारे वैरण कापणी यंत्र / कडपा कटटी यंत्र
३. मासेमारीकरिता प्रगत यंत्रसामुग्री पुरविणे
४. कृषि औजारे पुरविणे
५. मायक्रो ट्रॅक्टर व त्याची उपसाधने
६. बियाणे लघु हत्यारे वितरण
७. मधपेटया यंत्र वाटप
८. गणवेश / साडी वाटप
९. सायकल वाटप
१०. पावर टिलर पुरविणे
११. गटई कामगारांना पत्र्याचे स्टॉल पुरविणे
१२. स्वयंपाकाचा गॅस व सौरकुकर
१३. सामुहिक विवाहाप्रसंगी वस्तु देणे.
१४. महिला बचत गटांना मोबाईल व्हॅन पुरविणे
१५. बियाणे पुरवठा / वाटप
१६. पिक संरक्षण उपकरणे
१७. कामगंध सापळे
१८. किटक नाशके
१९. पाईपलाईन
२०. ताडपत्री
२१. लघुअंडी उबविणारी यंत्रे
२२. मुरघास तयार करण्याची युनीट
२३. मासेमारी साधने
२४. कुक्कूटपालनाची शेड
२५. शेळया बकऱ्यांसाठी शेड
२६. कृषी पंप
२७. वीज पंप
२८. ऑईल इंजीन
२९. यांत्रिकीकरण संबंधी साहित्यपुरवठा
३०. पाठयपुस्तके
३१. गाईडस
३२. पिठाची गिरणी
३३. शिलाई मशीन
३४. चष्मा
३५. विद्यार्थ्यांना टॅब / लॅपटॉप वाटप
३६. मोबाईल फोन वाटप
३७. छत्री / रेनकोट
३८. कांडप यंत्र

३९. अपंग व्यक्तींना देण्यात येणारे साहित्य (श्रवण यंत्र / तीनचाकी सायकल / काठी इ.)
४०. पिको फॉल मशिन
४१. शाळेचे दप्तर (School Bag)
४२. पादत्राणे (Shoes)
४३. रोटाव्हेटर
४४. HDPE Pipe

परिशिष्ट क्रमांक ८.१

<u>राज्यातील ग्रामपंचायतींमध्ये “आपले सरकार सेवा केंद्र (ASSK)” उभारणी व अंमलबजावणीबाबत मार्गदर्शक सूचना.</u>

**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः संग्राम-२०१५/प्र. क्र.९३/संग्राम कक्ष**
बांधकाम भवन, मर्झबान पथ, फोर्ट
मंत्रालय, मुंबई - ४०० ००१
तारीख: ११ ऑगस्ट, २०१६

**<u>प्रस्तावना</u>**

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार पंचायती राज संस्थांच्या कारभारामध्ये ई-पंचायत प्रकल्पांतर्गत अभिप्रेत असलेली एकसुत्रता व पारदर्शकता आणणे, नागरिकांना विविध प्रशासकीय विभागांतर्गत आवश्यक असलेले सेवा-दाखले त्यांच्या रहिवासी क्षेत्रात कालबध्द स्वरूपात मिळणे, तसेच इतर व्यावसायिक सेवा, जास्तीत जास्त प्रकारच्या बँकिंग सेवा (सर्व G२C व B२C सेवा) ग्रामीण जनतेला एकाच केंद्रावर मिळाव्या या हेतूने राज्यातील ग्रामपंचायतींमध्ये “आपले सरकार सेवा केंद्र (ASSK)” स्थापन करण्याचा राज्य शासनाचा मानस आहे.

यापूर्वी ई-पंचायत (डिजिटल इंडिया मधील एक मिशन मोड विकास कार्यक्रम), हा प्रकल्प राज्यात संग्राम (संगणकीय ग्रामीण महाराष्ट्र) या नावाने सन २०११ ते सन २०१५ या कालावधीत महाराष्ट्रात राबविण्यात आला. या प्रकल्पासाठी महाऑनलाईन (महाराष्ट्र शासन व टाटा कन्सल्टन्सी यांची सहभागीदारी कंपनी) ही अंमलबजावणी यंत्रणा होती. आता सदर प्रकल्पाचा पुढील टप्पा राज्य शासनाचे ग्रामविकास विभाग, माहिती तंत्रज्ञान संचालनालय व CSC-SPV e-Governance Services India Ltd. (केंद्र शासनाद्वारे प्रेरित उपक्रम) यांच्या संयुक्त माध्यमातून आपले सरकार सेवा केंद्र या नावाने राबविण्याचे प्रस्तावित आहे.

## शासन निर्णय

**१. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ च्या कलम २६१ नुसार व महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ च्या कलम १५३ (अ) व (ब) नुसार राज्यशासनास पंचायत राज संस्थांना विकास योजनांसाठी मार्गदर्शन करण्याच्या अधिकारानुसार, राज्यातील ग्रामपंचायतींमध्ये आपले सरकार सेवा केंद्राची अंमलबजावणी सुरू करण्याबाबत पुढील प्रमाणे मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात येत आहेत.**

**१.१**महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ मधील अनुसूची १ मध्ये असाधारण राजपत्र क्र. १९७ क्र. व्हिपीएम-२०१५/प्र.क्र. १७२/पंरा-३ दि. २५ ऑगस्ट, २०१५ अन्वये केलेली सुधारणा क्र. ८० व जिल्हा परिषद, पंचायत समिती अधिनियम १९६१ मधील अनुसूची १ मध्ये असाधारण राजपत्र क्र. १९८ क्र. झेडपीएम-२०१५/प्र.क्र.१३९/पंरा-१ दि. २५ ऑगस्ट, २०१५ अन्वये केलेली सुधारणा क्र. १३० नुसार अनुक्रमे, ग्रामपंचायती व जिल्हा परिषदेच्या कार्यक्षेत्रात नागरिकांना दयावयाच्या सेवांसाठी माहिती व तंत्रज्ञानाचा वापर, माहिती संकलन करणे, संगणकीकरणासाठी हार्डवेअर, सॉफ्टवेअर यांची खरेदी अथवा देखभाल, दुरूस्ती आणि आवश्यक असलेले तांत्रिक मनुष्यबळ नियुक्त करणे या बाबींसाठी अधिकार प्रदान करण्यात आले आहेत.

**१.२**आपले सरकार सेवा केंद्र माध्यमातून केंद्रशासनाचा ई-पंचायत प्रकल्प (११ NIC आज्ञावली), ग्रामपंचायत लेखासंहिता २०११ चे १ ते ३३ रजिस्टर डिजिटाईज्ड व ऑनलाईन करणे, ग्रामपंचायतींद्वारे दिल्या जाणाऱ्या सेवा ऑनलाईन करणे इ. कामकाज करण्यात येईल. ग्रामपंचायत पातळीवर CSC-SPV (Common Services Centres -Special Purpose Vehicle) या केंद्रशासनाद्वारे प्रेरित कंपनीच्या माध्यमातून सदर प्रकल्प राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे व यासाठी ग्रामविकास विभाग, माहिती तंत्रज्ञान विभाग व प्रस्तुत कंपनी यांचेसमवेत त्रिपक्षीय करारनामा करण्यात येत आहे.

**१.३**या प्रकल्पामुळे पंचायती राज संस्थांचा कारभार संगणकीकृत होऊन ई-पंचायत प्रकल्पांतर्गत अभिप्रेत असलेली एकसुत्रता व पारदर्शकता आणणे शक्य होईल. तसेच ग्रामपंचायतीद्वारा देण्यात येणारी G२C सेवा नागरिकांना आता आपले सरकार सेवा केंद्रामार्फत उपलब्ध होतील. शासनाच्या इतर विभागांमार्फत देण्यात येणाऱ्या सेवा तसेच ग्रामीण नागरिकांना आवश्यक असलेल्या इतर व्यवसायिक सेवा (शासन सेवांव्यतिरिक्त) उदा. रेल्वे, बस आरक्षण, डीटीएच रिचार्ज, बँकिंग सेवा, आर्थिक समावेशन, ई-कॉमर्स, पॅनकार्ड, आधार नोंदणी, विमा हप्ते भरणे, पासपोर्ट, ईलेक्ट्रीसिटी बील, पोस्ट विभागाच्या सेवा इ. सेवा सुध्दा या केंद्रांवर उपलब्ध असतील व त्यामाध्यमातून सदर केंद्र भविष्यात स्वयंपूर्ण (Self-Sustainable) बनण्यासाठी प्रयत्न केले जातील.

**२. या प्रकल्पांतर्गत राज्यात खालीलप्रमाणे आपले सरकार सेवा केंद्र उभारण्यात येतील.**

**२.१**राज्यातील ज्या ग्रामपंचायतींचे अंदाजपत्रकाची / उत्पन्न (येथे उत्पन्न म्हणजे ग्रामपंचायतींचे स्वत:चे उत्पन्न + १४ व्या वित्त आयोगातून प्राप्त निधी + आदिवासी विभागाकडून प्राप्त निधी व इतर कोणताही मुक्त निधी ज्याचा पूर्णपणे खर्च करण्याचा ग्रामपंचायतींना संपूर्ण अधिकार आहे, असे

समजण्यात यावे) सर्वसाधारणपणे रू. १५ लाख किंवा त्यापेक्षा जास्त आहे, अशा ग्रामपंचायतींकडे किमान एक स्वतंत्र आपले सरकार सेवा केंद्र उभारण्यात येईल.

**२.२** या व्यतिरिक्त ज्या ग्रामपंचायतींचे उत्पन्न रू. १५ लाखापेक्षा कमी असून सुध्दा ग्रामपंचायतीला स्वत:चे स्वतंत्र आपले सरकार सेवा केंद्र उभारायचे असेल व त्यासाठी सर्व आर्थिक जबाबदारी घेण्याची तयारी असेल, अशी ग्रामपंचायत याबाबत स्वेच्छेने निर्णय घेऊ शकेल.

**२.३**राज्यातील ज्या ग्रामपंचायतींचे उत्पन्न रू. १५ लाखापेक्षा कमी आहे, आणि ज्यांनी स्वतंत्र आपले सरकार सेवा केंद्र (ASSK) उभारण्याबद्दल स्वेच्छेने निर्णय घेतला नाही, त्यांना त्यांच्या भौगोलिक स्थळांनुसार एकत्रित करून ग्रामपंचायतींच्या क्लस्टर्सची (गट) निर्मिती करण्यात येईल व तेथे आपले सरकार सेवा केंद्र उभारण्यात येईल. सदर क्लस्टर्स तयार करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना देण्यात येत आहेत. हे क्लस्टर्स तयार करताना कोणत्याही एका क्लस्टरमध्ये एका गणापेक्षा अधिक गणांतील ग्रामपंचायतींचा समावेश असू नये याची दक्षता घ्यावी. तसेच क्लस्टर्समध्ये पाच किलोमीटर पेक्षा जास्त अंतरावरील ग्रामपंचायतीचा समावेश करू नये. ही सर्व बंधने पाळताना सर्वच क्लस्टर्सचे एकूण उत्पन्न रू. १५ लाखापर्यंत आणणे शक्य नसल्यास या मर्यादेच्या जवळपास आणण्याचा प्रयत्न करावा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी अंतिमत: भौगोलिक परिस्थिती व ग्रामपंचायतीची आर्थिक क्षमता लक्षात घेऊन क्लस्टर्स तयार करावीत.

**२.४**ज्या ग्रामपंचायतींचे उत्पन्न रू. १५ लाखापेक्षा जास्त आहे, ती ग्रामपंचायत स्वेच्छेने एकापेक्षा जास्त आपले सरकार सेवा केंद्राची (ASSK) मागणी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचेकडे नोंदवू शकेल, अशी मागणी प्राप्त झाल्यावर संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी त्या ग्रामपंचायतीतील कामाची व्याप्ती बघून मान्यता दयावी.

**२.५**उपरोक्त सर्व ग्रामपंचायतींनी आपले सरकार सेवा केंद्र उभारण्याचा प्रस्ताव संपूर्ण माहितीसह ग्रामसभेत ठेवावा व ग्रामसभेची मंजूरी घ्यावी. यासाठी लागणारा निधी या शासन निर्णयात विहीत केल्याप्रमाणे (परिच्छेद क्र. ७.१.१) जिल्हा स्तरीय निधीत वर्ग करण्यास मंजूरी घ्यावी. सदर कार्यवाही दि. १ सप्टेंबर २०१६ पर्यंत पूर्ण करावी.

**३. आपले सरकार सेवा केंद्रातून पुढील प्रमाणे सेवा अपेक्षित आहे.**

**३.१ ग्रामपंचायतींच्या प्रशासनाचे संगणकीकरण (G२G) करणे**:

**३.१.१** ग्रामपंचायतींच्या लेखा संहिता २०११ मधील दैनंदिन कामकाजाचे १ ते ३३ नमूने संगणकीकृत करणे.

**३.१.२** ई पंचायत कार्यक्रमाअंतर्गत NIC आज्ञावली वापरणे.

१. नॅशनल पंचायत डिरेक्टरी /लोकल गर्व्हर्नमेन्ट डिरेक्टरी
२. नॅशनल पंचायत प्रोफाईलर/ एरिया प्रोफाइलर
३. प्लॅन प्लस
४. प्रियासॉफ्ट
५. ॲक्शन सॉफ्ट
६. ॲसेट डिरेक्टरी
७. सर्विस प्लस
८. ट्रेनिग मॅनेजमेन्ट
९. सोशल ऑडीट व मिटिंग मॅनेजमेंट
१०.नॅशनल पंचायत पोर्टल
११.बेसिक GIS प्रणाली

**३.२ ग्रामपंचायतीद्वारा देण्यात येणारे दाखले / प्रमाणपत्र (G२C) संगणकीकृत करणे व वितरीत करणे.**

| क्र | दाखले/ प्रमाणपत्र |
|---|---|
| १ | जन्मनोंदणी व प्रमाणपत्र |
| २ | मृत्युची नोंदणी व प्रमाणपत्र |
| ३ | रहिवासाचा दाखला व प्रमाणपत्र |
| ४ | विवाहाचा दाखला |
| ५ | नोकरी व्यवसायासाठी नाहरकत प्रमाणपत्र |
| ६ | मालमत्ता आकारणी प्रमाणपत्र |
| ७ | मालमत्ता फेरफार प्रमाणपत्र/ प्रत |
| ८ | नादेय प्रमाणपत्र |
| ९ | बेरोजगार प्रमाणपत्र |
| १० | वीजेच्या जोडणीसाठी नाहरकत प्रमाणपत्र |
| ११ | कोणत्याही योजनेचा फायदा घेतला नसल्याचे प्रमाणपत्र |
| १२ | शौचालय दाखला |
| १३ | जॉब कार्ड |
| १४ | बांधकामासाठी अनुमती प्रमाणपत्र |
| १५ | नळजोडणीसाठी अनुमती प्रमाणपत्र |

| | |
|---|---|
| १६ | चारीत्र्याचा दाखला |
| १७ | निराधारयोजनेसाठी वयाचा दाखला |
| १८ | दारिद्र्यरेषेखालील प्रमाणपत्र |
| १९ | हयातीचा दाखला |

**३.३ ग्रामपंचायतींशी संबंधित नसलेल्या व लोकांसाठी उपयोगी इतर सेवा (B2C) संगणकीकरणामार्फत उपलब्ध करणे.**

उदा. रेल्वे, बस आरक्षण, डीटीएच रिचार्ज, बँकिंग सेवा, आर्थिक समोवशन, ई-कॉमर्स, पॅनकार्ड, आधार नोंदणी, विमा हप्ते भरणे, पासपोर्ट, वीज बील भरणे, पोस्ट विभागाच्या सेवा इ. सर्व बाबी आपले सरकार सेवा केंद्राद्वारे राबविण्यात येतील.

**४. आपले सरकार सेवा केंद्राचे व्यवस्थापन :-**

**४.१** आपले सरकार सेवा केंद्राचे संपूर्ण व्यवस्थापन CSC-SPV कंपनीमार्फत करण्यात येईल. यासाठी ग्रामपंचायतींच्या क्षेत्रात किंवा परिसरातील ग्रामोद्योजक आपले सरकार सेवा केंद्रचालक म्हणून निवड CSC-SPV च्या केंद्रीय स्तरावरील निवड प्रक्रियेद्वारे निष्पक्ष व न्यायोचित पध्दतीने करण्यात येईल.

**४.२** आपले सरकार सेवा केंद्रास ग्रामपंचायतींची जागा, ग्रामपंचायतींची इलेक्ट्रीसिटी, ग्रामपंचायतींचे इंटरनेट कनेक्टीव्हीटी या सुविधा वापरण्याची मुभा असेल.

**४.३** संग्राम प्रकल्पांतर्गत खरेदी करण्यात आलेले (संगणक, प्रिंटर कम स्कॅनर, वेब कॅमेरा) हार्डवेअरची ५ वर्षाची ऑनसाईट वॉरंटी (२०१७ पर्यंत वैध) आहे. त्यानुसार सदरील हार्डवेअर वापरता येईल. नवीन हार्डवेअर खरेदी करण्याची गरज भासल्यास त्यासाठी येणारा खर्च संबंधित ग्रामपंचायत त्यांच्या स्वनिधीतून करेल.

**५. आपले सरकार सेवा केंद्रांसाठी दयावयाचा मोबदला:-**

**५.१** वरील परिच्छेद (३) मधील बाब (३.१) आणि (३.२) साठी ग्रामपंचायत CSC-SPV कंपनीला खालीलप्रमाणे ठोक मोबदला देईल.

**५.२** ग्रामपंचायतींच्या G2G व G2C [परिच्छेद (३) मधील बाब (३.१) आणि (३.२)] कामांसाठी आपले सरकार सेवा केंद्रासाठी रू. ६०००/- प्रति आपले सरकार सेवा केंद्र प्रति माह मोबदला निश्चित करण्यात येत आहे. या मोबदल्याप्रमाणे परिपूर्ण सेवा ग्रामपंचायतीत व ग्रामस्थांना मिळाव्या यासाठी सेवा स्तर (SLA) करारात विशद करण्यात येईल. परिच्छेद (३.२) मध्ये नमूद सेवेसाठी ग्रामपंचायत संबंधित सेवा केंद्राला ठोक रक्कम देत असल्यामुळे या सेवेसाठी मिळणाऱ्या सेवा

शुल्काची संपूर्ण रक्कम ग्रामपंचायतीला विहीत होईल. परिच्छेद (३.३) मध्ये नमूद सेवांसाठी केंद्रास प्राप्त होणारी रक्कम ग्रामपंचायती, CSC-SPV व केंद्रामध्ये कंपनीशी होणाऱ्या करारात नमूद केल्याप्रमाणे राहील.

**५.३** वरील मोबदल्या व्यतिरिक्त या केंद्रासाठी लागणारा कंझ्युमेबल्स इ. खर्च प्रथम वर्षाकरीता रू. २७००/- प्रति केंद्र प्रति माह निश्चित करण्यात येत आहे. एक वर्षाच्या कंझ्युमेबल्स इ. वापराच्या प्रत्यक्ष अभ्यासानंतर उपरोक्त खर्च माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाने निश्चित केल्यानुसार असेल.

**५.४** वरील मोबदल्या व्यतिरिक्त आपले सरकार सेवा केंद्रासाठी प्रशिक्षण, राज्य, तालुका व जिल्हा पातळीवरील सहाय्यासाठी रू. १३००/- प्रति केंद्र प्रति माह व कंपनीची व्यवस्थापन फी करिता रू. ४५०/- प्रति केंद्र प्रति माह निश्चित करण्यात येत आहे.

**५.५** नजीकच्या काळात संग्रामसॉफ्टवेअर तसेच विविध सॉफ्टवेअरमध्ये (मगांरारोहयो, आम आदमी विमा योजना, आवाससॉफ्ट इ.) डेटा भरण्याची जबाबदारी या केंद्रांना देता येईल. याबाबतच्या डेटा एन्ट्रीचा मोबदला, संबंधित डेटा एन्ट्रीचे स्वरूप (उदा. Numeric, Alpha-numeric, Boolean) पाहून निश्चित करण्यात येईल. तसेच राज्यशासनाचे विविध विभागाकडून मागणी झाल्यानंतर विभागाच्या काही योजनांचे डेटा एन्ट्री करण्याचे काम सेवा केंद्रातून करण्यात आले तर त्याचा मोबदला वरीलप्रमाणे डेटा एन्ट्रीचे स्वरूप पाहून निश्चित करण्यात येईल.

**५.६** १४ व्या वित्त आयोगातून प्राप्त निधी अंतर्गत ग्रामपंचायत विकास आराखडयांतर्गत (GPDP) करावयाच्या कामांचे नियोजन व व्यवस्थापन यासाठी आवश्यक डेटा एन्ट्री / संगणकीकरण करणे आवश्यक आहे व हे काम या केंद्राच्या माध्यमातून होणार आहे. सबब, ग्रामपंचायत त्यांना मिळालेल्या १४ व्या वित्त आयोगातून प्राप्त निधीच्या १०% प्रशासकीय निधीमधून या प्रकल्पासाठी खर्च करू शकतील. अर्थात १० % प्रशासकीय निधी मधून इतर प्रशासकीय कामेही घेणे आवश्यक असल्यामुळे सदर खर्च ५% (१०% प्रशासकीय निधीच्या ५०%) च्या मर्यादेत असणे योग्य राहील. तथापि सदर निधी अपूरा पडल्यास उर्वरीत खर्च १४ व्या वित्त आयोगाच्या ९०% अनुदानातून किंवा ग्रामपंचायत स्वनिधीतून / मुक्त निधीतून उपलब्ध करणे शक्य आहे, कारण सदर (ग्रामपंचायतींचे संगणकीकरण, नागरिकांना ऑनलाईन सेवा उपलब्ध करणे इ.) सेवा या ई-गर्व्हनन्स सेवाअंतर्गत मुलभूत सेवांमध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या आहेत.

**६. CSC-SPV कंपनी व संबंधित आपले सरकार सेवा केंद्रावर पुढील जबाबदारी असेल.**

**६.१** मागील पाच वर्षांचा (२०१०) संपूर्ण Legacy data संगणकीकृत करण्याची जबाबदारी (सन २०१० नंतरचे सर्व जन्म-मृत्यूचे दाखले संगणकीकृत असतील याची जबाबदारी)

**६.२** सन २०१५-१६, १६-१७ व यापुढील चार वर्षाचा डेटा संगणकीकृत करण्याची जबाबदारी.

**६.३** मागील पाच वर्षाचा डेटा तसेच यावर्षीचा डेटा भरताना ग्रामपंचायतींच्या लोकसंख्येच्या प्रमाणात सर्वसाधारणपणे पुढील प्रमाणे कालमर्यादा निश्चित करण्यात येत आहेत.सदर कालमर्यादेत काम पुर्ण करण्याची जबाबदारी संबंधित कंपनीची व आपले सरकार सेवा केंद्राची असेल.

i. ५ हजार किंवा त्यापेक्षा कमी लोकसंख्येच्या ग्रामपंचायतींमधील डेटा एन्ट्रीसाठी २ महिन्यांची कालमर्यादा

ii. ५ हजार ते २० हजार लोकसंख्येच्या ग्रामपंचायतींमधील डेटा एन्ट्रीसाठी ६ महिने कालमर्यादा

iii. ५० हजारापेक्षा जास्त लोकसंख्येच्या ग्रामपंचायतींमधील डेटा एन्ट्रीसाठी ९ महिन्यांची कालमर्यादा

वरीलप्रमाणे कालमर्यादेत कोणालाही योग्य कारणास्तव डेटा एन्ट्री शक्य नसेल तर गट विकास अधिकारी यामध्ये मुदतवाढ देऊ शकेल.

**६.४** CSC-SPV कंपनी यांची भूमिका व जबाबदारी यासंदर्भात होणा-या त्रिपक्षीय करारनाम्यामध्ये नमुद केल्यानुसार असेल. या प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी CSC-SPV कंपनीने नियुक्त केलेल्या मनुष्यबळाची संपूर्ण वैधानिक जबाबदारी (करार कायदयातील विविध तरतूदीच्या अधीन राहून) CSC-SPV कंपनीची असेल. CSC-SPV कंपनीने करार पध्दतीने नेमलेल्या मनुष्यबळाला कोणत्याही प्रकारच्या शासकीय सेवेसाठी विचार करण्याचे शासनावर बंधनकारक राहणार नाही. ग्रामविकास विभागाच्या अधिकाऱ्यांना या प्रकल्पाची तपासणी करण्यासाठी आवश्यक ते सर्व सहकार्य CSC-SPV कंपनी करेल.

## ७. या प्रकल्पाची ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद स्तरावर अंमलबजावणी करण्यासाठी मार्गदर्शक सूचना :-

### ७.१ ग्रामसेवक / ग्रामपंचायतींची भूमिका व जबाबदारी:-

**७.१.१** या केंद्रांकरिता निश्चित करण्यात आलेली रक्कम प्रत्येक ग्रामपंचायत जिल्हा स्तरीय निधीला प्रत्येक तीन महिन्यांनी आगाऊ वर्ग करेल. ज्या ग्रामपंचायतीकडे स्वतंत्र ASSK केंद्र आहे, त्यांची दरमहा रू. १०,४५०/- + सेवा कर प्रति केंद्र जिल्हा स्तरीय निधीला वर्ग करावे व ज्या ग्रामपंचायती clusters मध्ये समाविष्ट आहेत त्यांनी त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात रक्कम विभागून, त्याप्रमाणे रक्कम जिल्हा स्तरीय निधीला वर्ग करावी व रक्कम विभागून देण्याची कार्यवाही गट विकास अधिकारी यांनी पूर्ण करावी.

**७.१.२** संगणकीकरणाच्या उपरोक्त कार्यक्रमामध्ये ग्रामसेवकांनी सर्व डेटा प्रमाणित करणे व त्याचा गावपातळीवरील नियोजनासाठी वापर करणे आवश्यक आहे.

**७.१.३** ग्रामपंचायतीतील आपले सरकार सेवा केंद्रात उपलब्ध करून दिलेल्या हार्डवेअरची (कॉम्प्युटर, प्रिंटर, यूपीएस, इंटरनेट, मॉडेम तसेच नॅशनल ऑप्टीकल फायबर नेटवर्कअंतर्गत मॉडेम प्राप्त झाले असल्यास) प्राथमिक देखभाल करणे, काही नादुरूस्ती झाल्यास त्याबाबत संबंधित ग्रामसेवक व CSC-SPV कंपनीच्या सहाय्य यंत्रणेस तात्काळ सूचित करणे व दुरूस्तीबाबत पाठपुरावा करणे.

**७.१.४** तसेच या प्रकल्पाशी निगडित इतर अनुषंगिक कामे करणे.

**७.१.५** आपले सरकार सेवा केंद्रामध्ये या प्रकल्पासाठी वापरण्यात येणारे संगणक व अनुषंगिक वापरासाठीच्या वीज बीलाचा भरणा करण्याची जबाबदारी संबधित ग्रामपंचायतीची असेल.

**७.१.६** संबधित ग्रामपंचायत कार्यालयात इंटरनेटची जोडणी उपलब्ध करून देतील.

**७.१.७** आपले सरकार सेवा केंद्रामध्ये ई-पंचायत प्रकल्प व इतर अनुषंगिक योजनांबाबतची माहिती संगणक / संकेतस्थळावर भरण्यासाठी तसेच वेळोवेळी अदययावत करण्यासाठी आवश्यक त्या माहितीचे संकलन / दप्तर संबंधित आपले सरकार सेवा केंद्र यांना उपलब्ध करून देऊन अदययावत केली किंवा कसे याबाबत तपासण्याची व प्राथमिक अहवाल घेण्याची जबाबदारी संबंधित ग्रामपंचायतीचे सरपंच व ग्रामसेवक यांची राहील.

**७.२ <u>गट विकास अधिकारी यांची भूमिका व जबाबदारी:-</u>**

**७.२.१** या प्रकल्पांतर्गत ग्रामपंचायत स्तरावरील आपले सरकार सेवा केंद्रामध्ये ई-पंचायत प्रकल्प व इतर अनुषंगिक योजनांबाबतची माहिती संगणक / संकेतस्थळावर भरण्यासाठी तसेच वेळोवेळी अदययावत करण्यासाठी आवश्यक त्या माहितीचे संकलन / दप्तर संबंधित आपले सरकार सेवा केंद्राला उपलब्ध करून देऊन अदययावत केली किंवा कसे याबाबत तपासण्याची व प्राथमिक अहवाल घेण्याची जबाबदारी संबंधित पंचायत समितीचे गट विकास अधिकारी व विस्तार अधिकारी (पंचायत) यांची राहील.

**७.२.२** या प्रकल्पाशी निगडीत पंचायत समिती स्तरावरील आपले सरकार सेवा केंद्रामधील कामकाज, विविध MIS, देखभाल व दुरूस्ती, ग्रामपंचायत स्तरापर्यंतचे आवश्यकतेनुसार प्रशिक्षण, हार्डवेअरची देखभाल, दुरूस्ती व कामकाजावर देखरेख इत्यादी. कामे करणेबाबतची जबाबदारी संबंधित पंचायत समितीचे गट विकास अधिकारी व विस्तार अधिकारी (पंचायत) यांची राहील.

**७.३ <u>मुख्य कार्यकारी अधिकारी यांची भूमिका व जबाबदारी:-</u>**

**७.३.१** या प्रकल्पांतर्गत उपरोक्त परिच्छेद क्र. २ मध्ये नमुद ग्रामपंचायतींचे क्लस्टर्स तयार करणे व त्याचा संबंधित ग्रामसभांच्या मान्यतांसह अहवाल शासनास सादर करणे.

**७.३.२** ग्रामपंचायत स्तरावर आपले सरकार सेवा केंद्रामध्ये ई-पंचायत प्रकल्प व इतर अनुषंगिक योजनांबाबतची माहिती संगणक / संकेतस्थळावर भरण्यासाठी तसेच वेळोवेळी अदययावत करण्यासाठी आवश्यक त्या माहितीचे संकलन / दप्तर संबंधित आपले सरकार सेवा केंद्रास उपलब्ध करून देऊन अदययावत केली किंवा कसे याबाबत तपासण्याची, प्राथमिक अहवाल व पंचायत समिती स्तरावरून वेळोवेळी आढावा घेण्याची जबाबदारी संबंधित जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांची राहील व यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे नियंत्रण राहील.

**७.३.३** या प्रकल्पाशी निगडीत ग्रामपंचायत स्तरावरील आपले सरकार सेवा केंद्रामधील कामकाज, विविध MIS, देखभाल व दुरूस्ती, ग्रामपंचायत स्तरापर्यंतचे आवश्यकतेनुसार प्रशिक्षण, हार्डवेअरची देखभाल, दुरूस्ती व कामकाजावर देखरेख इत्यादी कामे करणेबाबतची जबाबदारी संबंधित जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांची राहील.

**७.३.४** पंचायत समिती व ग्रामपंचायत स्तरावर उपलब्ध करून दिलेल्या मनुष्यबळाच्या कामकाजावर तसेच प्रकल्प अंमलबजावणीच्या प्रगतीवर देखरेख व नियंत्रण ठेवणे याची जबाबदारी संबंधित जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांची राहील.

**७.३.५** जिल्हा परिषद, पंचायत समिती स्तरावर आवश्यक असलेले विविध MIS, वेबसाईट इत्यादी अनुषंगिक कामे, संबंधित जिल्हा परिषदेअंतर्गत असलेल्या सर्व पंचायत राज संस्थांच्या वेबसाईट, ई-मेल व इतर आज्ञावली अदयावत असल्याची खातरजमा करणे व त्यानुसार संबंधित क्षेत्रिय अधिकाऱ्यांना अहवाल देणे याची जबाबदारी संबंधित जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांची राहील.

**७.३.६** आपले सरकार, सेवा हक्क अधिनियमाच्या कामकाजाच्या अनुषंगाने पंचायत समिती व ग्रामपंचायत स्तरावरील कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण व सहाय्य करणे याची जबाबदारी संबंधित जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांची राहील.

**८. <u>प्रकल्प संनियंत्रण:-</u>**

या प्रकल्पाची अंमलबजावणी ग्रामविकास विभागाच्या मार्गदर्शनानुसार करण्यात येईल व ग्रामविकास विभाग याचे त्रैमासिक पुनर्विलोकन करेल. आपले सरकार सेवा केंद्राच्या कामगिरीची संपूर्ण जबाबदारी पूर्णपणे CSC-SPV कंपनीची असेल याबाबत काही तक्रार असल्यास संबंधितांनी

CSC-SPV कंपनीकडे तक्रार दाखल करावी व CSC-SPV कंपनीने ३० दिवसांत निर्णय घ्यावा. कंपनीने तीन पेक्षा जास्त वेळा तक्रार दाखल झाल्यास, केंद्र चालकास परत संधी देऊ नये. सूचनेच्या पत्र प्राप्तीच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या मुदतीत याबाबत योग्य कार्यवाही करण्याचे कंपनीस बंधनकारक राहील.

८.१ या संदर्भात कोणतीही तक्रार वा मतभेद उदभवल्यास या बाबतचा अंतिम निर्णय ग्रामविकास विभाग मंत्रालय येथे घेण्यात येईल आणि सदर असा निर्णय ग्रामपंचायत/ आपले सरकार सेवा केंद्रावर बंधनकारक राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०८१२१०२३४५२१२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Aseem Gupta

Digitally signed by Aseem Gupta
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=RDD, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=42cb1d992ceadc1f5fea3c14e1cedf9b5ea392a9c81fdbde5629e68c9158678b, cn=Aseem Gupta
Date: 2016.08.12 11:06:20 +05'30'

**(असीम गुप्ता)**
**सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१) मा. राज्यपालांचे सचिव
२) मा.मुख्यमंत्री, यांचे प्रधान सचिव
३) सर्व मा. विधानमंडळ सदस्य, विधानभवन, मुंबई.
४) मा.प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय
५) शासनाचे मुख्य सचिव
६) शासनाचे सर्व अप्पर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव (सर्व प्रशासकीय विभाग)
७) सर्व विभागीय आयुक्त,
८) सर्व सहसचिव/उपसचिव (ग्रामविकास विभाग)
९) सर्व जिल्हाधिकारी
१०) मा.मंत्री (ग्रामविकास) यांचे खाजगी सचिव
११) मा.राज्यमंत्री (ग्रामविकास) यांचे खाजगी सचिव
१२) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी

१३) सर्व जिल्हा परिषदांचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी

१४) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी

१५)सर्व जिल्हा परिषदांचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी, (पंचायत/सा.प्र.वि)

१६) सर्व पंचायत समित्यांचे गट विकास अधिकारी

१७) CSC-SPV e-Governance India Ltd. इलेक्ट्रॉनिक निकेतन, तिसरा मजला, De सीजीओ कॉम्प्लेक्स, लोधी रोड, नवी दिल्ली-११०००३.

१८)स्वीय सहायक प्रधान सचिव (मा.व तं.), मा. प्रधान सचिव (मा.व तं.) यांचे अवलोकनार्थ

१९) स्वीय सहायक सचिव (ग्रा.वि), मा. सचिव (ग्रा.वि) यांचे अवलोकनार्थ

२०)निवड नस्ती, संग्राम कक्ष, ग्रामविकास व पंचायत राज विभाग

महाराष्ट्र शासन
ग्रामविकास विभाग,
बांधकाम भवन,२५, मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई-४०० ००१.
दूरध्वनी क्र ०२२-२२०१६७३७
Email ID: sosan.rdd-mh@nic.in

---

क्र : संकिर्ण-२०२१/प्र.क्र.१०५ /आराक. दिनांक : १६/११/२०२१.

प्रति,

उप सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई-४०००३२.

विषय - मा.समिती प्रमुख,पंचायती राज समिती यांनी दिलेल्या पत्रावर कार्यवाही करून त्याबाबतची माहिती उपलब्ध करून देण्याबाबत.

संदर्भ:-१) आपले पत्र क्र.१७१४४/म.वि.स./पं.रा.स, दिनांक-१० नोव्हेंबर २०२१.
२) मा. श्री. संजय.भा.रायमुलकर ,विधानसभा सदस्य तथा मा.समिती प्रमुख पंचायती राज समिती यांचे दि.२६ ऑक्टोबर २०२१ चे पत्र

वरील विषयाच्या संदर्भांकित पत्रांन्वये मा.समिती प्रमुख,पंचायती राज समिती यांनी CSC-SPV e-Governance services India Ltd. कंपनी संदर्भात विचारणा केलेल्या मुद्द्यांच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे माहिती सादर करण्यात येत आहे.

- CSC SPV मार्फत ग्रामपंचायती कडून प्राप्त ठरावा नुसार आज अखेर स्वतंत्र व क्लस्टर असे एकूण २०,६८८ आपले सरकार सेवा केंद्र स्थापन करण्यात आले असून २०,०६७ केंद्र चालकांची नियुक्ती करण्यात आली आहे . या केंद्रांमार्फत २७,८४४ ग्रामपंचायतीना सेवा पुरवली जाते.
- आपले सरकार सेवा केंद्रा मार्फत शासन निर्देशानुसार ग्रामपंचायत स्तरावर G2C अंतर्गत १ ते १९ दाखले नागरिकांना वितरीत करणे, तसेच शासनाच्या इतर विभागाच्या ४२० हून अधिक सेवा नागरिकांना दिल्या जातात. G2G अंतर्गत ग्रामपंचायत स्तरावरील नमुना १ ते ३३ मधील नोंदी संगणकिकृत करणे व पंचायत राज विभागाच्या १ ते ११

दि. १९/११/२०२१
पत्र प्राप्त

आज्ञावली मध्ये नोंदी करणे व B2C अंर्तगत विविध सेवा जसे मोबाईल रिचार्ज,तिकीट बुकींग,पॅनकार्ड इ. ग्रामपंचायत स्तरावर आपले सरकार सेवा केंद्रमार्फत दिल्या जातात. सदर सेवांचा तपशील सोबतच्या विवरणपत्रात नमुद केल्यानुसार आहे.

- आपले सरकार सेवा केंद्रासाठी ग्रामपंचायतीद्वारे इंटरनेटची जोडणी करून देण्यात येते.
- हार्डवेअर दुरुस्ती व स्टेशनरी ( रिम / टोनर ) पुरवठा करिता संगणकीय प्रणाली (ERP) मध्ये टिकीट सिस्टीम विकसित करण्यात आली आहे. त्याची कार्यवाही पुढील प्रमाणे.

  १. हार्डवेअर किंवा रिम टोनर बद्दलची तक्रार असल्यास केंद्रचालक व ग्राम सेवक त्यांच्या लॉगिन मधून तिकीट नमूद करतात .

  २. प्रणाली मधील नोंद तिकीटानुसार जिल्हा हार्डवेअर इंजिनीअर संगणक अथवा प्रिंटरची दुरूस्ती करतात व रिम टोनर मिळाल्याची पडताळणी करतात.

  ३. संगणकीय प्रणाली (ERP) मधील नमूद तिकीट नुसार गरज भासल्यास वेळोवेळी हार्डवेअर दुरुस्तीकरिता तालुका स्तरावर मोहीम ( CAMP) आयोजित केली जाते .

त्यामधील कार्यवाहीनुसार तिकटांचा आजपर्यंतचा तपशील पुढील प्रमाणे.

| अ क्र. | तपशील | संख्या |
|---|---|---|
| १ | हार्डवेअर तिकीट | ५४,८१४ |
| २ | स्टेशनरी ( रिम / टोनर ) | ५,८४,३७६ |
| | एकूण | ६,३९,१९० |

- शासन परिपत्रक क्रमांकः आसक-२०१७/प्र.क्र.३२/आपले सरकार कक्ष, दि.६ सप्टेंबर, २०१७ नुसार ग्रामपंचायत स्तरावर पुरवठ्याबद्दल/ कामाबद्दल तक्रार असल्यास देयकामध्ये प्रत्येक महिन्यात आवश्यक कपात करण्याची सुविधा ग्रामसेवकांना देयक प्रणालीमध्ये उपलब्ध करून देण्यात आली आहे. ही कपात रक्कम त्या महिन्याच्या एकूण देयकामधून कपात केली जाते. तसेच शासन निर्णय क्र आसक २०१७/प्र.क्र.३२/आसक, दि.१७ मार्च, २०१८ अन्वये आपले सरकार केंद्र प्रकल्पांतर्गत मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दंडात्मक कार्यवाहीसाठी अधिकार देण्यात आले आहे. त्यानुसार ग्रामपंचायत स्तरावर CSC-SPV e-Governance services India Ltd च्या देय रकमेतून आतापर्यंत एकूण रू. ५४,४३,१५,५६०/- इतकी रक्कम कपात करण्यात आली आहे. तसेच जिल्हापरिषद स्तरावर जिल्हा परिषद चंद्रपूर यांचेमार्फत CSC-SPV e-Governance services India Ltd. वर रु. ५२ लाख इतका दंड आकारण्यात आला आहे.

Pravin Jain
( प्रविण जैन )
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

- केंद्रामार्फत आता पर्यंत वितरीत करण्यात आलेल्या एकूण सेवा/ दाखले:

| क्र. | सेवा | एकूण संख्या |
|---|---|---|
| १ | १ ते १९ दाखले | १७,८४,९७३ |
| २ | सर्व्हिस प्लस | ३०,८०,५८९ |
| ३ | ईग्रामस्वराज आज्ञावली | १८,३१,४३७ |
| ४ | महाऑनलाइन | २३,६८,६१० |
| ५ | ईग्रामसॉफ्ट नोंदी | ३,९५,१४,५२४ |
| ६ | B२C सर्व्हिसेस | ४३,२२,४३१ |
| ७ | अतिक्रमण नियमानुकूलन करणे | ५,७६,८४२ |
| ८ | छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना अंतर्गत नोंदी | ९,०३,४४२ |
| ९ | अस्मिता योजना अंतर्गत नोंदी | ३,६२,७३३ |
| | एकूण | **५,४७,४५,५८१** |

**राज्यातील ग्रामपंचायतींमधील आपले सरकार सेवा केंद्रातील केंद्र चालकांच्या कामाच्या मोबदल्या संदर्भात मार्गदर्शक सूचना.**

**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः संग्राम-२०१५/प्र. क्र.९३/संग्राम कक्ष**
बांधकाम भवन,२५,मर्झबान पथ.
फोर्ट,मुंबई-४००००१
तारीखः १४ जानेवारी,२०२१

**वाचा :-**

१. शासन निर्णय, ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्रमांकः व्हीपीएम-२०११/प्र.क्र.६/पं.रा.३, दि.२६ एप्रिल, २०११.
२. शासन निर्णय, ग्रामविकास विभाग क्रमांकःसंग्राम-२०१५/प्र.क्र.९३/संग्राम कक्ष, दि.११ ऑगस्ट, २०१६.
३. शासन परिपत्रक, ग्रामविकास विभाग क्रमांकः आसक-२०१७/प्र.क्र.३२ /आपले सरकार कक्ष, दि.१९ जानेवारी, २०१९
४. शासन निर्णय, ग्रामविकास विभाग क्रमांकः पंविआ-२०२०/प्र.क.५९ /वित्त-४, दि.२६ जून,२०२०
५. शासन निर्णय, ग्रामविकास विभाग क्रमांकः पंविआ-२०२०/प्र.क.५८/ वित्त-४, दि.२९ जून,२०२०
६. राज्यातील ग्रामपंचायतीमध्ये "आपले सरकार सेवा केंद्र (ASSK) उभारणी व अंमलबजावणीबाबत मार्गदर्शक सूचनांबाबतचा शासन निर्णय, ग्रामविकास विभाग क्रमांकः संग्राम-२०१५/प्र.क्र.९३/संग्राम कक्ष, दि.१४ जानेवारी, २०२१

**प्रस्तावना :-**

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार पंचायतीराज संस्थांच्या कारभारामध्ये ई-पंचायत प्रकल्पांतर्गत अभिप्रेत असलेली एकसुत्रता व पारदर्शकता आणणे, नागरिकांना विविध प्रशासकीय विभागांतर्गत आवश्यक असलेले सेवा दाखले त्यांच्या रहिवासी क्षेत्रात कालबद्ध स्वरुपात मिळणे, तसेच इतर व्यावसायिक सेवा, बँकीग सेवा (सर्व G२C व B२C सेवा) ग्रामीण जनतेला एकाच केंद्रावर मिळाव्या या हेतूने शासन निर्णय दि. ११ ऑगस्ट, २०१६ अन्वये राज्यातील ग्रामपंचायतीमध्ये आपले सरकार सेवा केंद्र (ASSK) स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली असून शासन निर्णय दि.१४ जानेवारी, २०२१ अन्वये सदर प्रकल्प राबविण्यासाठी CSC, e-Governance India Ltd. ज्याला CSC-SPV (Common Services Centres-Special Purpose Vehicle) असे

संबोधन्यात येते, या केंद्रशासनाद्वारे प्रेरित कंपनीची करण्यात आलेली नियुक्ती पुढे चालू ठेवण्यास केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार मान्यता देण्यात आली आहे.

सदरहू आपले सरकार सेवा केंद्र प्रकल्पातील केंद्र चालकांना देण्यात येणाऱ्या मोबदल्याच्या रकमेत वाढ करण्याची बाब तसेच इतर मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

१. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ च्या कलम २६१ नुसार व महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ च्या कलम १५३ (अ) व (ब) नुसार राज्यशासनास पंचायत राज संस्थांना विकास योजनांसाठी मार्गदर्शन करण्याच्या अधिकारानुसार, तसेच केंद्र शासनांच्या मार्गदर्शक सुचनांच्या अनुषंगाने राज्यातील ग्रामपंचायतींमध्ये केंद्र शासनाचा ई-पंचायत प्रकल्प (११ NIC आज्ञावली), ग्रामपंचायत लेखासंहिता २०११ चे १ ते ३३ रजिस्टर डिजिटाईज्ड व ऑनलाईन करणे, ग्रामपंचायतींद्वारे दिल्या जाणाऱ्या सेवा ऑनलाईन करणे इ. कामकाज करण्यासाठी सुरु करण्यात आलेल्या आपले सरकार सेवा केंद्रांमधून CSC, e-Governance India Ltd. ज्याला CSC-SPV (Common Services Centres-Special Purpose Vehicle) असे संबोधन्यात येते, या केंद्रशासनाद्वारे प्रेरित कंपनीकडून नियुक्त करण्यात आलेल्या तसेच भविष्यात नियुक्त करण्यात येणाऱ्या केंद्र चालकांना, संदर्भाधीन शासन निर्णय दि १४ जानेवारी, २०२१ मधील परिशिष्ट अ मध्ये नमूद केलेल्या G२G सेवा तसेच ग्रामपंचायत स्तरावरील G२C सेवा देण्यासाठी त्यांनी केलेल्या कामाच्या प्रमाणात जास्तीत जास्त रु.७०००/- इतकी प्रति माह मोबदल्याची रक्कम संबंधित ग्रामपंचायतींनी त्यांच्या स्वनिधीतून प्रचलित देयक संगणक प्रणालीनुसार जिल्हा परिषदेमार्फत राज्य प्रकल्प संचालक, राष्ट्रीय ग्राम स्वराज्य अभियान, पुणे यांचेकडे जमा करणे आवश्यक आहे.

२. प्रचलित देयक संगणक प्रणालीमध्ये केंद्र चालकांनी केलेले काम, संबंधित ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी यांनी प्रमाणित केल्यानंतर सदरहू कामाच्या प्रमाणात केंद्र चालकाच्या मोबदल्याचे दरमहा स्वतंत्रपणे देयक तयार होईल. सदर देयक मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांचेमार्फत, देयक संगणक प्रणालीवर प्राप्त झाल्यानंतर राज्य प्रकल्प संचालक हे देयकाची एकत्रित रक्कम CSC-SPV यांना अदा करतील.

३. यासाठी प्रचलित देयक संगणक प्रणालीमध्ये आवश्यक ते बदल करण्यात येतील.

४. देयक संगणक प्रणालीवर तयार झालेल्या देयकास मंजूरी देण्याचे अधिकार हे ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी यांना असून मुख्य कार्यकारी अधिकारी व राज्य प्रकल्प

संचालक, राष्ट्रीय ग्राम स्वराज्य अभियान, पुणे हे केवळ देयकाची रक्कम एकत्रित करण्याची (Aggregator) भूमिका पार पाडतील.

५. उपरोक्त मोबदल्याची रक्कम अदा करण्यासाठी CSC, e-Governance India Ltd. यांचेसमवेत स्वतंत्रपणे करारनामा करण्यात येईल.

६. आपले सरकार सेवा केंदातील केंद्र चालक हे स्वतंत्र उद्योजक (Village Level Entrepreneur-VLE) असल्याने उपरोक्त रु.७०००/- (जास्तीत जास्त) व्यतिरिक्त सदर्भाधीन शासन निर्णय दि. १४ जानेवारी, २०२१ मधील परिशिष्ट अ मध्ये नमूद केलेल्या इतर G२C आणि B२C सेवांसाठी शासनाने वेळोवेळी निश्चित केलेला मोबदला घेण्यास ते पात्र असतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक **२०२१०११५१११३२४२३२०** असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

PRAVIN DEVICHAND JAIN

Digitally signed by PRAVIN DEVICHAND JAIN
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=c7f82404d3bf725fa292c76bb1649f4e73505a8c846f3f83bdee9968a87f1d6c, postalCode=400001, street=MANTRALAYA,MUMBAI, ou=NA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=PRAVIN DEVICHAND JAIN
Date: 2021.01.19 15:08:10 +05'30'

**(प्रविण देविचंद जैन)**
**उपसचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३. मा.उप मुख्यमंत्री यांचे सचिव
४. मा.सभापती विधान परिषद यांचे खाजगी सचिव
५. मा.अध्यक्ष विधानसभा यांचे खाजगी सचिव, विधानभवन मुंबई
६. मा.विरोधी पक्षनेते विधानपरिषद/विधानसभा यांचे खाजगी सचिव, विधानभवन मुंबई
७. सर्व विधानमंडळ सदस्य, विधानभवन मुंबई
८. शासनाचे मुख्य सचिव
९. प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय, विधानभवन मुंबई
१०. सर्व मंत्री आणि राज्यमंत्री याचे स्वीय सहाय्यक
११. मंत्रालयीन सर्व विभाग
१२. सर्व विभागीय आयुक्त, महाराष्ट्र राज्य

१३. सर्व सह सचिव/उप सचिव ग्राम विकास विभाग
१४. सर्व जिल्हाधिकारी
१५. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
१६. राज्य प्रकल्प संचालक, राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान, पुणे
१७. उप आयुक्त, (विकास), विभागीय आयुक्त यांचे कार्यालय, सर्व
१८. अतिरिक्त मुख्य कायकारी अधिकारी/उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
१९. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
२०. गट विकास अधिकारी,पंचायत समिती (सर्व)
२१. ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत (सर्व)
२२. सर्व कार्यासने, ग्रामविकास विभाग, बांधकाम भवन, मुंबई
२३. मुख्य कार्यकारी अधिकारी CSC, e-Governance India Ltd. इलेक्ट्रॉनिक निकेतन, तिसरा मजला,DeITY,६ सीजीओ कॉम्पलेक्स, लोधी रोड,नवी दिल्ली-११०००३
२४. निवडनस्ती (आपले सरकार कक्ष)

प्रत माहितीसाठी,

१. मा.मंत्री (ग्रामविकास), यांचे खाजगी सचिव
२. मा.राज्यमंत्री (ग्रामविकास), यांचे खाजगी सचिव
३. मा.अप्पर मुख्य सचिव (ग्रामविकास विभाग) यांचे स्वीय सहायक

# परिशिष्ट “ब”

# समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त

**मंगळवार, दिनांक १६ फेब्रुवारी, २०२१**

**स्थळ – जिल्हा परिषद सभागृह, यवतमाळ**

**उपस्थिती :**

(१) श्री. संजय रायमुलकर, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. अनिल पाटील, वि.स.स.

(३) श्री. सुभाष धोटे, वि.स.स.

(४) श्रीमती प्रतिभा धानोरकर, वि.स.स.

(५) डॉ. देवराव होळी, वि.स.स.

(६) श्री. कृष्णा गजबे, वि.स.स.

(७) श्री. किशोर जोरगेवार, वि.स.स.

(८) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

(९) श्री. किशोर दराडे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री.विलास आठवले, उप सचिव

(२) श्री.ह.वि.तामोरे, कक्ष अधिकारी

**जिल्हा परिषद पदाधिकारी**

(१) श्रीमती कालींदाताई यशवंत पवार, अध्यक्ष, जिल्हा परिषद, यवतमाळ

(२) श्री.बाळा जयवंतराव पाटील (कामारकर), उपाध्यक्ष, जिल्हा परिषद, यवतमाळ

(३) श्री.श्रीधर धोंडबाजी मोहेड, सभापती, शिक्षण व आरोग्य समिती

(४) सौ.जयश्रीताई राजू पोटे, सभापती, महिला व बाल कल्याण समिती

(५) श्री.प्रज्ञानंद विजयराव खडसे, सभापती, उमरखेड

**स्थानिक निधी लेखा संचालनालय, नवी मुंबई**

श्री. संजय शहा, संचालक

**जिल्हा परिषद, यवतमाळ**

(१) डॉ.श्रीकृष्ण पांचाळ, मुख्य कार्यकारी अधिकारी

(२) श्री.विनय ठमके, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी

(३) श्री.शरद कुलकर्णी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी

(४) श्री.अरविंद गुंडधे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन)

(५) श्री.मनोजकुमार चौधर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (नरेगा) (प्र)

(६) श्री.विशाल जाधव, उप मुख्य कार्यकारी अधिकारी

(७) श्री.अरूण मोहोड, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.)

(८) श्री.राजेश कुलकर्णी, प्रकल्प संचालक

(९)श्रीमती ज्योती भोंडे, मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी

(१०) श्री.चंद्रशेखर खंडारे, मुख्य लेखा वित्त अधिकारी

(११) श्री.मोहन इंगोले, उप मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी (प्र.)

(१२) श्री.विजय देशमुख, उप मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी

(१३) डॉ.एच.एस.पवार, जिल्हा आरोग्य अधिकारी

(१४) डॉ.राजीव खेरडे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी

(१५) श्री.राजेंद्र व्ही.माळोदे, कृषी विकास अधिकारी (प्र.)

(१६) श्री.के.एन.वानखेडे, कृषी विकास अधिकारी (प्र.)

(१७) श्री.बी.एम.दमाहे, कार्यकारी अभियंता (सिंचन)

(१८) श्री.प्रदीप कोल्हे, कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा)

(१९) श्री.पियुष र.चव्हाण

(२०) कुमारी सोनाली माडकर, गट विकास अधिकारी

(२१) श्री.प्रविणकुमार वानखेडे, गट विकास अधिकारी

(२२) श्री.दि.मा.रावते, उप शिक्षण अधिकारी, शिक्षण विभाग

(२३) श्री.वा.ल.मोतीकर, सेवानिवृत्त उप शिक्षणाधिकारी

(२४) श्री.एम.डी.आंदेलवाड, गट विकास अधिकारी

(२५) श्री.एस.एम.कांबळे, सहायक लेखा अधिकारी

(२६) श्री.आर.पी.पवार, गट विकास अधिकारी

(२७) श्री.पी.एम.मडावी, गट विकास अधिकारी

(२८) श्री.पी.एस.नारकर, गट विकास अधिकारी

(२९) श्री.आर.व्हि.ठाकरे, शिक्षणाधिकारी (निरंतर)

(३०) श्री.दिवक चवणे, शिक्षणाधिकारी (माध्य)

(३१) श्रीमती पाटेकर, शिक्षणाधिकारी (प्राध्य)

(३२) श्री.चिंतामण वंजारी, शिक्षणाधिकारी (माध्य)

(३३) श्री.दिनकर पांडे, कार्यकारी अधियंता (सिंचन)

(३४) श्री.गजानन दळवी, पशुधन विकास अधिकारी

(३५) श्री.बी.एम.मेघावत, गट विकास अधिकारी

(३६) श्री.अमित आडे, उप कार्यकारी अभियंता

(३७) श्री.डि.एच.डाकोरे, कार्यकारी अभियंता (पा.पु)

(३८) श्री.जी.एल.मेश्राम, गट विकास अधिकारी

(४०) श्री.सी.जी.चव्हाण, गट विकास अधिकारी, पांधकवडा

(४१) श्री.के.झेड.राठोड, जिल्हा आरोग्य अधिकारी

(४२) डॉ.जी.के.रचकुंरवार, जिल्हा आरोग्य अधिकारी

(४३) श्रीमती मंगला वा.मुन, जिल्हा सहायक कक्ष अधिकारी

(४४) श्री.बी.के.बेंडे, कार्यकारी अभियंता

(४५) श्री.एस.सी.राठोड, बांधकाम क्र.२

(४६) श्री.पी.एल.चव्हाण, प्रभारी गट विकास अधिकारी

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :-**

समितीने यवतमाळ जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर सर्व संबंधित अधिकारी यांची सन २०१०-२०११ व २०१६-२०१७ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालातील यवतमाळ जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदावर साक्ष घेतली.

**बुधवार, दिनांक १७ फेब्रुवारी, २०२१**

**स्थळ, जिल्हा परिषद, यवतमाळ**

**उपस्थिती :**

(१) श्री.संजय रायमुलकर, वि.स.स. तथा समिती प्रमुख
(२) श्री.अनिल पाटील, वि.स.स.
(३) श्री.सुभाष धोटे, वि.स.स.
(४) श्रीमती प्रतिभा धानोरकर, वि.स.स.
(५) डॉ.देवराव होळी, वि.स.स.
(६) श्री.कृष्णा गजबे, वि.स.स.
(७) श्री.किशोर जोरगेवार, वि.स.स.
(८) श्री.विक्रम काळे, वि.प.स.
(९) श्री.किशोर दराडे, वि.प.स.
(१०) श्री. कैलास पाटील, वि.स.स.
(११) श्रीमती मेघना बोर्डीकर, वि.स.स.
(१२) श्री. माधवराव पवार, वि.स.स.
(१३) श्री. अमरनाथ राजुरकर. वि.प.स.
(१४) श्री. अंबादास दानवे, वि.प.स.
(१५) डॉ. राहुल पाटील, वि.स.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री.विलास आठवले, उप सचिव
(२) श्री.ह.वि.तामोरे, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखा संचालनालय, नवी मुंबई**

श्री.संजय शहा, संचालक

**जिल्हा परिषद, यवतमाळ**

(१) डॉ.श्रीकृष्ण पांचाळ, मुख्य कार्यकारी अधिकारी
(२) श्री.विनय ठमके, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी
(३) श्री.शरद कुलकर्णी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी
(४) श्री.अरविंद गुंडधे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन)
(५) श्री.मनोजकुमार चौधर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (नरेगा) (प्र)
(६) श्री.विशाल जाधव, उप मुख्य कार्यकारी अधिकारी
(७) श्री.अरूण मोहोड, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.)
(८) श्री.राजेश कुलकर्णी, प्रकल्प संचालक
(९) श्रीमती ज्योती भोंडे, मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी
(१०) श्री.चंद्रशेखर खंडारे, मुख्य लेखा वित्त अधिकारी
(११) श्री.मोहन इंगोले, उप मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी (प्र.)
(१२) श्री.विजय देशमुख, उप मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी

(शा.म.मु.) एचबी ३३७९—१२(१५०—३-२०२६)

(१३) डॉ.एच.एस.पवार, जिल्हा आरोग्य अधिकारी
(१४) डॉ.राजीव खेरडे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी
(१५) श्री.राजेंद्र व्ही.माळोदे, कृषी विकास अधिकारी (प्र.)
(१६) श्री.के.एन.वानखेडे, कृषी विकास अधिकारी (प्र.)
(१७) श्री.बी.एम.दमाहे, कार्यकारी अभियंता (सिंचन)
(१८) श्री.प्रदीप कोल्हे, कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा)
(१९) श्री.पियुष र.चव्हाण
(२०) कुमारी सोनाली माडकर, गट विकास अधिकारी
(२१) श्री.प्रविणकुमार वानखेडे, गट विकास अधिकारी
(२२) श्री.दि.मा.रावते, उप शिक्षण अधिकारी, शिक्षण विभाग
(२३) श्री.वा.ल.मोतीकर, सेवानिवृत्त उप शिक्षणाधिकारी
(२४) श्री.एम.डी.आंदेलवाड, गट विकास अधिकारी
(२५) श्री.एस.एम.कांबळे, सहायक लेखा अधिकारी
(२६) श्री.आर.पी.पवार, गट विकास अधिकारी
(२७) श्री.पी.एम.मडावी, गट विकास अधिकारी
(२८) श्री.पी.एस.नारकर, गट विकास अधिकारी
(२९) श्री.आर.व्हि.ठाकरे, शिक्षणाधिकारी (निरंतर)
(३०) श्री.दिवक चवणे, शिक्षणाधिकारी (माध्य)
(३१) श्रीमती पाटेकर, शिक्षणाधिकारी (प्राध्य)
(३२) श्री.चिंतामण वंजारी, शिक्षणाधिकारी (माध्य)
(३३) श्री.दिनकर पांडे, कार्यकारी अधियंता (सिंचन)
(३४) श्री.गजानन दळवी, पशुधन विकास अधिकारी
(३५) श्री.बी.एम.मेघावत, गट विकास अधिकारी
(३६) श्री.अमित आडे, उप कार्यकारी अभियंता
(३७) श्री.डि.एच.डाकोरे, कार्यकारी अभियंता (पा.पु)
(३८) श्री.जी.एल.मेश्राम, गट विकास अधिकारी
(४०) श्री.सी.जी.चव्हाण, गट विकास अधिकारी, पांधकवडा
(४१) श्री.के.झेड.राठोड, जिल्हा आरोग्य अधिकारी
(४२) डॉ.जी.के.रचकुंरवार, जिल्हा आरोग्य अधिकारी
(४३) श्रीमती मंगला वा.मुन, जिल्हा सहायक कक्ष अधिकारी
(४४) श्री.बी.के.बेंडे, कार्यकारी अभियंता
(४५) श्री.एस.सी.राठोड, बांधकाम क्र.२
(४६) श्री.पी.एल.चव्हाण, प्रभारी गट विकास अधिकारी

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :-**

समितीने यवतमाळ जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर सर्व संबंधित अधिकारी यांची सन २०११-१२ व २०१७-२०१८ च्या वार्षिक प्रशासन अहवालावरील प्रश्नावली क्रमांक-२ च्या संदर्भात यवतमाळ जिल्हा परिषदेच्या पंचायत समितीनिहाय संबंधित असलेल्या परिच्छेदांवर साक्ष घेतली.

**गुरूवार, दिनांक १८ फेब्रुवारी, २०२१**

**स्थळ, जिल्हा परिषद सभागृह, यवतमाळ**

**उपस्थिती :**

(१) श्री.संजय रायमुलकर, वि.स.स. तथा समिती प्रमुख
(२) श्री.कैलास पाटील, वि.स.स
(३) डॉ.राहूल पाटील, वि.स.स.
(४) श्री.अनिल पाटील, वि.स.स.
(५) श्री.सुभाष धोटे, वि.स.स.
(६) श्री.माधवराव जळगावकर, वि.स.स.
(७) श्रीमती प्रतिभा धानोरकर, वि.स.स.
(८) डॉ.देवराव होळी, वि.स.स.
(९) श्री.कृष्णा गजबे, वि.स.स.
(१०) श्री.किशोर जोरगेवार, वि.स.स.
(११) श्री.अंबादास दानवे, वि.स.स.
(१२) श्री.विक्रम काळे, वि.प.स.
(१३) श्री.किशोर दराडे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री.विलास आठवले, उप सचिव
(२) श्री.ह.वि.तामोरे, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखा संचालनालय, नवी मुंबई**

श्री.संजय शहा, संचालक

**जिल्हा परिषद, यवतमाळ**

(१) डॉ.श्रीकृष्ण पांचाळ, मुख्य कार्यकारी अधिकारी
(२) श्री.विनय ठमके, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी
(३) श्री.शरद कुलकर्णी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी
(४) श्री.अरविंद गुंडधे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन)
(५) श्री.मनोजकुमार चौधर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (नरेगा) (प्र)
(६) श्री.विशाल जाधव, उप मुख्य कार्यकारी अधिकारी
(७) श्री.अरूण मोहोड, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.)
(८) श्री.राजेश कुलकर्णी, प्रकल्प संचालक
(९) श्रीमती ज्योती भोंडे, मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी
(१०) श्री.चंद्रशेखर खंडारे, मुख्य लेखा वित्त अधिकारी
(११) श्री.मोहन इंगोले, उप मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी (प्र.)
(१२) श्री.विजय देशमुख, उप मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी
(१३) डॉ.एच.एस.पवार, जिल्हा आरोग्य अधिकारी
(१४) डॉ.राजीव खेरडे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी

(१५) श्री.राजेंद्र व्ही.माळोदे, कृषी विकास अधिकारी (प्र.)

(१६) श्री.के.एन.वानखेडे, कृषी विकास अधिकारी (प्र.)

(१७) श्री.बी.एम.दमाहे, कार्यकारी अभियंता (सिंचन)

(१८) श्री.प्रदीप कोल्हे, कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा)

(१९) श्री.पियुष र.चव्हाण

(२०) कुमारी सोनाली माडकर, गट विकास अधिकारी

(२१) श्री.प्रविणकुमार वानखेडे, गट विकास अधिकारी

(२२) श्री.दि.मा.रावते, उप शिक्षण अधिकारी, शिक्षण विभाग

(२३) श्री.वा.ल.मोतीकर, सेवानिवृत्त उप शिक्षणाधिकारी

(२४) श्री.एम.डी.आंदेलवाड, गट विकास अधिकारी

(२५) श्री.एस.एम.कांबळे, सहायक लेखा अधिकारी

(२६) श्री.आर.पी.पवार, गट विकास अधिकारी

(२७) श्री.पी.एम.मडावी, गट विकास अधिकारी

(२८) श्री.पी.एस.नारकर, गट विकास अधिकारी

(२९) श्री.आर.व्हि.ठाकरे, शिक्षणाधिकारी (निरंतर)

(३०) श्री.दिवक चवणे, शिक्षणाधिकारी (माध्य)

(३१) श्रीमती पाटेकर, शिक्षणाधिकारी (प्राध्य)

(३२) श्री.चिंतामण वंजारी, शिक्षणाधिकारी (माध्य)

(३३) श्री.दिनकर पांडे, कार्यकारी अधियंता (सिंचन)

३४) श्री.गजानन दळवी, पशुधन विकास अधिकारी

(३५) श्री.बी.एम.मेघावत, गट विकास अधिकारी

(३६) श्री.अमित आडे, उप कार्यकारी अभियंता

(३७) श्री.डि.एच.डाकोरे, कार्यकारी अभियंता (पा.पु)

(३८) श्री.जी.एल.मेश्राम, गट विकास अधिकारी

(४०) श्री.सी.जी.चव्हाण, गट विकास अधिकारी, पांधकवडा

(४१) श्री.के.झेड.राठोड, जिल्हा आरोग्य अधिकारी

(४२) डॉ.जी.के.रचकुंरवार, जिल्हा आरोग्य अधिकारी

(४३) श्रीमती मंगला वा.मुन, जिल्हा सहायक कक्ष अधिकारी

(४४) श्री.बी.के.बेंडे, कार्यकारी अभियंता

(४५) श्री.एस.सी.राठोड, बांधकाम क्र.२

(४६) श्री.पी.एल.चव्हाण, प्रभारी गट विकास अधिकारी

---

संक्षिप्त कार्यवृत्त :-

समितीने यवतमाळ जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर सर्व संबंधित अधिकारी यांची सन २०१०-२०११ व २०१६-२०१७ च्या लेखापरिक्षा पुनर्विलोकन अहवालातील व सन २०११-२०१२ व २०१७-२०१८ च्या वार्षिक प्रशासन अहवालातील यवतमाळ जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदांवर साक्ष घेतली.

**मंगळवार, दिनांक १६ नोव्हेंबर, २०२१**

**स्थळ, विधान भवन, मुंबई**

**उपस्थिती :**

(१) श्री.संजय रायमुलकर, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री.अनिल पाटील, वि.स.स.

(३) श्रीमती प्रतिभा धानोरकर, वि.स.स.

(४) डॉ.देवराव होळी, वि.स.स.

(५) श्री.कृष्णा गजबे, वि.स.स.

(६) श्री.अंबादास दानवे, वि.प.स.

(७) श्री.विक्रम काळे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री.विलास आठवले, उप सचिव

(२) श्री.प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

(३) श्री.सुनिल परब, कक्ष अधिकारी

(४) श्रीमती सुषमा लोंढे, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, नवी मुंबई**

श्री. माधव नागरगोजे, संचालक

**मंत्रालयीन विभागीय सचिव / अधिकारी :**

(१) श्री.राजेश कुमार, अपर मुख्य सचिव, ग्रामविकास विभाग

(२) डॉ. नितीन करीर, अपर मुख्य सचिव, महसूल विभाग

(३) डॉ. प्रदीप व्यास, अपर मुख्य सचिव , सार्वजनिक आरोग्य विभाग

(४) श्रीमती वन्दना कृष्णा, अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग

(५) श्रीमती आय. ए. कुंदन, सचिव, महिला व बाल विकास

(६) श्री. वि.ल. लहाने, सह सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग

(७) श्री. सतिश तुपे, सहसचिव, वित्त विभाग

(८) श्री. अतुल कोदे, सह सचिव महसूल

(९) श्री. मंगेश वसंत मोहिते, सह सचिव, ग्रामविकास

(१०) श्री. प्रविण पुरी. सहसचिव, पाणीपुरवठा व स्वछता विभाग

(११) श्री. सुभाष कि. गावडे, सहसचिव, जलसंधारणा विभाग

(१२) श्री. दिनेश रा. डिंगळे, सामाजिक न्याय विभाग

(१३) श्री. गणेश पाटील, सहसचिव, कृषि विभाग

(१४) श्री. धीरज कुमार, आयुक्त, कृषि

(१५) श्री. दिलीप झेंडे, संचालक

(१६) श्री. विजय वृंदेवए, सहसंचालक, आरोग्य विभाग

(१७) श्री. श्री. दे. लोंढे, उपसचिव, ग्रामविकास विभाग

(१८) श्री. प्रविण जैन, उप सचिव, ग्रामविकास विभाग

(१९) श्री. एकनाथ काशीनाथ गागरे, उपसचिव

(२०) श्रीमती नीला रानडे, अवर सचिव, ग्रामविकास विभाग

(२१) श्री. संजय कुडवे , अवर सचिव, महसूल व वन विभाग

(२२) श्री. उमेश चंदिवाड, अवर सचिव, कृषि

(२३) श्री. प्रकाश कदम, अवर सचिव , कृषि

(२४) श्री. श्रीकृष्ण पांचाळ, मुख्य कार्यकारी अधिकारी , जिल्हा परषिद यवतमाळ

(२५) श्री. विनय ठमके, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यवतमाळ

(२६) श्री. गोकुळ देवरे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी , महिला व बालकल्याण , जिल्हा परिषद यवतमाळ

(२७) डॉ. पि. एस. चव्हाण , जिल्हा आरोग्य अधिकारी , जिल्हा परिषद यवतमाळ

(२८) श्री. आर. व्ही. माकदे, कृषि विकास अधिकारी , जिल्हा परिषद यवतमाळ

(२९) श्री. पीयुष र. चव्हाण, जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद यवतमाळ

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :-**

सन २०१०-२०११ व २०१६-२०१७ च्या लेखापरिक्षा पुनर्विलोकन अहवाल व सन २०११-२०१२ व २०१७-२०१८ च्या वार्षिक प्रशासन अहवाल यासंदर्भात यवतमाळ जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी अपर मुख्य सचिव, ग्रामविकास विभाग, अपर मुख्य सचिव, महसूल विभाग, अपर मुख्य सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग, सचिव, महिला व बालविकास विभाग, सहसचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, सहसचिव, वित विभाग, सहसचिव, महसूल विभाग, सहसचिव, ग्रामविकास विभाग, सह सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, सहसचिव, जलसंधारण विभाग, सहसचिव, सामाजिक न्याय विभाग, सहसचिव, कृषी विभाग, आयुक्त, कृषी विभाग, उप सचिव, ग्रामविकास विभाग, उप सचिव, ग्रामविकास विभाग, अवर सचिव, ग्रामविकास विभाग, अवर सचिव, महसूल व वन विभाग, अवर सचिव, कृषी विभाग, सहसंचालक, आरोग्य विभाग, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, यवतमाळ यांची साक्ष घेतली

बुधवार, दिनांक १८ मार्च, २०२६

स्थळ - विधान भवन, मुंबई

**उपस्थिती :**

(१) श्री. संतोष दानवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. प्रताप अडसड, वि.स.स.

(३) श्री. सुनिल कांबळे, वि.स.स.

(४) श्री. शिवाजी पाटील, वि.स.स.

(५) श्री.दीपक केसरकर, वि.स.स.

(६) श्री. संजय गायकवाड, वि.स.स.

(७) श्री. सचिन अहिर, वि.प.स.

**विशेष निमंत्रित :**

(८) डॉ. बाबासाहेब देशमुख, वि.स.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. शिवदर्शन साठ्ये, सचिव-४

(२) श्री. रविंद्र जगदाळे, उप सचिव

(३) श्री. सुरेश मोगल, अवर सचिव

(४) श्री. पवन म्हात्रे, कक्ष अधिकारी

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :-**

समितीने बैठकीत दुसरा अहवालाच्या प्रारूपावर विचार करून ते किरकोळ सुधारणांसह संमत केला.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई